नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

७

टिळक–आगरकर जन्मशताब्दी विशेषांक

संपादक :
पां. कृ. सावळापूरकर

आगष्ट १९५६
किंमत आठ आणे

विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय: सारस्वती जन्मभूः



अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :

पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :

कृ. व्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष ११ वें : अंक ५ वा

आगष्ट १९५६

संपादकीय

आगरकर टिळक जन्मशताब्दीच्या निमित्ताने ' युगवाणी ' चा विशेषांक वाचकांच्या हातीं देतांना समाधान वाटत आहे.

आगरकर आणि टिळक हे दोघेहि गेल्या शतकांतील महापुरुष होते. आगरकरांना आयुष्य अल्प लाभलें व त्यांनी आपलें सामाजिक सुधारणेचें क्षेत्र ल्हानशा सुशिक्षित समाजापुरतें मर्यादित ठेवलें म्हणून त्यांना अखिल भारतीय कीर्तीचा लाभ झाला नाही; तथापि तेवढ्याने त्यांचें महनीयत्व कमी होत नाही. त्यांच्या सामाजिक सुधारणाविषयक लेखांपेक्षाहि राजकीय विषयांवरील लेख आजहि आम्हाला जास्त मोलाचे वाटतात. लोकशिक्षणाचें ध्येय मनाशीं निश्चित करून आमरण त्या ध्येयानुरूप आचरण करणाऱ्या या महापुरुषाच्या आत्म्याला आम्ही विनम्र भावाने वंदन करतों.

लोकमान्य टिळकांविषयीं जितकें लिहावें तितकें थोडेंच होईल. या पुरुषोत्तमाचा अवतार झाला नसता तर आज आपण जें राजकीय स्वातंत्र्य उपभोगीत आहोंत तें इतक्या लौकर मिळालें नसतें हें उघड आहे. तीव्र बुद्धिमत्ता, मूलगामी संशोधन, विशुद्ध चारित्र्य आणि पराकाष्ठेचा निःस्पृहपणा व शौर्य या अनेक गुणांचा समवाय एकाच पुरुषाच्या ठायीं झालेला क्वचितच दिसून येतो. या शताब्दीच्या निमित्ताने टिळकांच्या सार्वकालिक स्वरूपाच्या ग्रंथाचें विशेषतः गीतारहस्याचें अध्ययन करण्याची बुद्धि आमच्या तरुण मंडळींना झाली तर त्यांत त्यांचें व देशाचें कल्याण आहे. किंबहुना 'गीतारहस्या' च्या निमित्ताने अजूनहि लोकमान्य आमच्यांत वावरत आहेत असें म्हणायला हरकत नाही. या युगपुरुषाच्या पुण्यात्म्यास आमचे शतशः प्रणाम.

या जन्मशताब्दीच्या निमित्ताने विदर्भ साहित्य संघाने दि. १९ जुलै ते १ आगस्ट या काळांत एका महोत्सवाचें आयोजन केलें होतें. त्या उत्सवाची समग्र हकीकत आणि त्या निमित्ताने झालेलीं भाषणें याचा समग्र वृत्तांत याच अंकांत आम्ही दिला आहे तो वाचकांना खात्रीने आवडेल अशी आशा आहे.

प्रस्तुत अंकांत ज्यांनी लेख दिले, चित्रें दिलीं व अन्य प्रकारें साहाय्य केलें त्या सर्वांचे आभार मानतों. ' युगवाणी 'सर्वोत्कृष्ट करण्यासाठी त्यांनी हीच कृपा नित्य ठेवावी, अशी प्रार्थना आहे.

अनुक्रमणिका

कै. गोपाळ गणेश आगरकर

क्षुद्राः सन्ति सहस्रशः स्वभरणव्यापारमात्रोद्यताः ।
स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमानेकः सतामग्रणी ।।

—भर्तृहरी

मनुष्याची योग्यता ठरवावयाची असल्यास ती त्याने किती ग्रंथ वाचले किंवा त्याने किती पैसा संपादन केला एवढयावरून ठरत नाही. आगरकरांनी जितके ग्रंथ वाचले असतील त्यापेक्षा अधिक ग्रंथ वाचलेले एम्. ए. सध्याच्या काळीं डझनांनी सापडण्यास हरकत नाही. आगरकरांची योग्यता एम्. ए. होण्यांत नाही, ग्रंथ वाचनांत नाही, महाराष्ट्र लेखनपटुत्वांत नाही, आणि आमच्या मतें त्यांनी 'सुधारक' पत्र काढलें व चालवलें यांतहि नाही. बिचारा सुधारक त्यांच्या मागेहि कसाबसा चालला होता, आणि सुधारणेचे प्रतिपादन करणारेच नव्हेत तर आचरण करणारेहि सध्या पुष्कळ आहेत किंवा होतील. तथापि आगरकरांसारखा पुरुष त्यांच्यांत क्वचितच सापडेल असें म्हणण्यास आम्हास कांही एक हरकत दिसत नाही....सुधारणेचीं मतें त्यांनी निर्भीडपणे व कित्येकदा उच्छृंखलपणेहि प्रतिपादन केलीं पण हें कांही त्यांच्या मोठेपणाचें लक्षण नव्हे. परिस्थितीचा गुलाम न बनतां परिस्थितीला यथासंभव यथाशक्ति व यावच्छक्य आपल्या ताब्यांत आणण्यास जो मनोनिग्रह, स्वार्थत्याग, निर्लोभीपणा आणि धैर्य लागतें तें ज्याच्या अंगांत आहे; आणि दुःखाची अथवा संकटाची भीति अगर पर्वा न बाळगतां जो आपल्या ठायीं असणाऱ्या या सद्गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा.....विचार आणि मतें हीं मनाचीं पांघरुणें होत असें जें एका पाश्चात्य ग्रंथकाराने म्हटलें आहे तेंच खरें. देशकालानुसार मनुष्याचे विचार आज एक तर उद्या दुसरे होतील; आणि त्याच्या हातून घडणाऱ्या क्रियेसहि तोच न्याय लागू आहे. पण सत्पुरुषाचा मोठेपणा त्याच्या स्वतः-सिद्ध किंवा कमावलेल्या मनांत आहे; आणि हेंच तत्त्व शिरोभागीं दिलेल्या भर्तृहरीच्या श्लोकांत ग्रथित केलेलें आहे.......आज नाही तर उद्या हाच उत्सव अधिक व्यापक होऊन सर्वांगसुंदर होवो व त्यामुळे पुढील पिढीस स्वार्थत्यागाचें, मानसिक धैर्याचें व चारित्र्याचें इष्ट वळण लागून तद्द्वारा हा उत्सव देशोन्नतीस कारण होवो, अशी आमची मनापासून इच्छा आहे.

—आगरकरांची श्राद्धतिथि,
लो. टिळक यांचे केसरींतील लेख, भाग ४, पृ. ७२९

अनुक्रमणिका

प्राप्य वरान्निबोधत

श्रीनिवास नारायण बनहट्टी

[सदरहु लेख श्री. ना. बनहट्टी यांच्या टिळक पुण्यतिथि शके १८७८ रोजीं प्रकाशित झालेल्या 'टिळक आणि आगरकर' या ग्रंथांतील एक प्रकरण आहे. ग्रंथांतून प्रकरण उद्धृत करण्यास संमति दिल्याबद्दल बनहट्टींचे आम्ही आभारी आहों. —संपादक]

स्वातंत्र्य आणि लोकशाही

लोकमान्य टिळक आरंभापासून अखेरपर्यंत पूर्ण स्वातंत्र्यवादी होते हें सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. चिपळूणकरांनी आणि आगरकरांनी स्वातंत्र्याच्या ध्येयाचा जसा स्पष्टपणे उच्चार केला आहे, आणि आगरकरांनी चिपळूणकरांच्या स्वातंत्र्यवादाबद्दल निर्वाळा दिला आहे, तशी स्पष्ट खूण टिळकांच्या बाबतींत आढळत नाही. याचें कारण पूर्ववयांत राजकीय विषयावर तात्त्विक दृष्टया त्यांनी कांही लिहिलेंच नाही. पुढे प्रत्यक्ष राजकारणांत पडल्या-नंतर अंतिम राजकीय ध्येयाचें प्रतिपादन लेखांतून किंवा भाषणांतून करणें सोयीचें नव्हतें. तरी तशा स्थितींत देखील 'इंग्लंडच्या बाहुटयाखाली पूर्ण स्वातंत्र्य' या ध्येयाचा उच्चार १९०२ सालीं केसरीमधून करण्याचें धाडस त्यांनी केलें होतें हें आपण पाहिलें आहे. आयुष्याच्या अखेरीस कांग्रेस डेमोक्राटिक पक्षाचा जाहिर-नामा त्यांनी काढला त्यांत ब्रिटिश साम्राज्यमंडळांत हिंदुस्थान हा ग्रेट ब्रिटनच्या बरोबरीच्या दर्जाचा भागीदार व्हावा अशी मागणी नमूद केली आहे. यावरून असा एक संभव वाटतो की ब्रिटिश राष्ट्रकुलाचा सभासद राहूनहि पूर्ण स्वतंत्र अशी जी सध्या भारताची अवस्था आहे ती त्यांना मान्य झाली असती; स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रेट ब्रिटनपासून फुटून निघालेंच पाहिजे असा आग्रह त्यांनी धरला नसता.

मनाने निरंतर स्वातंत्र्यवादी असले तरी प्रकट लेखांत व भाषणांत स्वराज्य, स्वातंत्र्य या शब्दांची त्यांनी जपमाळ घेतली होती असें नाही. जुलूम नाहीसा झाला पाहिजे, आमचे हक्क आम्हांला मिळाले पाहिजेत, अशीच भाषा सर्वसाधारणपणे वापरली जात असे. पूर्वी स्वराज्य शब्दाची देखील भीति वाटत असे. कलकत्याच्या १९०६ च्या कांग्रेसपासून तो शब्द चालू राजकारणाच्या संबंधांत येऊं लागला. पुढे होमरूलच्या काळांत 'साम्राज्यांतर्गत स्वराज्य' असा शब्दप्रयोग टिळक बहुधा वापरीत असत.

हें आपलें स्वराज्य किंवा स्वातंत्र्य पूर्ण लोकसत्ताक असलें पाहिजे अशी लोकमान्यांची ठाम भावना होती. कांग्रेस डेमोक्राटिक पक्षाच्या जाहिरनाम्यांत लोकशाहीवर अढळ विश्वास हें पक्षाचें एक प्रमुख लक्षण म्हणून प्रारंभींच नमूद केलें आहे. सामान्य जनता हें त्यांचें उपास्य दैवत होतें. जनता हाच परमेश्वर अशा भावनेने त्यांनी गीतारहस्य 'श्रीशाय जनतात्मने' अर्पण केलें आहे. सुधारक लोक त्यांना तेल्यातांबोळयांचे पुढारी म्हणून हिणवीत, तेंच आपलें बिरुद म्हणून लोकमान्य मिरवीत. हिंदुस्थानांतील जनतेचा मुख्य अंश जो शेतकरी त्याच्या संबंधाने टिळकांनी केसरींत जितक्या कळवळयाने लिहिलें तितकें दुसऱ्या कोणी कधी लिहिलें नसेल. इ. स. १८९६ च्या दुष्काळांत खेडयापाडयांतील जनतेचीच त्यांनी काळजी वाहिली; सोलापूरच्या कोष्टयांना वाच-विण्याकरिता ते सरकारशीं झगडले. शिवाजी उत्सव, गणपति उत्सव यांसारख्या राष्ट्रीय महोत्सवांच्या निमित्ताने सुशिक्षितांनी खेडयांत जावें, तेथील जनतेशीं समरस होऊन त्यांच्यांत नवीन कल्पनांचा प्रसार करावा असें त्यांनी प्रतिपादिलें. 'खेडीं हाच आपला हिंदुस्थान देश आहे', 'खेडयांकडे परत चला' (back to the

villages) इत्यादि अलीकडील उद्घोषांचा आशय त्यांच्या प्रतिपादनांत अशा रीतीने येऊन गेला आहे. गणपति विसर्जनाच्या मिरवणुकींत अस्पृश्यांचा गणपति त्यांनी आपल्या हाताने गायकवाड वाड्याच्या गणपती-शेजारीं नेऊन ठेवला वगैरे ज्या हकीकती त्यांच्या संबंधाने सांगितल्या जातात त्या त्यांच्या जनताप्रेमाच्या आणि समताभावनेच्या द्योतक होत.

हिंदुधर्माचा त्यांना पूर्ण अभिमान होता आणि वर्णव्यवस्था हें त्याचें महत्त्वाचें अंग होय, असें त्यांचें मत होतें. तथापि जातिविषयक आणि वर्णविषयक उच्च-नीचतेच्या भावना लयास गेल्या पाहिजेत असें त्यांना वाटत होतें.

"कालांतराने अशी स्थिति येऊं शकेल की ही वर्णव्यवस्था मोडून सर्व समाज पाश्चिमात्य समाजाप्रमाणे कराराच्या पायावर उभारला जाईल." ... पण ... "हा (वर्ण) संकर पूर्ण होऊन सव-गोलंकार झाल्यालेरीज हिंदुस्थानच्या उन्नतीची आशा धरावयास नको, अशी कोणाची समजूत असेल तर ती साफ चुकीची आहे ... कारण जेथे वर्णभेद नाही तीं राष्ट्रेंहि आमच्याप्रमाणेच आपत्तींत गुरफटलेलीं आहेत असें नजरेस येतें.... आणि सध्याच्या काळीं इंग्रजी साम्राज्यांतर्गत ज्या स्वराज्याची स्थापना करायाची आहे तें स्वराज्य मिळविण्यासहि वर्णसंकराची वाट पाहण्याचें कारण नाही."*

वर्णसंकराची वाट पाहण्याची जरूरी नाही, त्याचप्रमाणे देशहिताचीं कामें करतांना जातीकडे पाहण्याची मुळीच जरूर नाही असेंहि लोकमान्यांनी सांगितलें आहे.—

"पण हे भिन्नभिन्न देशहिताचे प्रकार सिद्धीस नेण्यास भिन्न भिन्न जातवारच लोक पाहिजेत असें मात्र त्याने सिद्ध होत नाही. अधिकारारूढ पुरुष त्याच विषयांत निष्णात असला म्हणजे झालें, मग तो जातीचा ब्राह्मण असो वा ब्राह्मणेतर असो, जैन असो वा लिंगायत असो, तिकडे पाहण्याचें कारण नाही. हल्ली येऊं घातलेल्या लोकशाहींत जें काय शिकावयाचें आहे तें हेंच."*

* लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग ३, पृ. ४५५–५७.

लोकशाहीवरील ही निष्ठा आगरकरांच्या ठायीं होती की नाही याबद्दल संदेह वाटण्यास जागा आहे. मानवी सुधारणेचीं खरीं तत्त्वें ज्यांना कळत नाहीत अशा अडाणी, रूढिप्रिय समाजाच्या हातीं सत्ता देण्याला त्यांचा विरोध दिसतो. पाश्चात्य देशांमधून मानवी सुधारणुकेचीं जीं तत्त्वें इंग्रजी विद्येच्या द्वारें इकडे आलेलीं आहेत, तीं ज्यांना पटलेलीं आहेत ते जरी अल्पमतांत असले तरी त्यांच्या मतानुसार सरकारने बिनदिक्कत कायदा करावा असें त्यांचें मत होतें. म्हणजे (सगळाच्या सगळा समाज पाश्चात्य सुधारणेचीं तत्त्वें अंगीकारणारा होईपर्यंत तरी) एक प्रकारची बुधजनसत्ता त्यांना पाहिजे होती. टिळकांचें मत असें नव्हतें. इंग्रजी विद्या न शिकलेला समाज असमंजस असलाच पाहिजे असें त्यांना वाटत नव्हतें.

तर्कशुद्ध छाननी केली तर आगरकरांचा स्वातंत्र्यवाद देखील निरपवाद नसावा अशी शंका येते. 'सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल, सांप्रतकाल' या नांवाने त्यांनी लेख लिहिले त्यांत असें प्रतिपादन केलें की

"आमचें सांप्रत पारतंत्र्य हेंच सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास कांही अंशीं अनुकूल झालें आहे."

"सामाजिक व धार्मिक बाबतींत हवें तें करण्यास आज आम्हांस पूर्ण मुभा आहे. आम्ही स्वतंत्र असतों तर असें झालें नसतें."*

या दोन विधानांचा फलितार्थ असा की सामाजिक सुधारणा जर आम्हांस पाहिजे असेल (आणि आगरकरांच्या मतीं ती आम्हांस अत्यवश्यक आहे) तर सुधारणा होऊन जाईपर्यंत तरी आपलें पारतंत्र्य कायम राखणें इष्ट आहे !

आगरकरांच्या विचारसरणींतून स्वातंत्र्य आणि लोकशाही यांना कांही काळ तरी अपवाद करण्यास हरकत नाही अशीं मतें निष्पन्न कां झालीं याचें कारण त्यांची मूलभूत भूमिका लक्षांत घेतली म्हणजे आपणास उमगतें. 'मनुष्यसुधारणेचीं अत्यंत परिणत तत्त्वें आज युरोपांत दृष्टीस पडत आहेत, आणि त्यांचें अनुकरण केल्यालेरीज आपला निभाव लागणार नाही' हें महान गृहीतकृत्य (assumption) त्यांच्या एकंदर विचारसरणीच्या

* निबंधसंग्रह, भाग १, पृ. १४०–४१.

बुडाशीं आहे. त्यामुळे, मनुष्यसुधारणेच्या ह्या परिणत तत्त्वांचा आपल्या समाजाकडून जोंपर्यंत स्वीकार झाला नाही तोंपर्यंत लोकशाही आणि स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी बाजूस ठेविल्या पाहिजेत, हें फलित ओघानेच आलें. टिळकांना मुळांत हें गृहीतकृत्यच मान्य नव्हतें, म्हणूनच लोकशाही आणि स्वातंत्र्य या तत्त्वांना कोणताहि अपवाद करण्याची त्यांना जरूर भासली नाही. मनुष्यसुधारणेचीं परिणत तत्त्वें काय तीं युरोपांत, आणि आमच्या धर्मांत जीं मूल तत्त्वें आहेत तीं अगदी हीन, अशी वास्तविक स्थितिच नाही; दोन्ही संस्कृतींत कांहीं चांगले तर कांहीं वाईट भाग आहेत; दोहींच्या संघट्टनाने योग्य त्या सुधारणा होत जातील. त्यासाठी स्वातंत्र्य व लोकशाही खोळंवून ठेवण्याचें कारण काय ? असें टिळकांचें म्हणणें होतें.*

आगरकर स्वातंत्र्यसमतावादी सुधारक असूनहि राजकीय स्वातंत्र्य व लोकशाही यांच्या बाबतींत मागे कां, आणि टिळक धर्माभिमानी, परंपराभिमानी असूनहि राजकीय स्वातंत्र्य व लोकशाही यांच्या बाबतींत पुढे कां, याची तर्कशुद्ध उपपत्ति ही अशी आहे.

सुधारणांची कार्यकारणमीमांसा

आज आपणास स्वातंत्र्य मिळून नऊ वर्षें झालीं आहेत. आगरकरांच्या देहावसानाला ६१ व टिळकांच्या मृत्यूला ३६ वर्षें लोटलीं आहेत. दोघां थोर पुरुषांपैकी प्रत्येकाच्या कार्यांचें फलित काय झालें, तसेंच दोघांपैकी कोणाची विचारसरणी खरी ठरली हें आजमावून पाहण्यास आता उत्तम सवड झाली आहे. थोडक्यांत ही अजमावणी करून पाहूं या.

स्वातंत्र्य मिळालें आहे. बऱ्याचशा सुधारणा झाल्या आहेत. परंतु या दोघांमध्ये कार्यकारणसंबंध कितपत आहे ? पांढरपेशा वर्गाच्या स्त्रियांचें केशवपन थांबलें आहे; विधवापुनर्विवाह रूढ झाले आहेत; बालविवाह ही गतकालीन गोष्ट होऊन बसली आहे; स्त्रियांचें शिक्षण, पांढरपेशा वर्गामध्ये तरी, पुरुषांच्या बरोबरीनें होऊं लागलें आहे. या सर्व सुधारणा इंग्रजी शिक्षणाने जे नवीन विचार इकडे आले त्यामुळे मुख्यतया घडून आल्या; आगरकर आपटे यांच्यासारख्यांनी केलेल्या दटावणीच्या व कांतासंमित उपदेशाचेंहि त्यांना पाठबळ मिळालें. या सर्व सुधारणा इष्ट आहेत यांतहि वाद नाही. पण यांचा व राजकीय स्वातंत्र्याचा कितीसा कार्यकारणसंबंध आहे ? या सर्व सुधारणा ज्या 'स्त्रीदास्यविमोचन' या मोठ्या सदरांत येतात, तें अगोदर होऊन गेलें आणि त्याच्यामुळे स्वातंत्र्याचे प्रयत्न जोरावून स्वातंत्र्य मिळालें असें तर दिसत नाही. याला दुसरें प्रत्यंतर असें की स्वातंत्र्य संपादन करण्याच्या कार्यांत ज्याचा मोठा भाग होता त्या अशिक्षित बहुजन समाजाला हा सुधारणांचा कार्यक्रमच नीटसा लागू पडत नाही. त्या समाजांत केशवपनाचा व बहुंशीं विधवापुनर्विवाहाचा प्रश्न नाही. स्त्रीशिक्षणाचा प्रश्न आहे, पण त्याला स्वातंत्र्य मिळेपर्यंत तोंड लागलें नव्हतें. तेव्हा कार्यकारणसंबंध जुळत नाही.

ज्या सुधारणांचा स्वातंत्र्यसंपादनाशीं उघड संबंध दिसतो, त्यांच्या संबंधाने विचार करूं. जातीजातीमध्ये, समाजासमाजामध्ये एकोपा स्थापित झाला म्हणजे राष्ट्राची एकजूट होईल आणि त्यामुळे स्वातंत्र्यसंपादन सुलभ होईल, हा सिद्धांत कुणालाहि पटण्याजोगा असाच आहे. त्याच कारणास्तव अस्पृश्यतानिवारणाची आवश्यकताहि उघड दिसणारी आहे. जातीजातींतील एकोप्याचें सर्वोत्तम स्वरूप म्हणजे जातिभेद नष्ट करणें, त्यापेक्षा खालच्या पायऱ्या म्हणजे जातिविषमता कमी करणें, उच्चनीचभाव नाहीसा करणें, इत्यादि. रानडे आगरकर प्रभृति सुधारकांनी यद्यपि व्यक्तिसमतेचें तत्त्व प्रतिपादिलें होतें, आणि जातिभेदाची अनिष्टता वर्णिली होती, तथापि या सुधारणांचा हिरिरीने त्यांनी प्रचार केला असल्याचें दिसत नाही. पांढरपेशा वर्गातील स्त्रियांच्या परवश, कष्टमय स्थितीसंबंधाने जसें त्यांनी वारंवार तळमळीने लिहिलें तसें जातिवैषम्याबाबत लिहिलेलें दिसत नाही. मध्यंतरींच्या काळांत अनेक सामाजिक व आर्थिक कारणांमुळे जातिविषमता, उच्चनीचतेची भावना वाढतच गेली. याचा अर्थ, पारतंत्र्याचे वळसे जसजसे जास्त बसत गेले तसतशी, या बाबतींत तरी, सामाजिक सुधारणेची पीछेहाट होत गेली, असा सरळ होतो. पण पुढे स्वातंत्र्याची चळवळ जसजशी जोरावली, संग्रामाची आघाडी विस्तृत झाली, तसतशी जातीजातींच्या ऐक्याची नौबत झडली; जातिवैषम्य

* तपशीलवार विवेचन प्रस्तुत पुस्तकाच्या ७ व्या प्रकरणांत पहा.

अनुक्रमणिका

निरासाचें कार्य एकदम पुढे सरसावलें. स्वातंत्र्यसंपादनानंतर गेल्या नऊ वर्षांत याबाबत कसे नेटाचे प्रयत्न होत आहेत हें आपण पाहतच आहों. म्हणजे यासंबंधांत 'स्वाभिमान, हुरूप, स्वराज्यनिष्ठा इत्यादि गुण जिथे वसत असतात, त्या ठिकाणीं सुईच्या मागे जसा दोरा तद्वत सामाजिक सुधारणाहि मागोमाग येत असतात' हें लोकमान्य टिळकांचें म्हणणें खरें ठरलें.

अस्पृश्यतानिवारणाची गोष्ट अशीच. महर्षि अण्णासाहेब शिंदे आणि इतर कांही मंडळी यांनी आपलीं आयुष्यें या कार्याकरिता वेचिलीं. त्यांना यश आलें, पण फार मर्यादित. महात्मा गांधींनी स्वातंत्र्यसंपादनाच्या कार्यक्रमांत एक कलम म्हणून तें गोवून दिलें. स्वातंत्र्य-संपादनाच्या हुरुपांत त्याचा समावेश झाल्यामुळे त्याचा वेग एकदम वाढला. अस्पृश्यता नष्ट केल्याचें कलम घटनेंत घालण्यांत आलें आणि स्वातंत्र्यसंपादनानंतर या कार्याची प्रगति अधिक त्वरेने होत आहे.

आर्थिक व भौतिक परिस्थितीमुळेहि सुधारणा होत असतात. या खरोखर सुधारणा म्हणून होत नसून परिस्थितीने भाग पाडल्यामुळे होणारें अवस्थांतर असतें. आगगाडी, आगबोट, मोटार या प्रवाससाधनांमुळे सोवळें-ओवळें, शिवाशिव, मुहूर्तनक्षत्र इत्यादि अनेक चालींचें बंड कसें मोडलें हें सांगावयास नको. पण हें विचारपूर्वक झालें नसल्यामुळे खाण्यापिण्यांतील अस्वच्छता व बकाली-पणा यांत वाढ झाली हा दुष्परिणामहि घडला. विवाहाचें उदाहरण असेंच. ब्राह्मणादि जातींतील मुलामुलींच्या विवाहाचीं वयें वाढलीं तीं मुख्यतया आर्थिक परिस्थिती-मुळे, आगरकरादि सुधारकांच्या आक्रोशामुळे नव्हे. या प्रवाहपतितत्वामुळे वृद्धा कुमारींचा अथवा असंमत कौमार्याचा बिकट प्रश्न समाजापुढे उभा राहील की काय असें वाटूं लागलें आहे.

बुद्धिवाद आणि अध्यात्म

'मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन' हें जें आगरकरांनी वर्णिलेलें सर्व सुधारणेचें साध्य त्याच्याविषयी थोडासा विचार करूं. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सुख-समृद्धीच्या शिखरावर पोचलेल्या इंग्लंडमधील मिल, स्पेन्सर इत्यादि तत्त्वज्ञांनी जीं तत्त्वें प्रतिपादिलीं त्यांचें हितकारकत्व आगरकरांना पटलें आणि तीं तत्त्वें त्यांनी स्वसमाजाला उपदेशिलीं.

मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन म्हणजे काय? 'ऐहिक', म्हणजे या जगांतील, हा शब्द वापरून आगरकरांनी पुनर्जन्म, परलोक, मेल्यानंतर सद्गति इत्यादि कल्पनांचा त्याग केला आहे हें उघड आहे. मेल्यानंतर आत्म्याचें अस्तित्व मानण्यास कांही आधार नसल्यामुळे ते यासंबंधाच्या सर्व धर्मांमधल्या स्वर्ग, नरक इत्यादि कल्पना मानण्यास तयार नाहीत, त्याचप्रमाणे हिंदु व बौद्ध धर्मांतील कर्मविपाक व पुनर्जन्म यांसंबंधीचे सिद्धान्त मानण्यास तयार नाहीत, हें स्पष्ट आहे. पण जन्मा-अगोदरच्या आणि मेल्यावरच्या स्थितीचा विचार जरी बाजूला ठेवला तरी, या जगांतल्या सुखाविषयी मनुष्यांच्या कल्पना अत्यंत परस्परभिन्न किंबहुना परस्परविरोधी असूं शकतात. दरमहा ४० रुपये पगारावर देशबांधवांना सद्विचार शिकविण्याकरिता हाडें झिजविणाऱ्या आगरकरांचें सुख आणि महालामध्ये मदिरेने धुंद होऊन विलासिनींच्या अंगसंगांत लोळणाऱ्या धनाढ्याचें सुख यांच्यांत जमीन-अस्मानाचें अंतर आढळून येतें. मग कोणच्या सुखाचें वर्धन करणें हा मनुष्याने आपला धर्म मानावयाचा? कोम्ट याने आपल्या पॉझिटिव्हिस्ट तत्त्वज्ञानामध्ये आणि स्पेन्सरने आपल्या समाजशास्त्रीय तत्त्वज्ञानामध्ये याचें उत्तर असें दिलें आहे की जड सृष्टीच्या व्यापारांचें अधिकाधिक ज्ञान होऊन मनुष्याची भौतिक परिस्थिति जशी सुधारत जाईल तशा त्याच्या मनोवृत्तीहि विकसित होत जाऊन त्या अधिक उन्नत, परहितप्रवण होतील आणि पूर्वी परलोकांतील शिक्षेच्या किंवा देवादिकांच्या अवकृपेच्या भीतीने जे नीतिनियम तो आचरीत होता, ते नीतिनियम तो अखिल मानवजातीचें कल्याण हें परमोच्च ध्येय मानून त्या प्रीत्यर्थ आचरूं लागेल. याच विचारास अनुसरून आगरकर मनुष्याच्या धर्मविचारांसंबंधी लिहितांना आपल्या देवभोळ्या देशबांधवांस उद्देशून म्हणतात.—

"...थोड्या वर्षांत तुमचे देव मनुष्यापासून व पिशाचापासून निघाले आहेत अशी बहुतेकांची खात्री होऊन जाईल इतकेंच नाही, तर तुमच्या धर्माचारांतहि प्रचंड क्रांति होऊन तुमचें वर्तन पराकाष्ठेचें साधें व फक्त नीतीच्या नियमांनी.

अनुक्रमणिका

चालणारें असें होईल... आणि सत्यपरायणता, न्यायरति, परोपकृति आणि शहाणपण इत्यादि सद्गुणांची वृद्धि होऊन लोकांना आतापेक्षा शतपट अधिक सुख मिळूं लागेल. "*

पण तथ्यवादी किंवा विकासवादी शास्त्रज्ञांची ही विचारसरणी सर्व प्रश्नांचें उत्तर देऊं शकत नाही, ही जाणीव लोकमान्य टिळकांच्या मनांत उत्पन्न झाली. एकतर सृष्टीला विकासतत्त्व लागू आहे हा सिद्धांत ज्याप्रमाणे डार्विनने स्थापित केला, त्याप्रमाणे मानवी मनोवृत्ति देखील विकाससिद्धांताच्या अधीन आहेत हें कोणास शाबीत करतां आलेलें नाही. तसेंच इंद्रियभोगाने मिळणारें सुख हें परोपकार, सत्य इत्यादि तत्त्वांच्या आचरणाने मिळणाऱ्या सुखापेक्षा हीन कां मानायचें याचेंहि समाधानकारक उत्तर निर्भेळ ऐतिहासिकतावाद्यांना देतां येत नाही. आपल्या भोवतालचे लोक मोठमोठ्या नोकऱ्या पतकरून सुखांत राहताहेत हें दिसत असूनहि आगरकरांसारखा मनुष्य आपल्या देशबांधवांकरिता त्याग कां करितो ? अंतःप्रेरणेमुळे तो असें करतो असें म्हटलें तर ऐहिकतेला बाध येतो. एक प्रकारें आपण आत्मतत्त्वाला मान्यता देतों असें होतें. दुसरें असें की सत्य कोणचें, नीति कोणची याविषयीं पुष्कळ वेळां प्रश्न पडतो. धर्म अधर्म, कार्य अकार्य याची गुंतागुंत सुटत नाही. एकाला जें सत्य वाटतें तें दुसऱ्याला असत्य वाटतें; इतकेंच नव्हे, तर एकाच व्यक्तीला पुढे दिसणाऱ्या दोन नैतिक कर्तव्यांपैकी ग्राह्य कोणतें व अग्राह्य कोणतें याचा निर्णय करतां येत नाही. तेव्हा निवळ ऐहिकता आणि निवळ बुद्धिवाद हे नीतिन्यायादिकांच्या अंतिम कसोटीच्या दृष्टीने पंगु ठरतात, असें टिळकांचें म्हणणें आहे. ही कार्याकार्यव्यवस्थिति आपल्या उपनिषदांच्या परंपरेंतून आलेल्या अध्यात्माच्या आधारें भगवद्गीतेंत केलेली असून गीतेंत वर्णिलेल्या कर्मयोगाच्या सिद्धांतामुळेच नीतिशास्त्राला खरा शाश्वत आणि समाधानकारक आधार मिळतो. हेंच 'गीतारहस्य किंवा कर्मयोगशास्त्र' या आपल्या युगप्रवर्तक ग्रंथांत लोकमान्यांनी प्रतिपादिलें आहे. अखिल विश्व हें चैतन्य तत्त्वाचा किंवा परब्रह्माचा आविष्कार असून आपला आत्मा आणि हें विश्वचैतन्य दोन्ही एकरूप होत. या विश्वात्मैक्याचा साक्षात्कार झाला म्हणजे बुद्धि वासनारहित निरहंकार होऊन राग, द्वेष इत्यादि द्वन्द्वांपासून विमुक्त होते. अशा अनासक्त अनहंकार बुद्धीला आपलें कर्तव्य काय, अकर्तव्य काय, सत्य काय, असत्य काय याचा बोध होतो. यावरून शुद्ध निष्काम व सर्वाभूतीं सम झालेली अतएव फलासंगविरहित बुद्धि हेंच काय तें गीतेंत वर्णिलेलें सदाचरणाचें मूळ होय असें सिद्ध होतें. अशा निष्काम बुद्धीने लोकसंग्रहार्थ आमरणान्त कर्में करीत राहणें हेंच गीतेंतील सर्व उपदेशाचें सार होय. हें गीतेचें सारतत्त्व जाणून घ्या आणि भारताच्या उद्धारासाठी निष्काम कार्यकर्ते व्हा,

उत्तिष्ठत जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत ।

असा लोकमान्यांचा नव्या पिढीस उज्ज्वल संदेश आहे.

केवळ बुद्धिवाद हा मानवी जीवनांतील नीतिअनीतीचे, कार्याकार्याचे गहन प्रश्न सोडविण्यास असमर्थ ठरतो. तो विचारवंतांचें पूर्ण समाधान करूं शकत नाही. त्याच्या पलीकडे अध्यात्म आहे. बुद्धिवाद कुंठीत होतो तिथें अध्यात्म आपलें समाधान करूं शकतें हें लोकमान्यांनी दाखवून दिलें. अध्यात्माची किंचित छटा आगरकरांनाहि स्पर्शून गेली असावी असें त्यांच्या पुढील उद्गारांवरून वाटतें.

" ...आणि कांही वेळ सर्व ब्रह्मांडास उत्पन्न करून त्याचें परिपालन व नाश करणाऱ्या अशा एका परमात्म्याच्या कल्पनेचा उदय होतो. पण पुढे वेदांतविचाराच्या कुंडांत पेटलेल्या अग्नींत हें द्वैतहि खाक होऊन जातें आणि **अहं ब्रह्मास्मि** एवढा अनिर्वचनीय विचार मागे राहतो ! व्यक्तींच्या व राष्ट्रांच्या धर्मविचारांचा हा कळस आहे. एथपर्यंत ज्याची मजल आली त्याला सर्व धर्म तुच्छ आहेत. "*

अध्यात्म हें याप्रमाणे मानवी जीवनाचें अंतिम नियामक असलें, तरी मनुष्यांच्या सामान्य व्यवहारांमध्ये त्याची बुद्धि किंवा सारासार विचारशक्ति हीच योग्य मार्गदर्शन करते. रूढि, श्रद्धा, अंधभावना इत्यादिकांच्या

* निबंधसंग्रह, भाग २, पान ६१७.

* निबंधसंग्रह, भाग २, पान ६२०.

अनुक्रमणिका

योगाने बुद्धीला झाकोळून टाकणें हें केव्हाहि योग्य नाही, स्वतंत्र अनिर्बंध रीतीने तिला विचार करूं देणें हें अवश्य आहे, या आगरकरांच्या म्हणण्याला बाध येऊं शकत नाही. किंबहुना अध्यात्म हें देखील बुद्धीच्या विचारसामर्थ्यांचेंच फळ आहे. लोकमान्य देखील आगरकरांइतकेच बुद्धिवादी होते. कोणत्याहि प्रश्नाचा विचार ते तर्कनिष्ठ रीतीने करीत असत. खुद्द गीतारहस्यांतील प्रतिपादन बुद्धिवादाचीच कास धरून तर्कनिष्ठ पद्धतीने केलें आहे. बुद्धि अथवा विचारशक्ति हें मानवाला प्राप्त झालेलें सर्वश्रेष्ठ साधन होय. त्याच्या उपयोगानेच मानवाने आजपर्यंत प्रगति केली आहे व पुढेहि करील.

या दोघां थोर पुरुषांच्या जीवनकार्याचें आणि त्यांच्या विचारसंपदेचें अगदी त्रोटक समालोचन एथवर केलें; एवढयाशा अवकाशांत सर्व तपशील, सर्व मुद्दे किंवा सर्व शाखा यांचा परामर्श घेणें शक्य नव्हतें. तथापि दोघांच्याहि व्यक्तिमत्वाची आणि त्यांच्या प्रधान जीवितकार्याची यथातथ्य कल्पना आणून देण्यास प्रस्तुत पुस्तकांतील विवेचन उपयोगी पडेल असें वाटतें.

दोघांच्या जीवनापासून एक निषेधात्मक धडा सर्वांनी घ्यावा असें इथे आवर्जून सांगावेंसें वाटतें. तो एकमेकांवर करावयाच्या टीकेच्या बाबतींत होय. या दोघांनी स्वमताभिनिवेशाच्या भरांत एकमेकांवर जी टीका केली ती, आपण काय करूं नये, हें जाणण्यासाठी डोळयासमोर वागवावयाचें उदाहरण म्हणून घ्यावी. मतभिन्नता दर्शवितांना मतांबद्दलच साधक बाधक काय असेल तें बोलावें. आडून केलेली वैयक्तिक टीका, टोचून लिहिणें, उखाळया-पाखाळया असले प्रकार निर्धाराने वर्ज करावे. अशा प्रकारांनी मराठी जनतेचें आजवर अतोनात नुकसान झालें आहे.

टिळक आगरकरांच्या चरित्रापासून काय घ्यावें याचें विवरण इथे करणें बऱ्याच अंशीं पुनरुक्तिरूप होईल. आतापर्यंतच्या समालोचनांत दोघांच्याहि विशिष्ट गुणांचा त्या त्या ठिकाणीं उल्लेख केलेला आहे. एक विचार सर्वांच्या मनांत प्रबळ व्हावयास पाहिजे. आपल्याला मिळालेलें स्वातंत्र्य आणि आपण स्थापिलेली लोकशाही आपल्याला टिकवावयाची आहे, संवर्धित करावयाची आहे. या कार्यासाठी दोघांच्या जीवनांत प्रकट झालेल्या सर्व गुणांचा आज उपयोग आहे. त्याग, निर्भयता, धैर्य, स्वावलंबन, देशाभिमान इत्यादि गुणांची जरूरी त्या काळांत जितकी होती तितकीच आज आहे. पोटांत लोभ आणि ओठीं त्याग असा दंभ नको आहे. तो केव्हाहि वाईटच, पण आजच्या स्थितींत फारच घातक होणारा आहे. टिळक आगरकरांच्या उदाहरणावरून आजच्या घटकेस सर्वांत अधिक उपयोगी गोष्ट कोणची शिकण्याजोगी असेल तर ती ही आहे. त्यांना जें इष्ट वाटलें तें त्यांनी सांगितलें आणि साध्य झालें तें केलें. आंत एक बाहेर एक असा प्रकार कधीहि केला नाही. आज कार्य निराळें आहे. पण तें करण्यास या महात्म्यांचाच गुणसमुच्चय आजहि आपणास उपयोगी पडणार आहे. तेव्हा —

उत्तिष्ठत जाग्रत । प्राप्य वरान् निबोधत ।

'उठा, जागे व्हा, आणि या महात्म्यांच्यापासून त्यांचे गुणरूपी वर मिळवून बुद्धि विशुद्ध करा' एवढेंच सांगावयाचें आहे.

अनुक्रमणिका

टिळकांचा कर्मयोग सिद्धान्त

ले. प्रा. नारायणशास्त्री द्रविड

ज्याप्रमाणें गणित, इतिहास वगैरे विषयांत टिळकांनी अन्वेषण केलें आहे तसेंच अध्यात्माच्या क्षेत्रांतहि पौरस्त्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र या गहन विषयांचें तौलनिक परिशीलन करून गीतेचें कर्मयोगपर व असांप्रदायिक विवेचन करणारा गीतारहस्य हा ग्रंथ लिहून भारतीय वाङ्मयांत आढळून येणारी नीतिशास्त्रीय ग्रंथांची उणीव त्यांनी भरून काढली आहे. गीतेवर सांप्रदायिक दृष्टीने लिहिलेल्या अनेक व्याख्या आहेत; पण त्या सर्व पक्षपातयुक्त असल्यामुळे गीतेचें खरें मर्म त्यांनी स्पष्ट केलें नाही. गीतेची अद्वैतसिद्धांताप्रमाणे व्याख्या करणारे शंकराचार्यहि गीतेचें प्रतिपाद्य कर्मयोग नसून कर्मसंन्यासच–निष्काम कर्मयोग नव्हे–आहे अशा सांप्रदायिक निष्कर्षापलीकडे जाऊं शकले नाहीत. वास्तव गीतेसारख्या ग्रंथाची व्याख्या करतांना सांप्रदायिक दृष्टि बाळगणें बरोबर नाही असें लिहून टिळकांनी गीतारहस्याच्या सुरवातीलाच आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. आपल्या विधानाच्या पुष्टीसाठी टिळकांनी मीमांसा व इतर शास्त्रांच्या–विशेषेंकरून वेदान्त व उपनिषदांतील–युक्तिवादाचा आश्रय घेतला आहे.

गीतेवर व्याख्या करणाऱ्या अनेक आचार्य व तत्त्वज्ञांत टिळक व शंकराचार्य यांच्या विचारांत जितका विरोध दिसतो तितका सहसा कोणाहि विचारकांच्या विचारांत आढळत नाही. शंकराचार्य अद्वैत संप्रदायाचे स्थापक व जवळ जवळ ७ व्या शतकांतले असल्यामुळे टिळक व शंकराचार्य यांच्या मतभेदाचा विचार करणाऱ्या लोकांचें लक्ष्य प्रथम शंकराचार्यांच्या प्रतिष्ठेकडे वळतें व त्यामुळे टिळकांचे विचार दुराग्रहमूलकच आहेत अशी त्यांची कल्पना बनते. शंकराचार्यांसारख्या महनीय व्यक्तीचा विरोध –वैचारिक असला म्हणून काय झालें–करणें हें महत्पाप व मूर्खपणाचें आहे असें आचार्यांच्या अनुयायांना वाटणें व त्याप्रमाणे त्यांनी गीतारहस्यावर झोड उठवणें हें अगदी साहजिकच आहे. यावरून तात्त्विक विचारांचें महत्त्व आकलन करण्यासाठी 'तो विचार चुकीचा कां असेना–विचारकाच्या मनांत कसा उद्भवला त्यांत थोडें तरी तथ्य असलें पाहिजे' अशा प्रकारचें बौद्धिक औदार्य बाळगणें अत्यंत आवश्यक आहे असें रसेलचें म्हणणें पूर्णपणे पटतें. भारतीय दर्शनांच्या इतिहासांत या औदार्याचें प्रत्यंतर पदोपदीं येतें. एकमेकांना 'देवानां प्रिय' 'श्लाघनीयप्रज्ञो मातापितृमानसि' अशीं व्यंगपूर्ण संबोधनें लावणारे बौद्ध व आस्तिक दर्शनकार एकमेकांच्या मतांचें खंडन करण्यासाठी सबंध आयुष्य खर्ची घालून मोठमोठाले शास्त्रीय ग्रंथ लिहीत असत. ही परंपरा अलीकडे जवळ जवळ लुप्त झाल्यामुळे नव्या विचारांचें नावीन्य परंपरेला चिकटून राहणाऱ्या लोकांना पटवणे फार कठीण झालें आहे.

गीतेसंबंधी टिळकांचें जें म्हणणें आहे त्याचा शांतपणें विचार केला तर कोणाहि निष्पक्षदृष्टीच्या व्यक्तीला त्यांत बरेंच सत्य आहे असें वाटल्यावाचून राहणार नाही. टिळकांनी गीतारहस्याच्या सुरवातीला आपली जी भूमिका मांडली आहे ती त्यांनी शेवटपर्यंत फारच–बौद्धिक–सचोटीने निभावली आहे. या उलट शंकराचार्यांनी आपला कर्मसंन्यासवाद गीतेवर मढवण्यासाठी ठिकठिकाणीं शब्दार्थाची होईल तितकी ओढाताण केली आहे. शंकराचार्यांच्या उपनिषद्भाष्यांत ही ओढाताण फारच जास्त दिसून येते.

अनुक्रमणिका

कित्येक उपनिषदांच्या सुरवातीलाच प्रसंग व कारण नसतांहि ज्ञान कर्म विरोध सिद्ध करण्याचा आचार्यांचा अभिनिवेशच त्यांच्या कर्मसंन्यासविषयक आग्रहाचें फार मोठें प्रमाण आहे. गीता किंवा उपनिषदें यांच्यावर टीका लिहितांना आचार्यासारख्या टीकाकाराला यत्किंचितहि अभिनिवेश बाळगण्याचें कांही कारण नव्हतें. पण तसें जें त्यांनी केलें त्यावरूनच त्यांचें मत गीता किंवा उपनिषदें यांना परिपूर्ण अभिप्रेत नाही असें दिसून येतें.

शिवाय शंकराचार्यांच्या युक्तिवादांत एक फार मोठा व्यावहारिक विरोध दिसून येतो. तो असा : अद्वैतमताची आपल्या महनीय ग्रंथांच्या द्वारें स्थापना करणारे शंकराचार्य ज्ञानी होते हें आपोआपच सिद्ध होतें. कारण तसे ते नसते तर त्यांनी द्वैताचा विरोध केला नसता. पण असे ज्ञानी शंकराचार्य मोठमोठे ग्रंथ लिहितात, शिष्यांना उपदेश करतात व अद्वैताचा प्रचार करतात हें कसें काय? ज्ञानप्राप्तीनंतर ज्ञान्याने सर्व कर्में सोडलींच पाहिजेत, असा शंकराचार्यांचा आग्रह त्यांच्या बाबतींतच फोल ठरतो व म्हणून त्यांचें मत अंशतः तरी अव्यवहार्य आहे असें म्हणावें लागतें.

गीतेचें वास्तविक प्रतिपाद्य कर्मसंन्यास नाही हें शंकराचार्यांस माहित नव्हतें असें म्हणणें फार धाडसाचें व चुकीचें होईल. गीता, किंवा उपनिषदें यांच्या वास्तविक तात्पर्याबद्दल शंकराचार्यांना स्पष्ट कल्पना असून देखील त्यांनी आपलें मत या ग्रंथांतून काढून दाखवण्याचा जो प्रयत्न केला तो ग्रंथविपर्यासाच्या वाईट हेतूने नव्हे, तर कर्मसंन्यासवाद व अद्वैतमत यांच्या पूर्ण तर्कशुद्धतेच्या विश्वासानें. द्वैतमतें अद्वैतापुढे टिकाव धरूं शकत नाहीत व अद्वैताचें तत्त्वज्ञानच कसें तर्कसंगत व विवेकबुद्धीला पटणारें आहे हें आपल्या ब्रह्मसूत्रभाष्यांच्या सुरवातीला व तर्कपादांत सिद्ध करून दाखवून मग ते ब्रह्मसूत्रें, उपनिषदें व गीता यांच्याशीं कसें जुळतात हें दाखवण्याचा शंकराचार्यांनी प्रयास केला आहे. यावरून त्यांच्या विचारसरणींतील बुद्धिवादाचें प्राधान्य व वचनप्रामाण्याचें गौणत्व स्पष्टपणे दिसून येतें. शंकराचार्यांना प्रथम अद्वैत सिद्धांत स्थापावयाचा होता. त्याच्या अनुषंगानेंच त्यांना प्रस्थानत्रयीवर भाष्यें लिहावयाचीं होतीं. आपलें मतस्थापनेचें कार्य त्यांना स्वतंत्र ग्रंथ लिहून जरी फार चांगलें करतां आलें असतें तरी भारतीय दर्शनकारांच्या रूढीप्रमाणे त्यांनी परंपरागत विचारांशीं आपला संबंध जाहीर करण्यासाठी तत्कालीन शास्त्रीय रिवाजाप्रमाणे प्रस्थानत्रयीवर भाष्यें लिहिलीं. श्री. राधाकृष्णन् यांनी आपल्या भारतीय दर्शनेतिहासाच्या विषयप्रवेशांत म्हटल्याप्रमाणे बहुतेक सर्व मोठमोठ्या भारतीय तत्त्वज्ञांनी अशा पद्धतीनेंच वैचारिक मौलिकता व बुद्धिवाद यांची वचनप्रामाण्य किंवा परंपरेशीं सांगड घालून विचारपरंपरा आजपर्यंत कायम राखली.

म्हणून पूर्वीपासून चालत आलेल्या विचारप्रदर्शन पद्धतीचाच पुरस्कार केलेला असल्याने शंकराचार्यांना ग्रंथविपर्यासाचा दोष लावणें अगदी चुकीचें होईल. उलट असेंहि म्हणणें शक्य आहे की गीता, उपनिषदें यांसारख्या ग्रंथांचें अमुक तात्पर्य नाही असें विधान पूर्णपणे तर्कशुद्ध नाही. गीतेंतून कर्मयोग निष्पन्न होतो हें टिळकांचें म्हणणें जसें सयुक्तिक आहे तसेंच गीतेचा अर्थ कर्मसंन्यास आहे हें आचार्यांचें म्हणणेंहि बरोबर आहे. गीता. इ. स. पूर्वीची व म्हणून शास्त्रीय वाङ्मयनिर्मितीच्या फार पूर्वीच्या काळांतली असल्यामुळे तिच्यांत तर्क व बुद्धिवादापेक्षा उपदेश व अन्तर्दृष्टि यांना जास्त प्राधान्य आहे. म्हणून तात्पर्य ठरवण्याच्या मीमांसेच्या शास्त्रीय कसोटीवरून तिचा अर्थ ठरवणें फारसें बरोबर म्हणतां येत नाही. कर्मयोग सिद्धान्त सिद्ध करण्यासाठी टिळकांनी जीं प्रमाणें दिलीं आहेत त्यांतलें पहिलें व महत्त्वाचें प्रमाण मीमांसाशास्त्राचें आहे. मीमांसेंत तात्पर्य ठरवण्याची उपक्रम, उपसंहार, अभ्यास, अपूर्वता, फल, अर्थवाद व उपपत्ति अशीं सात गमकें सांगितलीं आहेत. त्यांचा गीतेवर प्रयोग करून पाहिला तर कर्मयोग सिद्धान्तच गीतेचा खरा अभिप्राय ठरतो असें टिळकांचें म्हणणें आहे. पण गीतेच्या अद्वैतपर वचनांचा विचार केल्यास त्यांची कर्मयोगाशीं सांगड घालणें किती कठीण आहे हें निष्पक्ष वाचकांच्या लक्षांत आल्याशिवाय राहात नाही. खरें पाहूं गेलें असतां गीतेंत सर्व मतांचा

अनुक्रमणिका

समावेश–कमी जास्त प्रमाणांत कां होईना–आहे आणि या एका गोष्टींतच गीतेच्या सार्वकालिक आकर्षणाचें व महत्त्वाचें बीज आहे असें मानणेंच जास्त बरोबर वाटतें. म्हणून कोणत्याहि मताच्या बंधनांत गीतेला बांधून टाकणें रास्त वाटत नाही.

टिळकांचें कर्मयोग समर्थनपर जें दुसरें प्रमाण आहे तें कर्मयोग व कर्मसंन्यास यांची युक्तायुक्तता ठरवण्याच्या दृष्टीनें जास्त महत्त्वाचें आहे. शंकराचार्यांच्या मताविरुद्ध टिळकांचें म्हणणें असें आहे की ज्ञानप्राप्तिनंतर देखील कर्म करणें शक्य आहे. कारण देहाच्या जीवनधारणोपयोगी श्वासोच्छ्वासादि क्रिया (ज्ञानप्राप्तीनंतर देखील) ज्याप्रमाणे चालू राहतात, त्याचप्रमाणे लोकसंग्रहाच्या उद्देशाने इतर–लोकांना मार्गदर्शन करणाऱ्या–क्रियाहि चालू राहूं शकतात. कृष्णांनी आपलाच दाखला देऊन कर्तव्यकर्म करीत राहणें हें उचितच आहे असा अर्जुनास स्पष्ट उपदेशच केला आहे. म्हणून ज्ञानाचा कर्माशीं विरोध नाही इतकेंच नव्हे तर देह असेपर्यंत कर्म कोणालाहि चुकत नाही. शंकराचार्यांचें यावर असें म्हणणें आहे की ज्ञानानन्तर स्वाभाविक कर्में सुटत नसलीं तरी ऐच्छिक कर्में सुटतात. निष्कामकर्म देखील कर्तव्य भावनेनेच करावयाचें असल्यामुळे तें सोडल्याशिवाय सर्व भावना व वासनांचा त्यागरूप जो संन्यास तो पूर्ण होऊं शकत नाही. म्हणून ज्ञान व कर्म यांचा समन्वय शक्य नाही. शिवाय, अज्ञाननिवृत्तीला देखील अविद्या म्हणून लेखणाऱ्या अद्वैतसिद्धान्ताप्रमाणे सर्व प्रकारचीं कर्मे बुद्धिप्रेरित व त्यांना प्रेरणा देणारी बुद्धि यांचा पूर्ण नायनाट झाल्याशिवाय ज्ञानोदयाला सुरवातच होत नसल्यामुळे शंकराचार्यांना ज्ञानकर्मसमुच्चय असंभव वाटतो.

यावर असा प्रश्न उद्भवतो की ज्ञानप्राप्तीनन्तर सर्व ऐच्छिक कर्में बन्द पडलीं तर देहधारणा कशी होऊं शकते ? हा आक्षेप अद्वैत्यांनाच लागूं पडत नसून सांख्य दर्शनाला देखील लागू पडतो व त्याचें सर्वांनी जवळ जवळ सारखेंच उत्तर दिलें आहे. तें असें की कुंभाराने चाकाला एकदा जोराची गति दिली की तें जसें मडकें तयार झाल्यावरहि आपल्या वेगानेच, कांही वेळ चालत राहतें तसेंच सर्व अज्ञानांचा नाश होऊन ज्ञानोदय झाल्यावर कोणत्याहि प्रेरणेच्या अभावीं देखील प्रारब्धामुळे किंवा स्वसंस्कारामुळेच ठराविक काळापर्यंत शरीराच्या जीवनोपयोगी सर्व क्रिया चालू राहतात व तदनन्तरच देहपात होतो. ज्ञानप्राप्ति व शरीरपात यांच्या मधल्या काळांत ज्ञानी पुरुषाची जी अवस्था असते तिचें हुबेहुब वर्णन गीतेंतील स्थितप्रज्ञ विवेचनांत सापडतें. दुसऱ्या अध्यायांत 'प्रजहाति यदा कामान्' पासून 'तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता' पर्यंत ज्या स्थितप्रज्ञ अवस्थेचें वर्णन केलेलें आहे तशा अवस्थेप्रत पोचलेल्या महापुरुषाला निष्काम कर्मयोग शक्य आहे काय हा एक मानसशास्त्रीय–किंवा असामान्य मानसशास्त्रा-(abnormal psychology) चा प्रश्न आहे. मोठमोठ्या सत्पुरुषांच्या जीवनावरून या प्रश्नाचें उत्तर ठरवावयाचें असल्यास असेंच म्हणावें लागेल की स्थितप्रज्ञांची भूमिका जगाचें कल्याण करणाऱ्या सत्पुरुषांच्याहि वरची भूमिका आहे. हे सत्पुरुष स्थितप्रज्ञतेच्या मार्गावर असतात पण स्थितप्रज्ञ झालेले नसतात. लोकांचें कल्याण केलें पाहिजे अशी त्यांना प्रेरणा देणारी परोपकार बुद्धि देखील अद्वैताच्या दृष्टीने अज्ञानांतच मोडते. जेव्हा हें शेवटी उरलेलें देखील अज्ञान नष्ट होतें तेव्हाच ज्ञानोदय होतो असें शंकराचार्यांचें मत आहे. हें मत मान्य केल्यास अद्वैताचा उपदेश करणारे आचार्य देखील किंचित् अज्ञानीच ठरतात व म्हणून मागे दाखविलेला व्यावहारिक विरोध त्यांना पत्करणें भाग आहे. ज्ञानाचा हा अर्थ घेतल्यास अर्जुनाला टिळकांनी म्हटल्याप्रमाणे 'ज्ञानी' मानणें बरोबर ठरणार नाही. अर्जुन खरोखरच ज्ञानी असता किंवा गीतेच्या उपदेशाने ज्ञानी झाला असता तर युद्धानन्तरचा महाभारतांत वर्णिलेला त्याचा जीवनक्रम अगदी निराळ्या प्रकारचा झाला असता. शिवाय अर्जुनच एकदा कृष्णाला म्हणतो की 'युद्धाच्या वेळीं तुम्ही उपदेशिलेली गीता मी विसरलों, कृपा करून फिरून तिचा उपदेश करा.' यावर कृष्ण आपली असमर्थता व्यक्त करून गीतेचा सारांश अनुगीते(?) च्या रूपाने अर्जुनाला सांगतात.

या विवेचनांतून कांही निष्कर्ष स्पष्टपणे काढतां येतात. पहिला निष्कर्ष असा की गीता शास्त्रीय व

सांप्रदायिक ग्रंथ नाही. म्हणून कोणतीहि शास्त्रीय कसोटी लावून त्याचा अमुकच अभिप्राय आहे असें ठरवणें अगदी चुकीचें नसलें तरी अगदी बरोबर नाही. गीतेच्या व्यापक व अष्टपैलू तत्त्वज्ञानांतच तिचें महत्त्व व वैशिष्ट्य सामावलेलें आहे. गीतेला संप्रदायबद्ध किंवा मतबद्ध करणें तिच्या स्वरूपा (spirit) च्या विरुद्ध आहे. या निष्कर्षांतूनच निघणारा दुसरा निष्कर्ष असा की गीतेची उपयोगिता विशेषतः व्यावहारिक जरी असली तरी तिचा उपयोग ज्ञानी माणसाचा कर्मसंन्यासपर जीवनक्रम निर्धारित करण्यासाठी देखील करतां येऊं शकतो. याचा अर्थ असा की टिळकांचें मत जरी गीतेला बव्हंशीं मान्य असलें तरी शंकराचार्यांचा कर्मसंन्यासवाद गीतेला अगदीच अमान्य आहे असें म्हणणें बरें नाही. तिसरा निष्कर्ष असा की गीतेला काय मान्य आहे हा विचार बाजूला सारून ज्ञानोत्तर कर्म शक्य आहे किंवा नाही ह्या प्रश्नाचा तात्त्विक विचार केला तर शंकराचार्यांचें नकारात्मक उत्तर जास्त तर्कशुद्ध आहे असें म्हणावें लागेल. चौथा व शेवटचा निष्कर्ष असा की गीतेंत सांगितलेला कर्मयोग निष्काम कर्मयोगाहून निराळा नाही (सकाम कर्म गीतेच्या परिभाषेप्रमाणे कर्मयोग ठरत नाही) व तो प्रवृत्तिमार्ग किंवा कर्ममार्ग आहे. पण त्याहून निराळा जो ज्ञानमार्ग किंवा सांख्ययोग, तो निराळा मार्ग किंवा निष्ठा असल्यामुळे त्याचा अन्तर्भाव निष्काम कर्मयोगांत करणें चुकीचें ठरतें. ज्ञानोत्तरहि कर्म आवश्यक मानल्यास ज्ञानापेक्षा कर्मालाच प्राधान्य दिल्यासारखें होतें. मग 'लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा' असें गीतावचन व परम्परागत ज्ञान व प्रवृत्तिमार्गाचा विभाग चुकीचा ठरतो. म्हणून ज्ञानाला ज्ञानमार्गांत शंकराचार्यांनी दिल्याप्रमाणे पूर्ण प्राधान्य दिलें पाहिजे. तसेंच कर्ममार्गांत कर्मयोगाला, टिळकांनी दिल्याप्रमाणें पूर्ण प्राधान्य द्यावयास हवें. कर्मक्षेत्रांत ज्ञान (म्हणजे फलासक्तिविरहित कर्तव्यबुद्धि) जसें सहायक ठरतें तसें ज्ञानक्षेत्रांत कर्महि चित्तशुद्धि व प्रारब्धाच्या नाशासाठी उपयोगी ठरतेंच.

लोकमान्य टिळकांचें पचांग-कार्य

ले. : गंगाधर रामकृष्ण देव

इंग्रजांचें राज्य येण्यापूर्वी भारतांतील सर्वच प्रांतांत गांवोगांवीं पंचांगें तयार होत असत. तीं बहुतेक सूर्यसिद्धांताच्या किंवा ग्रहलाघवाच्याच आधारानें होत असत. कांही पंचांगें आर्यसिद्धांताप्रमाणे आणि कांही पंचांगें ब्रह्मगुप्तांच्या ब्रह्मसिद्धांताप्रमाणें होत असत. या सर्वच पंचांगांचें गणित प्रत्यक्ष आकाशस्थ ग्रहांच्या दृक्प्रत्ययाशीं जुळत नाही असें गेल्या शंभर वर्षांत ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांना दिसून आलें असल्यामुळें पंचांगसंशोधनाचे विचार चालूं झाले.

पंचांग संशोधक .

उत्तरेस काशी–प्रयागाकडें कै. बापूदेवशास्त्री; कै. पंडित सुधाकर द्विवेदी; दक्षिणेंत मद्रासचे रघुनाथाचार्य; तंजावरचे सुंदरेश्वर श्रौती आणि व्यंकटेश्वर दीक्षित; महाराष्ट्रांत कै. विनायक लक्ष्मण उर्फ केरूनाना छत्रे; कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित; कै. व्यंकटेश बापूजी केतकर; लोकमान्य बाळ गंगाधर टिळक वगैरेंनी या विषयावर आपआपलीं मतें प्रगट करून पंचांग संशोधनाचे प्रयत्न चालूं केले. त्यांत लोकमान्य टिळकांचें कार्य महत्त्वाचें आणि प्रमुख होय.

ह्या पंचाग-संशोधकांपुढे अनेक प्रश्न होते. वर्षमानाचा म्हणजेच आरंभस्थानाचा प्रश्न; गणित-सूक्ष्मतेचा म्हणजेच दृक्प्रत्ययाचा प्रश्न; सायन निरयनाचा प्रश्न; धर्मशास्त्राचा प्रश्न; वगैरे महत्त्वाचे प्रश्न होते. यांत सर्वांत महत्त्वाचा प्रश्न वर्षमानाचा होय.

वर्षमानाचा प्रश्न

ह्या पंचांग संशोधकांपुढे जे अनेक प्रश्न होते त्यांपैकी वर्षमानाचा प्रश्न हा फार चिवट आहे. ज्या सिद्धांताच्या आधारें हीं भारतीय पंचांगें होत असत त्यांत म्हणजे सूर्यसिद्धांत, ब्रह्मसिद्धांत, आर्यसिद्धांत किंवा ग्रहलाघव यांत वर्षमान ३६५ दि. १५ घटी ३१॥ पळें ह्याच्याच जवळपास घेतलें आहे. हें वर्षमान वेधानें आणि गणितानें येणाऱ्या वास्तविक वर्षमानापेक्षा सुमारें ८॥ पळांनी जास्त आहे. वरील निर्दिष्ट केलेले सिद्धांत (ग्रहलाघव सोडून) झाल्यास आज सरासरी १४०० वर्षे झालींत. आणि इतक्या काळांत वर्षारंभांत सुमारें ३॥ दिवसांची व प्रत्यक्ष सूर्यांत सुमारें ३॥। अंशांची चुकी संगळली आणि ही चुकी प्रत्यक्ष आकाशांत वेध घेणाऱ्यासहि दिसूं लागली. अर्थात् ही चुकी सुधारून या खऱ्या गणिताप्रमाणें पंचांग केल्यास सूर्यसंक्रांती चालू असलेल्या जुन्या किंवा ग्रहलाघवीय पंचांगाचे मानाने ३ दिवस किंवा ४ दिवस अगोदर येतील आणि त्यामुळें अधिकमासहि नवीन पंचांगांत भिन्न येतील. अशीं सुधारलेलीं पंचांगें सामान्य लोकांस मान्य होणार नाहीत ही मोठी अडचण उत्पन्न झाली.

ह्याशिवाय वर्षमानसंबंधानेच दुसरीहि एक अडचण आहेच. ती अशी; वर जें वर्षमान सांगितलें आहे तें निरयण–वर्षमान होय. म्हणजे सूर्याला निःशर रेवतीयोग ताऱ्यापासून निघून पुन्हा त्याच ताऱ्याजवळ परत येण्यास जो काळ लागतो तो म्हणजे नाक्षत्रवर्ष किंवा निरयणवर्ष होय. एक ऋतु सुरू झाल्यापासून पुन्हा त्याच ऋतूची सुरवात होण्यास जो काळ लागतो तो नाक्षत्रवर्षापेक्षा कमी आहे. तो काळ ३६५ दिवस १४ घटी ३२ पळें एवढा आहे. या वर्षाला आर्तववर्ष किंवा सायनवर्ष म्हणतात. १४०० वर्षांत ऋतु काळांत दरवर्षी १ घटिका याप्रमाणें सुमारे २३ दिवसांची चुकी ऋतूंत पडली आहे. ही चुकीहि दुरुस्त करावी किंवा नाही ? तशीच ही सुधारणाहि लोकांस मान्य होईल किंवा नाही ? निरयण वर्षमानाची चुकी

सुधारण्यास धर्मशास्त्रांत सुधारणा करण्याची गरज पडणार नाही पण सायनमान घेतल्यास धर्मशास्त्रांतहि थोडी बहुत सुधारणा करावी लागेल, ही फारच मोठी अडचण तेव्हा पंचांग–संशोधकांपुढे उभी होती. आणि कोणत्याहि व कसल्याहि सुधारणेला त्या काळीं सामान्य जनता मुळींच तयार नव्हती.

पंचांग सुधारणेचा प्रयत्न

या अडचणींत आणखी एका अडचणीची भर पडली. ती अशी, सूर्यसिद्धांत हा प्रत्यक्ष सूर्यानेच केलेला ग्रंथ आहे असा समज असल्यामुळे त्या ग्रंथाला पूजास्थान मिळालें होतें. अशा पूजनीय ग्रंथांतील मानांत किंवा संख्येंत कोणताहि फरक करण्यास लोक मुळींच तयार नव्हते. कांही झालें तरी वर्षमान सूर्यसिद्धांताचेंच घ्यावें अशा मताचे सर्व भारतांतील तेव्हाचे विद्वान लोक होते. या निरनिराळ्या अडचणींतून सुटण्याकरिता निरनिराळ्या लोकांनी निरनिराळ्या युक्त्या योजिल्या.

महाराष्ट्रांत कै. केरूनाना छत्रें यांनी प्रथम पंचांग सुधारणेचा प्रयत्न केला. सूर्यसिद्धांतांतील वर्षमान दुरुस्त करून तें वास्तविक नाक्षत्र वर्षाइतकें म्हणजे ३६५ दिवस १५ घटी २३ पळें घेतलें, आणि यालाच अनुसरून आरंभस्थानीं निःशर रेवती योगतारा घेतली आणि गणित आकाशस्थ ग्रहांशीं मिळणारें घेतलें. याप्रमाणे शुद्ध पंचांग तयार केलें. याला “ पटवर्धनी पंचांग ” असें म्हणत. शके १७८७ सन १८६५ सालापासून हें पंचांग चालू झालें. तें पुढे लौकरच बंद पडलें. हा प्रयत्न करतांना त्यावेळीं कै. केरुनाना छत्रें यांस बराच त्रास सोसावा लागला. कारण ग्रहलाघवीय पंचांगांत किंवा जुन्या सिद्धांतावरून केलेल्या पंचांगांत फरक पडतो आणि त्याप्रमाणे दृक्प्रत्यय येत नाही ही गोष्ट जरी सर्वांना दिसून आली होती तरी त्यांत फरक करण्यास कोणीहि तयार नव्हता. कै. केरुनानांनी केलेला हा प्रयत्न वैयक्तिक स्वरूपाचा होता. त्याला लो. टिळक यांनी सन १९०४ मध्यें मुंबईस झालेल्या भारतीय ज्योतिर्वित्संमेलनांत सामुदायिक स्वरूप दिलें. या संमेलनांत प्रचलित पंचांगांतील दोष स्पष्टपणें दाखविण्यांत आले. सूर्यसिद्धांताचेंच वर्षमान घ्यावें असें जरी या संमेलनांत ठरलें, तरी पंचांगगणित दृक्प्रत्ययास मिळणारें असावें असा ठराव लो. टिळकांच्या प्रयत्नानेंच या वेळीं पास झाला ही विशेष महत्त्वाची गोष्ट होय.

पंचांग सुधारणेचा सामुदायिक पहिला प्रयत्न या दृष्टीनें लो. टिळकांनी केलेलें कार्य फार महत्त्वाचें ठरलें. कारण जेथे पूर्वीच्या सिद्धांतांतील एक अक्षरहि बदलावयाचें नाही अशा प्रकारची ज्योतिषांची वृत्ति होती, त्या ठिकाणीं बऱ्याच गोष्टींत सुधारणा करण्याचें पूर्ण वादविवादाअंतीं सर्वांनीं कबूल केलें. या संमेलनांत जी एकवाक्यता घडून आली, तिचें सर्व श्रेय लो. टिळकांकडेच आहे हें त्या संमेलनाचे अध्यक्ष श्रीशंकराचार्य यांनीच तेथे प्रांजलपणें बोलून दाखविलें.

यानंतर लो. टिळकांच्या अध्यक्षतेखाली सन १९१७ सालीं पुण्यास दुसरी पंचांग–संशोधन–परिषद झाली. पुण्याच्या परिषदेनें एक पाऊल पुढे टाकून जास्त सुधारणेचा मार्ग स्वीकारला. या परिषदेनें लो. टिळकांच्या अध्यक्षतेखाली एक पंचांगप्रवर्तन कमेटी स्थापन केली.

टिळक–पंचांगाची सुरुवात

लोकमान्य टिळकांनी सन १९१८ पासून या पंचांगप्रवर्तन कमेटीमार्फत सूक्ष्म आणि दृक्प्रत्ययसिद्ध असें पंचांग नॉटिकल अल्मानॅकच्या आधारें प्रसिद्ध करण्यास सुरवात केली आणि हें कार्य सतत चालू ठेवण्याची केसरी संस्थेतर्फे पूर्ण व्यवस्था केली. या पंचांगासंबंधी पुष्कळ वादविवाद झालेत आणि अजूनपर्यंत ते चालूहि आहेत. शके १८४१ सन १९२० मध्यें माघ महिन्यांत कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली सांगली येथे तिसरें ज्योतिषसंमेलन भरलें. त्यांत महाराष्ट्रांतील सर्व विद्वान आणि तज्ज्ञ ज्योतिषी हजर असून लोकमान्य टिळक आणि श्री शंकराचार्य हेहि या प्रसंगीं आले होते. रैवत, चित्रा, मघा आणि ग्रहलाघवीय असे निरनिराळे पक्ष या वेळीं सांगलीस जमा झाले होते. तेथे सर्व गोष्टींची आणि

(पुढील मजकूर पान १५ वर)

लोकमान्य सुधारक होते काय ?

ले. : प्र. दे. कोलते

श्रीशंकराचार्यांना, त्यांचे विरोधक ज्याप्रमाणे 'प्रच्छन्न बौद्ध' म्हणत, त्याप्रमाणेच लोकमान्य टिळकांनाहि त्यांचे विरोधक 'प्रच्छन्न सुधारक' म्हणत, हें सुप्रसिद्ध आहे. आज तर रूढ समज असा आहे की, वस्तुतः ते हाडाचे सुधारकच असून राजकारणांतील त्यांच्या क्षेत्रांत त्यांचें सर्व बळ खर्च झाल्यामुळे सुधारणेच्या क्षेत्रांत पडण्यास त्यांना सवड झाली नाही अथवा सरसहा सर्व जनतेला असंतुष्ट करूं नये म्हणून सुधारकाची भूमिका त्यांनी घेतली नाही. त्यांच्या चरित्राचें जर सूक्ष्म अवलोकन केलें तर ह्या म्हणण्यांत बराचसा तथ्यांश आहे, असें म्हणावें लागतें ! "पंच-हौद" प्रकरणांत जरी प्रायश्चित्त घेतलें नाही, तरी पुढे मागे केव्हा तरी तें घेणें, कोल्हटकरांच्या येथील मुलीच्या लग्नास जावें असें वाटलें तरी वेळेवर न जातां मागाहून जाणें, अशा त्यांच्या कित्येक गोष्टी लोकमतास सहसा न दुखविण्याचें त्यांचें धोरणच स्पष्ट करतात.

असें जर आहे, तर विरोधकांनी त्यांला दिलेली 'प्रच्छन्न सुधारक' व. .े विशेषणें यथार्थ आहेत, असें कां म्हणूं नये, असा सहजच प्रश्न पडतो; परंतु त्यांच्या एकंदर स्वभावधर्माशीं हें फार विरुद्ध दिसतें. त्यांचें सारें आयुष्य पाहिलें तर प्रच्छन्नपणा असा कोठेच दिसत नाही. चार भिंतीच्या आंत असलें तरी सारें आयुष्य अगदी उघड्यावर गेलेलें. जात्या उत्तम वकील आणि मुत्सद्दी असूनहि अंगींचा निर्भयपणा इतका की प्रतिपक्षासमोरहि अनवधानतेने नव्हे तर छातीठोकपणाने, ते आपलें अंग इतकें उघडें करीत की, त्यांच्या सहकाऱ्यांस त्यामुळे कित्येक वेळां मोठी भीति वाटत असे. राजद्रोहाच्या खटल्यांत साक्षीदाराची फेरतपासणी श्री. दादासाहेब करंदीकर हे करीत होते. अशा फेरतपासणींत, आपला मुद्दा साक्षीदाराच्या लक्षांत येऊं न देतां आडपड्याने प्रश्न विचारून त्याच्याडून अपेक्षित उत्तर काढून घ्यावयाचें असतें; पण लोकमान्यांना हा प्रच्छन्नपणा कोठून मानवणार ? त्यांनी मध्येच उठून एकदम साक्षी-

---

(पान १४ वरून)

वादग्रस्त मुद्द्यांची चर्चा लो. टिळकांनी घडवून आणली. तेव्हा येथे पंचांगशुद्धीचा अखेरचा निर्णय लोकमान्य टिळकांनी सर्वानुमतें घेतला. या सांगली संमेलनांत ठरल्याप्रमाणे करणग्रंथ करण्याची व्यवस्था स्वतः लोकमान्य टिळक यांनी केली. एक करणग्रंथ कमेटी नेमून नागपूरचे कै. विद्वद्रत्न डॉ. केशव लक्ष्मण उर्फ भाऊजी दप्तरी यांच्याकडून करणग्रंथ तयार करविण्यांत आला. या करणग्रंथाचें नांव " करणकल्पलता " असें आहे. करणग्रंथास लागणारा सर्व खर्च करण्याची आणि कै. विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी यांस पारितोषिक म्हणून एक हजार रुपये देण्याची सर्व व्यवस्था लोकमान्य टिळकांनी केली. या केलेल्या व्यवस्थेप्रमाणे शके १८४३ सन १९२१ पासून या करणग्रंथाधारें सर्वस्वी शुद्ध असें १९ अयनांशांचें पंचांग केसरी संस्थेमार्फत प्रसिद्ध होऊं लागलें. यालाच " टिळक-पंचांग " असें म्हणतात. याचप्रमाणे नागपूर येथेहि शके १८४८ सन १९२६ पासून महाराष्ट्र संस्थेनेहि टिळकांचें कार्य म्हणून नागपूर-टिळक-पंचांग प्रसिद्ध करण्यास सुरवात केली.

हळूहळू या शुद्ध पंचांगाचा प्रसार जनतेंत आज बराच झालेला आहे ही गोष्ट सर्वांस विदित आहेच.

दाराला, 'मी तुला हें करावयास सांगितलें काय ?' असा खडखडीत प्रश्न विचारला, आणि त्यामुळे श्री. केळकर, श्री. करंदीकर इ० मंडळी कशी घाबरून गेली, हें सुप्रसिद्धच आहे. ताईमहाराजांच्या प्रकरणांत लोकमान्यांनी त्यांच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला, असें सिद्ध करण्याचा प्रतिपक्षाचा डाव होता. त्यांची जबानी चालू होती, परंतु लोकमान्यांना कोठला धीर निघणार ? त्यांनी सारें तंत्र सोडून खडखडीत प्रश्न विचारल्याचें प्रसिद्धच आहे. राजकारणांतहि तसेंच ! "आठ आणे यशाची खात्री द्याल तर मी उघड बंड पुकारतों" असें निर्भयपणें जाहीर करण्याची तयारी. अशा स्थितींत सुधारकपणा अंगीं असूनहि—म्हणजे त्याकाळीं जो सुधारकपणा समजला जाई तो—केवळ लोकक्षोभाच्या भीतीने त्यांनी उघडपणे सुधारकाची भूमिका घेतली नाही, हें बुद्धीस पटत नाही, त्या शिवाय त्याला आणखी कांही तरी कारण असावें, असें वाटतें.

देशहितास वाहून घेणाऱ्या लोकांतहि त्या काळीं आधी सुधारणा की आधी स्वातंत्र्य, अशा स्वरूपाचे दोन पक्ष होते. अर्थातच लोकमान्य आधी स्वातंत्र्यच म्हणणारे होते, हें निर्विवाद आहे; परंतु तेवढ्याकरिता त्यांनी आपला सुधारकपणा प्रच्छन्न ठेवला, असें म्हणणें असमंजस होईल. वस्तुस्थिति अशी दिसते की, त्या वेळच्या सुधारकांना अभिप्रेत असलेल्या कित्येक सुधारणा त्यांना मान्य असल्या तरी सुधारकांशीं त्यांचा कोठेतरी तत्त्वतःच असा विरोध होता की, ज्यामुळें ते त्या चळवळींत मनापासून पडणें अशक्यच होतें. हा त्यांचा विरोध कोठे असावा, याचें उत्तर त्यांच्या "गीतारहस्यां"त सापडतें.

गीतारहस्याच्या प्रस्तावनेंत त्यांनी असें म्हटलें आहे की, हिरा आणि सत्य ह्यांना जों जों पैलू पाडावेत तों तों त्यांचें तेज अधिक प्रगट होतें. मराठी भाषेस अलंकारभूत असलेल्या खुद्द गीतारहस्यासहि तोच न्याय लागू पडतो. जों जों त्याचा विचार करावा, तों तों त्याचें महत्त्व अनेक रीतींनी जास्त लक्षांत येतें. हा ग्रंथ जरी त्यांनी आपल्या आयुष्याच्या अंतिम सीमेवर लिहिला, तरी त्याचा विचार व अभ्यास त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच सुरू होता, हें त्यांनीच लिहिलें आहे. या विषयावर ग्रंथ लिहिण्याचेंहि त्यांच्या डोक्यांत फार पूर्वीपासूनच घोळत असावें. परंतु त्यांच्या सार्वजनिक व्यापांत त्यांना तसा वेळ मिळणें शक्यच नव्हतें. शेवटीं प्रारब्धवशात् 'मंदले शहरीं' त्यांना कारागृहवास झाला, आणि 'तेरा राग मेरा संतोष' ह्या हिंदी म्हणीप्रमाणे सरकारच्या ह्या रोषांतूनच दैवानें 'गीतारहस्या'सारखें रत्न निर्माण केलें.

लोकमान्यांच्या सर्व चरित्राकडे पाहिलें तर असें दिसून येईल की, विभूतिमत्वाचे अनेक गुण त्यांच्या ठिकाणीं स्वयंसिद्ध असले तरी त्यांचें सारें आयुष्य विकासशील आहे. ध्येयाचा निश्चय जरी अगदी सुरवातीसच झाला असला तरी ध्येयाचा मार्ग निश्चित होण्यास आणि अनेक अस्पष्ट कल्पना सुस्पष्ट होण्यास परिस्थितीने शहाणें होत होतच त्यांना पुढे जावें लागलें. 'बर्वे प्रकरणांत' आगरकरांच्या बरोबर माफी मागून एकशें एक दिवसावर निसटणारे, राजकीय कारावासांत 'मोक्षमुल्लर'ची मध्यस्थी मान्य करणारे आणि पुढे आपल्या तेजाने ब्रिटिश न्यायदेवतेला फिक्की करून अंतःकरणांतील निष्ठेचा दिव्य संदेश निर्भयपणाने गर्जणारे टिळक हळूहळू त्या परिणत स्वरूपास कसे आले, हें त्यांच्या चरित्रावरून सहज सांगतां येतें. गीतारहस्याच्या बाबतींतहि अशीच त्यांची वाढ हळू हळू झाली असावी. प्रथमतः गीतेचें वाचन, त्यानंतर तिचा अभ्यास, तद्विषयक मतमतान्तरांचें परीक्षण, पाश्चात्य विचारसरणींशीं त्यांची तुलना, असें होतां होतां अखेरीस गीतेच्या पूर्वकालीन अभ्यासकांवरून कांही निराळ्या संदेशाचा साक्षात्कार आणि तो जनता जनार्दनापुढे मांडण्याची आवश्यकता, अशा क्रमानेच त्याचा विस्तार झाला असावा. या त्यांच्या मांडणींतील एक विशेष असा आहे की प्रचलित काळाला अनुसरून सांगणें उचित असलेल्या गोष्टी गीतेंतून त्यांनी काढून दाखविल्या आहेत. पूर्वाचार्यांनी सांगितलेला गीतार्थ मी पुन्हा सांगत आहे, असें म्हणत असतांना त्यांनी स्पष्ट सांगितलें आहे की "शास्त्रार्थान् संमुखीकृत्य प्रश्नान् नव्यैः सहोचितैः" गीतारहस्याचा खरा विशेष काय, असें जर कोणी म्हटलें तर त्याला

असेंच उत्तर द्यावें लागेल की काळाला अनुसरून असलेल्या कित्येक विचारांची फोड त्यांनी गीतार्थांतून करून दाखविली आहे. ह्या कित्येक गोष्टींपैकी मूलभूत अशी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नीतिशास्त्राची सशास्त्र उपपत्ति.

'गीतारहस्य' प्रसिद्ध झाल्यावर त्यांच्या हयातींत व त्यानंतरहि वादविवादचें जें एक फार मोठें रण माजलें, त्यावरून सर्वसामान्य अशी समजूत झालेली दिसते की, शंकराचार्यांशीं लोकमान्यांचा असलेला विरोध, हाच गीतारहस्याचा विशेष आहे; परंतु हें म्हणणें ठीक नाही. लोकमान्यांचा आचार्यांशीं जो विरोध आहे, तो केवळ एका अगदी लहानशा गोष्टींत असून अत्यंत महत्त्वाचा असला तरी इतक्या उच्च भूमीवरचा आहे की, भगवद्गीतेंत म्हटल्याप्रमाणे "मनुष्याणां सहस्रेषु" अशा एखाद्याचाच त्याच्याशीं प्रत्यक्ष संबंध येत असेल. श्री अप्रबुद्ध ह्यांनी आपल्या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे ('पुनर्घटना' पान २६-२७) तो केवळ एका 'च' काराचाच वाद आहे. आत्मज्ञान, अथवा मोक्षप्राप्ति झाल्यानंतर उत्पन्न होणारा तो प्रश्न आहे. तेथपर्यंत आचार्यांचा व त्यांचा विरोध नाही. आपापल्या अंतिम सिद्धान्तास अनुसरून गीतेंतील कित्येक शब्दांचे अथवा श्लोकांचे अर्थ त्यांनी थोडे वेगवेगळे केले असले तरी कोणत्याहि अवस्थेंतील साधकाचा अथवा समाजांतील सामान्य जीवाचा यत्किंचितहि घोटाळा होण्याचें कारण नाही. ह्याचें कारण असें की, मोक्ष प्राप्त झाल्यानंतर काय करावें लागेल, हा प्रश्न तर राहोच पण परमार्थदृष्ट्या विशेष साधन कोणतें करावें, हा तरी प्रश्न ज्यांच्यापुढे आहे, असे साधक समाजांत किती असतात? 'मनुष्याणां सहस्रेषु' असें जरी गीताश्लोकाला धरून असलें तरी त्याचा अर्थ 'लाखामध्ये एखादा' असाच करावा लागेल लोकमान्यांनी एवढा ग्रंथ लिहिण्याची जी यातायात केली आहे, ती काय ह्या अपवादात्मक व्यक्तीकरता? अर्थातच तसें कोणी म्हणणार नाही. श्रीसमर्थांप्रमाणेच त्यांनाहि "सकळ जन सुखावे। तो कसा काळ फावे।" अशी चिंता लागली होती. ह्या 'सकळ जनाकरिता' त्यांनी ग्रंथ लिहिला आहे. हे 'सकळ जन' नित्य व्यवहारांतच वागत असतां, व्यवहारांतच 'कार्याकार्य दिदृक्षु' असतात. म्हणूनच आपल्या 'समर्पणां'त त्यांनी "तमार्याः श्रोतुमर्हन्ति कार्याकार्यदिदृक्षवः" असें म्हटलें आहे.

ह्यावर सहजच कोणी असें म्हणतील की, व्यवहारांत पदोपदीं उत्पन्न होणाऱ्या बऱ्या वाईटाच्या प्रश्नांचा विचार करण्याकरिता तत्त्वज्ञानाचें एवढें अवडंबर कशाकरिता पाहिजे आहे? कांदा ठेचतांना 'बिस्मिला' म्हणण्यासारखेंच आहे हें. गीतारहस्याचा कांही विशेष असेल तर हाच आहे की व्यवहारांतील अत्यंत साध्या प्रश्नापासून तों मोक्षप्राप्तीच्या अंतिम प्रश्नापर्यंत विचारी माणसाच्या कोणत्याहि प्रश्नाचें मूळ अंतिम तत्त्वांतच कसें असतें आणि अंतिम तत्त्वावरून त्याचा विचार केल्याखेरीज त्याचें खरें उत्तर कसें मिळत नाही, हें अर्वाचीन मराठी वाचकांस गीतारहस्यानें दाखवून दिलें आहे.

व्हिक्टोरियाच्या मन्वतरांत इंग्लंडांत जे मोठमोठे सामाजिक विषयावर लिहिणारे होऊन गेले, त्या सर्वांचा सामान्य सूर असा आहे की, मनुष्यजीवनाशीं संबंध असलेले हे कार्याकार्याचे अथवा बऱ्या वाईटाचे प्रश्न जिला गीतेंत 'व्यवसायात्मिका बुद्धि' म्हटलें आहे, त्या बुद्धीने किंवा इंग्रजी भाषेंत बोलावयाचें तर आपल्या अंतःकरणाला रुचेल त्याप्रमाणे, common sense नेच सोडवायचे असतात! व्हिक्टोरियाच्या युगांतील प्रगत म्हणून समजल्या जाणाऱ्या अनेक शास्त्रीय कल्पना आता असिद्ध ठरल्या आहेत. मनुष्याच्या नीतिशास्त्राचा पाया, त्याची विश्वविषयक कल्पना हीच असूं शकेल. इतकेंच नाही तर तसा पाया असल्याखेरीज नैतिक कल्पनेला शास्त्रीयता येणें अशक्य आहे, असें डॉ. कॅरस म्हणतो. लोकमान्यांनी गीता रहस्यांत त्याचा उतारा दिला आहे.

"Our proposition is that the leading principle in ethics must be derived from the philosophical view back of it. The world-conception a man has, can alone give character to the principle in his ethics. Without any

world-conception we can have no ethics." (पान ४८२ टीप.)

उपनिषदांतील 'प्रेयस' आणि 'श्रेयस' हा भेद अथवा भगवद्‌गीतेचें 'दैव' आणि 'आसुर' हें मानव-जातीचें वर्गीकरण ह्याच तत्त्वास धरून आहे. 'आसुर' ही संज्ञा त्या ठिकाणीं अपशब्दासारखी वापरलेली नाही. 'आसुर' म्हणजे जीवनाकडे तात्पुरते पाहणारे लोक. "अपरस्परसंभूतं किमन्यत् कामहैतुकम्" आगरकर प्रभृति सुधारकांच्या मूळ पुरुषाकडे पाहिलें तर त्यांचीहि एकंदर विचारसरणी यापेक्षा कांही वेगळी दिसत नाही. ही विचारसरणी चालू युगांतील मोठमोठ्या विचारवंतांना आता सदोष दिसूं लागली आहे. ॲल्डस हक्सले सारखे पंडित तर असें म्हणूं लागले आहेत की, विचारी म्हणून म्हणविणाऱ्या मनुष्याला कांही तरी विश्वकल्पना प्रमाण मानल्याखेरीज जगणेंच शक्य नाही. ("It is impossible to live without a metaphysics") तो उघड म्हणो अथवा न म्हणो मनुष्यजीवनाकडे पाहण्याच्या अशा विश्वकल्पनेंतूनच त्याच्या साऱ्या प्रेरणा निघत असतात. ("Men live in accordance with their philosophy of life, their conception of the world.") आपल्या सुप्रसिद्ध 'ध्येयें आणि साधना' (Ends and Means)ह्या पुस्तकांत तर तो असें म्हणतो की, नुसतें माणसाचें खाजगी जीवनच नव्हे तर त्याचें अर्थशास्त्र, त्याचें राजकारण, त्याचें सर्व चारित्र्यच मुळी अशा विश्वकल्पनेंतून निघालेलें असतें. तात्पुरत्या दृष्टीने कितीहि सयुक्तिकपणे त्याने लिहिलें असलें तरी, असें दाखवून देतां येतें की, त्या सर्वांचें मूळ, त्याची विश्वकल्पना आणि तिच्यावरून सिद्ध होणारा मनुष्यजीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यांतच आहे. ("It is in the light of our beliefs about the ultimate nature of reality that we formulate our conceptions of right and wrong; and it is in the light of our conceptions of right and wrong that we frame our conduct not only in the relations of private life, but alos in the sphere of politics and economics. So far from being irrelevant, our metaphysical beliefs are the finally determining factor in all our actions.")

तत्कालीन सुधारकांकडे पाहिलें तर असें दिसून पडतें की, त्यांच्यांत नेमका या खोल विचाराचाच अभाव होता. कित्येक मनुष्यजीवनाचा केवळ ह्या आधिभौतिकापुरताच संकोच करून चालणारे होते, आणि क्वचित् कांही आधिभौतिकापलिकडे दृष्टि टाकणारे असले तरी व्यवहारदृष्टया त्यांचें तत्त्व Common sense आणि अंतःकरणाचा संतोष हेंच त्यांचें शास्त्र होतें ! ह्यालाच Rationalism असें प्रतिष्ठित नांव होतें !! लो. टिळकांसारख्या प्रतिभाशाली पुरुषाचें समाधान एवढयाने होणें केवळ अशक्य होतें. म्हणून आचारदृष्टया जरी कांही बाबतींत त्यांचें सुधारकांशीं पटत असलें तरी देखील त्यांच्या गोटांत टिळकांचा समावेश होणें, हें केवळ अशक्यच होतें. आणि म्हणूनच ज्या अर्थानें त्यांना 'प्रच्छन्न सुधारक' म्हटलें जात होतें, त्या अर्थानें सुधारक म्हणणें, हें सर्वथैव चूक आहे. शंकराचार्यांना 'प्रच्छन्न बौद्ध' म्हणणारांना ज्याप्रमाणे आचार्य व गौतमबुद्ध ह्या दोघांच्याहि मूळ भूमिकांचें यथार्थ ज्ञान नसतें, तसेंच लोकमान्यांना सुधारक समजणें म्हणजे 'सुधारक' व 'लोकमान्य' ह्या दोघांच्याहि भूमिका नीट न समजणें आहे.

लोकमान्यांनी सुधारकाची भूमिका न घेण्याचें दुसरेंहि एक कारण असूं शकेल. जात्याच त्यांचा ओढा विधायक कार्याकडे होता. सुधारणेच्या नांवाखालीहि जर मोडतोडीचेंच जास्त कार्य होईल असें त्यांना दिसलें असेल, तर तें त्यांना रुचणें शक्यच नव्हतें. आणि गेल्या शेसवाशें वर्षांतील सुधारकांच्या कार्याचा जर आढावा घेतला, तर वैयक्तिक दृष्टया कांही कोणाचें कल्याण झालें असलें, तरी समाजदृष्टया केवळ उच्छेदाचेंच काम झालेलें आहे, असेंच कोणासहि म्हणावें लागेल ! तीस वर्षांपूर्वी "जुन्या सुईणी मरून

(पुढील मजकूर पान १९ वर)

टीकाकार टिळक

—प्रा. भा. श्री. परांजपे

'ओरायन', 'आर्क्टिक होम इन दि वेदाज्' आणि 'गीतारहस्य' हे तीन ग्रंथ सोडले तर लो. टिळकांचें बहुतेक लेखन केसरींतून झालें आणि तें बहुतांशीं राजकीय स्वरूपाचें आणि तत्कालीन स्थितीवर टीका करणारें असल्यामुळे साहजिकच त्या लेखनाला प्रासंगिक स्फुट आणि तात्कालिक म्हटलें जावें हेंहि बरोबरच आहे. तथापि केसरी हें त्या काळांतील लोकमत बनविणारें एक प्रभावी शस्त्र होतें व हें शस्त्र ज्याच्या हातीं होतें तो केवळ एक नेताच नव्हता तर समाजाचा सर्वांगीण रीतीनें विचार करणारा एक द्रष्टा पुरुष होता. आपल्या प्रभावी लेखणीनें आणि ध्येयनिष्ठ विचारसरणीने ज्याने एकाकाळचें महाराष्ट्राचें सारें वातावरण भारून टाकलें असा एक युगपुरुष होता. अशा युगपुरुषाच्या पावलांच्या स्पर्शमात्राने शिळेला देखील रमणीय स्वरूप मिळतें, अंगकांति सजीव होते, रोमारोमांत चैतन्य उत्पन्न होतें आणि नवी जीवनकळा लाभते. 'सतराविद्येचें स्तन्य' देऊन जीवमात्राला जीवनकळा देऊं पाहणारा एक युगपुरुष या 'दगडाच्या देशा'ला लाभला तेव्हा महाराष्ट्रांतलीं सारीं क्षेत्रें उजळून निघालीं आणि त्यांना एक नवी कांति, नवें तेज मिळालें. लोकमान्यांनी केसरींत वेळोवेळीं जी चर्चा केली, जे वाद केले वा जी टीका केली ती केवळ राजकीय क्षेत्रापुरतीच मर्यादित नव्हती; तर वाङ्मय-क्षेत्रांतील तत्कालीन प्रश्नांचाहि त्यांनी तितक्याच हिरीरीने, आवेशाने आणि सडेतोडपणानें समाचार घेतला आहे. या साऱ्या प्रश्नांचा उहापोह करतांना, जुन्या नव्याचा, चांगल्या वाइटाचा त्यांनी विचार केला; त्यांतील मूलगामी तत्त्वांची व विचारसरणींची ओळख करून दिली; इतकेंच नव्हे तर त्यांतून एक निश्चित वैचारिक मूल्य दाखवून मराठीच्या वाचकाला निःश्रेयसाची ओळख पटवून दिली. या साऱ्या गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे आपण आजपावेतों लो. टिळकांची जी मूर्ति डोळ्यापुढे उभी केली तीहून भिन्न अशी 'वाङ्मयी' मूर्ति आमच्या डोळ्यापुढे येते व ती म्हणजे 'टीकाकार टिळक' ही होय.

'टीकाकार टिळक' हा शब्दप्रयोग कित्येकांना चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे. आजच्या नामवंत

(पान १८ वरून)

गेल्या आणि नव्यांचा अजून पत्ता नाही" म्हणून श्री अप्रबुद्धासारख्या एखाद्या सनातन्याने (?) काढलेले उद्गारच (श्री अण्णासाहेब पटवर्धन चरित्र) आज खांडेकरांसारखे लेखक काढीत आहेत, (वि. स. खांडेकर यांचा लेख, 'केसरी' १७ जून ५६) ही लक्षांत घेण्याजोगी गोष्ट आहे.

ह्या नव्या सुईणी कशा असाव्यात, याचा निरनिराळ्या प्रश्नांच्या दृष्टीनें विचार करण्याची श्रेष्ठ बुद्धिमत्ता लोकमान्यांजवळ जरी असली, तरी सारा जन्म साम्राज्यसत्तेशीं कुस्ती खेळण्यांतच गेल्यामुळे, त्यांना पुरेसा वेळ मिळणें शक्यच नव्हतें. तरी तेवढ्यांतूनहि, रात्रंदिवस चाललेल्या चिंतनाने, जीवनविषयक अशा मूल्यांचा अथवा अर्वाचीन भाषेंत बोलावयाचें म्हणजे नीतिशास्त्राचा पायाशुद्ध विचार कसा असला पाहिजे, जीवनाकडे पाहण्याचा तात्पुरता दृष्टिकोन आणि common sense हे ह्या दृष्टीनें किती लंगडे पडतात, हें आपल्या गीतारहस्याच्या द्वारें त्यांनी लोकांपुढे मांडलें आहे. हाच 'गीतारहस्या'चा अद्वितीयपणा आहे. आज आपल्या येथें अथवा साऱ्या जगांतहि जे कांही वैचारिक संघर्ष चालू आहेत, त्या सर्वांचें मूळ पाहूं गेलें तर, जीवनाकडे कोणत्या दृष्टीने पाहावयाचें, ह्या एकाच प्रश्नांत सापडतें. 'रहस्या'च्या द्वारें श्रीकृष्णानंद स्वामीप्रमाणेच लोकमान्यांनीहि जगास सांगितलें की, "गीतानाम ब्रह्मविद्यामूलं नीतिशास्त्रम् !"

समजल्या जाणाऱ्या कोल्हटकर, केळकर, भिडे, वा. म. जोशी या टीकाकारांप्रमाणे टिळकांना वाङ्मयक्षेत्रांत कांही स्थान आहे वा असूं शकतें हा विचारच पुष्कळांना शंकास्पद वाटेल. टिळकांनी आपल्या टीकांतून नाटक, कादंबरी यासारख्या तंत्राचा कधी विचार केला आहे काय अशीहि शंका निर्माण होणें असंभवनीय नाही. पण या नाटचकादंबरीसारख्या ललितक्षेत्रापुरतेंच पाहावयास गेलें तर अशी टीका लो. टिळकांनी लिहिलेली नाही हें खरें व याला बहुतांशीं कारण त्यांची लेखनप्रकृति ही मुळांतच गंभीर होती हें होय. पण याच्याच जोडीला दुसरेंहि एक कारण संभवतें व तें म्हणजे ज्यावर टीका करावी असे ललित ग्रंथच टिळकांच्या काळांत त्यांच्यापुढे नव्हते. आजचे नामवंत समजले जाणारे नाटककार, कादंबरीकार किंवा कवि हे त्या वेळीं लेखनाच्या दृष्टीने उमेदवारीच्या वयांत होते आणि याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सारेच लेखक टिळकांचे पुत्र वा शिष्य शोभतील असे होते आणि ह्यांपैकी कांही त्यांना गुरुस्थानीं मानत तर कांही त्यांच्या हाताखाली सहकारी म्हणून राहण्यांत धन्यता मानत.

ह्याचा अर्थ टिळकांनी मराठींतील नामवंत लेखकांचा परामर्श घेतला नाही असा नाही. टिळ–कांच्या काळांत नांवाजलेल्या बहुतेक प्रमुख लेखकांची वर्णी केसरीच्या स्तंभांत लागलेली आहे. चिं. वि. वैद्य यांची 'अवलोन्नतिलेखमालेचीं चार पुष्पें' व 'रामायण' व 'महाभारत' हे इंग्रजी ग्रंथ, प्रि. गोळे यांचें 'ब्राह्मण व त्यांची विद्या', राजवाडे यांच्या 'मराठ्याच्या इति–हासाचीं साधनें'चा चवथा खंड, पारसनीस यांची 'झाशीची राणी' हा चरित्रग्रंथ, पारखी यांचें 'बाणभट्ट व श्रीहर्ष', साने, हातवळणे व गोडबोले या 'मुनि-त्रयां'नी लिहिलेलें 'मराठी लेखनपद्धति', स्पेन्सर यांच्या ग्रंथांचीं 'ज्ञेयाज्ञेयमीमांसा' सारखीं भाषांतरें, रानडे यांचा इंग्रजी–मराठी कोश ह्या पुस्तकांची दखल लोकमान्यांनी घेतलेली आहे. यांपैकी काही पुस्तकांवर तर त्यांनी विस्तृत विवेचनें करून योग्य त्या सूचनाहि केलेल्या आहेत. या पुस्तकांचे विषय पाहिले म्हणजे त्यांची विविधता लक्षांत येते, तशीच या साऱ्या विष-यांचा परामर्श घेणारी व त्यांना मार्गदर्शन करणारी टिळकांच्या बुद्धीची सर्वंकषताहि प्रत्ययाला येते. धर्म, सुधारणा, तत्त्वज्ञान, इतिहास, चरित्र, कोश आणि व्याकरण या सर्वच बाबतींत लो. टिळकांनी या पुस्तकांच्या निमित्ताने आपले विचार मांडले आहेत, मतभेद दाखविले आहेत आणि पुस्तकांत आढळणारे दोषहि हलक्या हाताने दाखविले आहेत. आणि हें सर्व करतांना या साऱ्या ग्रंथकारांच्या प्रतिभेला गवसणी घालूनहि आपला 'हातचा एक' दाखवावयालाहि कमी केलें नाही.

लो. टिळकांचे टीकालेख काय किंवा वाङ्मय-चर्चात्मक लेख काय, कोणत्याहि लेखाचें वाचन केल्यास त्या सर्षांतून त्यांची ऐतिहासिक दृष्टि लक्षांत आल्या-शिवाय राहत नाही. पाश्चात्य वाङ्मयाच्या विशेषतः इतिहासाच्या आणि वैदिक संशोधनाच्या अध्ययनांतून ही विशिष्ट ऐतिहासिक दृष्टि त्यांच्यांत आली असावी असें अनुमान केल्यास तें अगदीच गैरवाजवी होणार नाही. याच ऐतिहासिक दृष्टीमुळे केसरींत आलेल्या बहुतेक मृत्युलेखांत त्या त्या थोर पुरुषांच्या कर्तृत्वाचें यथार्थ मूल्यमापन त्यांना करतां आलें. शिवजन्मतिथीचा निर्णय लावतांना, शिवदिग्विजय बखरीचा नवेजुनें-पणा पारखतांना किंवा 'झाशीची राणी', या चरित्रग्रंथांतील नायिकेच्या कर्तृत्वाचें योग्य मोज-माप करतांना ही दृष्टि विशेष तळपतांना दिसते. बाणभट्टाच्या कादंबरींत श्लेषघटित विशेषणांपेक्षा विशेष ऐतिहासिक माहिती नाही आणि बाणभट्टाला माहिती असतांहि त्याने ती दिली नाही म्हणून तो रोष व्यक्त व्यक्त करते तर बाणभट्टापेक्षा कालि-दासाने 'मालविकाग्निमित्र' नाटकांत जास्त ऐतिहासि-कता दाखविली म्हणून त्याची पाठ थोपटते. एखाद्या 'इतिहासप्रिय' म्हणवणाऱ्या वाचकाने शिवदिग्विजय बखरीवरील त्यांच्या आक्षेपाचें मर्म न समजून खंडन केलें याबद्दल 'इतिहासप्रिय असला म्हणजे त्याला ऐतिहासिक दृष्टि असतेच असें नाही' म्हणून त्याला थोडासा चिमटा घेत आणि बालविवाहामुळे राष्ट्राचा ऱ्हास झाला असें म्हणणाऱ्या चिं. वि. वैद्यांना हलक्या शब्दांत केलेलें दोषदर्शनहि न मानवल्यामुळे त्यांनी

आक्षेप घेतलाच, तर "वैद्यांचें हें पुस्तक 'व्रतानामुत्तमं व्रतम्' या व्रतमाहात्म्याच्या धर्तीचें आहे" असा उलट अहेरही करते; कधी इंग्रजींतील मेकॉलेच्या धर्तीचे सुरस आत्मप्रत्ययोत्पादक इतिहासग्रंथ मराठींत नाहीत व सुशिक्षित तसे प्रयत्न करीत नाहीत म्हणून विषाद व्यक्त करते, तर कधी असे थोडेसे प्रयत्न जरी 'झाशीची राणी'सारख्या चरित्रग्रंथाच्या रूपाने दिसले तर त्याबद्दल ग्रंथकर्त्याचें 'सहर्ष अभिनंदन' करते व लोकांनीहि त्यांचे आभार मानले पाहिजेत म्हणून बजावते.

लोकमान्यांच्या या 'ऐतिहासिक दृष्टी'ची जाणीव जर विशेष कुठे होत असेल तर ती 'महाभारत' 'चिपळूणकरांच्या वेळची स्थिति' आणि 'महाराष्ट्र भाषेची वाढ' या तीन प्रबंधांत. चिपळूणकरांवरील आपल्या प्रबंधांत चिपळूणकरांच्या आधीच्या दोन तीन पिढ्यांची माहिती देऊन त्या पार्श्वभूमीवर चिपळूणकरांचें कर्तृत्व कसें उज्वल दिसतें त्याचें ऐतिहासिक दृष्टीनें परीक्षण केलें आहे. चिपळूणकरांवर आजपावेतो लिहिल्या गेलेल्या साऱ्या निबंधप्रबंधांची आधारपीठीची मातृका शोभेल अशी या प्रबंधाची योग्यता कुणालाहि मान्य करावी लागेल. पण मराठी वाङ्मयचर्चेच्या दृष्टीने तिसऱ्या प्रबंधाचें महत्व विशेष वाटतें. ऐतिहासिक पार्श्वभूमीवर मराठीच्या वाढीची व संकोचाची अशी कारणमीमांसा मराठींत तरी ही पहिलीच आणि म्हणूनच अपूर्व. या लेखाच्या सुरवातीलाच त्यांनी जो सिद्धांत मांडला आहे तो त्यांच्या ऐतिहासिक दृष्टीचें द्योतक या दृष्टीने लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

> "समाजाचा व्यवहार, समाजाचे विचार, समाजाचा व्याप आणि समाजाची भाषा यांच्यामधील संबंध इतका निकट व नित्य आहे की एकाचें प्रतिबिंब दुसऱ्यांत उमटल्याखेरीज राहत नाही. कोणत्याही राष्ट्राचें वाङ्मय त्या त्या राष्ट्रांतील लोकांच्या परिस्थितीवर अवलंबून असतें आणि ही परिस्थिति ज्याप्रमाणे पालटेल त्या मानाने वाङ्मयाचाहि ऱ्हास किंवा वाढ असते."

हाच सिद्धांत तीन लेखांकांत त्यांनी महाराष्ट्र भाषेच्या निरनिराळ्या कालखंडांतील स्थित्यंतरांना लावून दाखविला आहे. मुसल्मानी अमदानींत ज्या हिंदूंच्या हातांत राजकीय सूत्रें होतीं त्यांना मुसलमानी भाषेचा अधिक अभ्यास करावा लागत असल्यामुळे स्वभाषेच्या उत्कर्षाचें काम त्यांच्याने कसें होईनासें झालें, मुसलमानी धर्मछळामुळे क्रियेने प्रतिक्रिया उत्पन्न होते या गतिशास्त्रांतील सिद्धांताप्रमाणे धर्मश्रद्धा बळकट होण्यास कशी मदतच झाली, महानुभावांमुळे मराठी मठापुरती का होइना काबुलापर्यंत कशी पोचली, भागवतधर्माचे ग्रंथ मराठींत निपजले ही गोष्ट भाषावृद्धीस व राष्ट्रवृद्धीस कशी कारण झाली, हें कविमंडळ नसतें तर दक्षिणेकडून कानडीचा पगडा बसण्याचा कसा संभव होता, चौथाईच्या बरोबरीनें अधिकाधिक मुलूख महाराष्ट्रभाषेच्या टापूखाली कसे आले, महाराष्ट्रभाषेचे किरण भाल्याबरोबर उत्तरेकडें अटकेपर्यंत तर दक्षिणेकडे तंजावरपर्यंत कसे पोचले, शिंदे गायकवाड होळकर यांच्यामुळे ग्वालेर गुजराथ माळवा या भागांत मराठी भाषेची स्थापना कशी झाली, आजमितीस बेळगाव धारवाड जिल्ह्यांत मराठी भाषा लोकांस समजते त्याचें कारण काय, या लोकांच्या घरांतून स्त्रियांनी मराठी बोलणें कसें कुलीनत्वाचें लक्षण समजलें जाई, या उत्कर्षापकर्षाच्या खाणाखुणा कशा समजावून दिल्या आहेत त्यांची लज्जत मुळांतच चाखावी. याच लेखांत एका ठिकाणीं रामदासाप्रमाणे पूर्वीच्या संतांच्या वाङ्मयांत देशाभिमानाची ज्योत का नाही, याची कारणमीमांसा केलेली आहे.

> "ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत झालेल्या कविमंडळांत म्लेंछ राज्याबद्दल खेद व स्वराज्याबद्दल अभिमान जागृत नव्हता असें नाही. परंतु त्या वेळची परिस्थिति अशी होती की देशाभिमानाची ज्योत अंतःकरणांत असली तरी तिची ज्वाला ओठापर्यंत न येण्याची खबरदारी घ्यावी लागत असे. एकनाथाचा काळ व रामदासाचा काळ यांत फार अंतर आहे आणि निवृत्तिमार्गाबरोबर रामदासाप्रमाणे प्रवृत्तिमार्गाचेंहि तत्पूर्वीच्या संतांनी प्रचलन केलें

नाही याबद्दल त्यास दोष देणारांनी ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवली पाहिजे."

वरील कारणमीमांसा पाहिली म्हणजे ऐतिहासिक दृष्टीबरोबरच विवेकाचा सूक्ष्मपणा, संयम, समतोलपणा आणि समंजसता हे शास्त्रीय विचारसरणीला लागणारे गुण त्यांच्या लेखनांत कसे दृग्गोचर होतात हें लक्षांत येईल. कोणत्याहि गोष्टीचें शास्त्रशुद्ध व समतोल मनानें केलेलें विवेचन त्यांना फार आवडे आणि हें वैशिष्टय ज्यांच्या ग्रंथांत आढळे अशा ग्रंथकारांच्या पाठीवर अभिनंदनाची थाप देण्यास त्यांनी कधी कमी केलें नाही. 'अबलोन्नतिलेखमाला' 'महाभारत' व 'रामायण' या पुस्तकांच्या परीक्षणांत 'व्यवस्थित विचारसरणी'बद्दल ग्रंथकाराची त्यांनी जी नांवाजणी केली ती पाहण्यासारखी आहे. वाङ्मयचर्चेच्या क्षेत्रांतील बहुतेक विवाद्य विषयांत त्यांच्या लेखणीने आपली शास्त्रशुद्धता व समतोलपणा राखलेला आढळेल. 'मराठी भाषेची लेखनपद्धती' या त्यांच्या व्याकरणविषयक चर्चेतील विवेचन या दृष्टीने पाहिलें तर कोणत्याहि विषयाच्या मुळाशीं जाऊन सत्यासत्य पारखण्याची व तें निःशंकपणे प्रतिपादण्याची त्यांची चातुरी लक्षांत आल्याखेरीज राहणार नाही. मराठी व्याकरणाच्या क्षेत्रांतील सार्‍या पक्षांचा नीट विचार करून व्याकरणशास्त्राचा पाया कसा घालावा याबद्दल जे मूलगामी सिद्धांत त्यांनी मांडले ते आजहि अबाधित ठरतील.

> " वैयाकरण हे भाषेचे शास्ते आहेत. पण त्यांची भाषेवर असलेली सत्ता अनियंत्रित नाही...शब्दास शिस्त लावणें हें जरी व्याकरणशास्त्राचें कर्तव्य असलें तरी शास्त्रकारास मन मानेल त्याप्रमाणे वागतां येत नाही. 'तूं काय केलेंस' या प्रयोगास सतरा व्याकरणकारांनी अशुद्ध म्हटलें तरी मराठी भाषा बोलणारांनी त्यास जोपर्यंत सोडलें नाही तोंपर्यंत कोणाला तरी अपवादाखाली म्हणून व्याकरणनियमांत त्याचा समावेश केलाच पाहिजे."

याच विषयाचा पुढील लेखांकांत उपसंहार करतांना ते स्पष्ट सांगतात की—

> " मराठी भाषा ही वाढती आहे, पूर्ण झालेली भाषा नाही. सबब मराठींत शब्दांच्या शुद्धलेखनाचे नियम अगदी कायमचे न ठरवितां सामान्यतः ठरवून कांही शब्दांस थोडीशी सवलत दिल्यानेच एकंदर भाषेची वृद्धि अधिक चांगली होईल असें आमचें मत आहे."

'प्रो. रानडे यांचा नवा इंग्रजी—मराठी कोश' या लेखांत मराठी भाषेंत परकी शब्द असावेत काय या मुद्यावर त्यांनी दिलेलें मतहि असेंच अबाधित व विचारणीय ठरेल.

> " आणखी एकाच गोष्टीचा उल्लेख करून संपवितों. ती गोष्ट ही की जे कांही इंग्रजी शब्द महाराष्ट्र भाषेंत रूढ झाल्यासारखे आहेत ते टाकून देण्यांत अर्थ नाही...भाषेंत परकीय शब्द नसणें हें स्वाभिमानाचें लक्षण खरें, पण त्याचा अर्थ असा की परकीय शब्दांचा स्वदेशी शब्दांवर शिरजोरपणा होऊं नये; परकीय शब्द मुळी स्वभाषेंतून येऊं नयेत असा नव्हे."

येथवर केलेल्या विवेचनावरून लो. टिळकांची ऐतिहासिक व शास्त्रशुद्ध दृष्टि वाङ्मयक्षेत्रांत कोणती दिशा दाखवूं पाहत होती हें दिसेल. पण ही दृष्टि एवढेंच टिळकांच्या टीकालेखनाचें वैशिष्टय नव्हे. त्यांच्या टीकालेखनांतील विधायक कार्याचें स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने त्यांच्या ठिकाणीं दिसून येणार्‍या दुसर्‍या एका अंगभूत विशेषाचा आवर्जून निर्देश करावयास हवा. हा विशेष म्हणजे त्यांच्या जीवनाला प्रेरक असणारी, हृदयांत सदैव धगधगणारी, त्यांच्या सार्‍या चळवळींना व्यापून उरणारी आणि लेखनांतहि उचंबळून येणारी उत्कट स्वातंत्र्यनिष्ठा होय. या स्वातंत्र्यनिष्ठेच्या पोटीं त्यांच्या लेखनांत जी स्वाभिमानाची दीप्ति व परावलंबनाविषयी त्वेषभावना दिसते ती टीकालेखनांतून झळाळतांना दिसली नसती तरच नवल!

'परकीय राज्यामुळे आमचा र्‍हास होत आहे' आणि आमचें परधार्जिणेंपण सुटेल तेव्हाच आमचें ग्रहण सुटेल' हे त्यांचे दोन आवडते सिद्धांत त्यांच्या राजकीय लेखांत दिसतात तसेच ते त्यांच्या वाङ्मय-

विषयक लेखांतहि आढळतात. 'ब्राम्हण व त्यांची विद्या' या प्रि. गोळयांच्या ग्रंथावरील त्यांची विस्तृत टीका या सिद्धांताचें जोरदार समर्थन करण्यासाठीच जणु जन्माला आलेली दिसते. 'झांशीची राणी' या चरित्र-ग्रंथावरील परीक्षणांतहि कांहीसें विषयांतर करून 'इसापनीतींतील सिंहाचें चित्र काढणाऱ्या चिताऱ्या-प्रमाणें इंग्रजांनी आमचे इतिहास लिहावे व आम्ही ते श्रुति प्रमाण मानून त्यांचें पठणपाठण करण्यांतच संतोष मानावा ही आमच्या परावलंबनाची सीमा नव्हे काय?' असा प्रश्न केल्याशिवाय त्यांना राहवत नाही. आपल्या देशाचा विशेषतः प्राचीन कालाचा इतिहास लिहितांना ह्युएनसांगच्या प्रवासवर्णनापेक्षाहि पुराणें व स्मृतिग्रंथ हे जास्त ग्राह्य का मानूं नये असाहि सदरल ते लेख-कांना करतांना आढळतात, तर 'स्पेन्सरसाहेबांच्या तत्त्वज्ञानपर ग्रंथांचीं भाषांतरें करतांना 'केवळ स्पेन्सर-साहेबांचा ग्रंथ आपल्या हातांत नव्याने पडला... येवढयावरून आमच्या देशांतील वाचकांपुढे तें तत्त्व त्यास नवें भासेल अशा रीतीनें मांडण्यास आम्ही उद्युक्त होऊं नये' अशीहि सावधगिरीची सूचना देतात.

पण लोकमान्यांच्या लेखांतील जहालपणा वा तेजाळपणा विशेष कुठे आविर्भूत होत असेल तर तो सरकारी अधिकारी किंवा परकी लोक जेव्हा विना-कारण कुसपटें काढून देशी भाषेची निंदा करतात तेव्हा. १९०४ सालीं लंडन येथे बर्डवुडसाहेबांनी आप-ल्या 'मराठी भाषे' वरील व्याख्यानांत 'वर्तमानपत्रांची अभिवृद्धि ही मराठी भाषेच्या स्थितीला कारण आहे' असा विचित्र सिद्धांत ठोकून दिला तेव्हा 'देशी वर्त-मानपत्रासंबंधाने अँग्लोइंडियन कामदारांचें प्रेम अनेक मार्गांनें उचंबळून येतें त्यांपैकीच हा एक प्रकार अशी त्यांची प्रथम संभावना करून पुढे इंग्लंडांत जॉन्सन मेकॉले आदि ग्रंथकारांचे सर्वमान्य झालेले लेख वृत्तपत्रांतूनच कसे प्रथम प्रसिद्ध झाले याची आठवण करून दिली आणि मराठी भाषेविषयी शेवटी निर्वाळा दिला की—

"वस्तुतः आजमितीस व्यवहारांतील व ग्रंथांतील मराठी भाषेंत जें सौष्ठव, मार्मिकपणा, भारदस्तपणा, प्रौढता, शब्दसामुग्री, वैचित्र्य, सुत्रोधपणा वगैरे अनेक चांगले गुण दिसतात त्याला पुष्कळ अंशाने निबंधमाला, विविधज्ञान-विस्तार वगैरे मासिकपुस्तकें व हल्लींचीं मुख्य मुख्य वर्तमानपत्रें त्यांतील लेखच कारणीभूत झाले आहेत हें कोणीहि समंजस माणूस कबूल करील."

याच वर्षी सरकारी बुक कमिटीने आमच्या वर्णमालेची उलटापालट करून मुलांना नव्याने अक्षर-ओळख देण्याचें शिकविलें तेव्हा तिच्या या धोरणावर 'आमच्या वर्णमालेचा खून' अशा जळजळीत शब्दांत त्यांनी हल्ला चढविला आणि नेहमी न वापरलेल्या उपरोधाचें हत्यारहि या वेळीं चालविलें.

"कमिटीचें असें मत झालेलें आहे की अ आ इ ई इत्यादि वर्णमालेचा हल्ली जो क्रम आहे तो गैरसोयीचा व कठीण आहे... त्यापेक्षा 'ग' हें उभ्या दोन रेघांचें सोपें अक्षर शिकविलें असतां मुलें तीं लवकर शिकतील आणि अशा

रीतीने 'ग' झाल्यावर 'म' मग 'भ' पुढे 'र' व त्यापुढे 'ड' शिकविला म्हणजे अखेरीस विद्यार्थ्यास 'ढ' ची ओळख करून देण्याची चांगली सोय होईल."

याच लेखांत पुढे आमच्या वर्णमालेचें श्रेष्ठत्व सांगतांना प्रो. मॅक्डोनेल व प्रो. ब्लूमस्फील्ड यांचीं वचनें देऊन 'फॉयलॉलाजी हें नवें शास्त्र युरोप अमेरिकेंत निघालें त्याची व्युत्पत्ति पाणिनीच्या व्याकरणापासून झाली आणि इंग्रजी भाषेंतील keep या क्रियापदास भूतकालवाचक d हा प्रत्यय लागल्याने त्याचें रूप kept का होतें याची उपपत्ति पाणिनीच्या व्याकरणाचा युरोपांत प्रसार होण्यापूर्वी तेथे कोणासहि समजलेली नव्हती' असें महत्वाचें विधान करून शेवटीं 'आम्हास आमचीं पोरें वर्णमालेच्या संबंधाने तरी युरोपियन पोरांप्रमाणे गाढव व्हावयास नको आहेत' असें खणखणीतपणे बजावण्यास टिळक मागेंपुढे पाहत नाहीत.

पुढे सरकारी बुक कमिटी मराठी शुद्धलेखनाच्या बाबतींत कांही ढवळाढवळ करील अशी शंका लोकांच्या मनांत आली तेव्हांहि टिळकांनी कमिटीला उद्देशून स्पष्ट लिहिलें की--

"इंग्रज सरकारचें राज्य आमच्यावर झालें म्हणून तें आमच्या भाषेंतील सर्व ऱ्हस्वदीर्घवेलांटचांवर झालेंच पाहिजे असा कांही कायदा नाही."

आपल्या मातृभाषेविषयी अशी योग्य अभिमानाची जाणीव आणि त्या जाणिवेच्या पोटीं प्रतिपक्षावर कडाडून हल्ला करण्याची प्रवृत्ति जशी टिळकांच्या लेखनांत दिसते, तशीच प्रसंगीं आपल्या भाषेंतलें एखादें न्यून स्वप्रतिभेच्या सामर्थ्याने सरते करण्याची, वैगुण्य नाहीसें करण्याची विधायक प्रवृत्तिहि आढळते. महाभारतावरील परीक्षणांत त्यांच्या विधायक प्रवृत्तीचा हा पैलू विशेष उठून दिसतो. महाभारताचें 'काव्य' या दृष्टीने परीक्षण करतांना संस्कृत साहित्यशास्त्रांत आर्षमहाकाव्याचें लक्षण नाही आणि आर्नोल्ड प्रणीत इंग्रजी लक्षण त्याचें मूल्यमापन करतांना अपुरें पडतें असें केवळ सांगूनच टिळक स्वस्थ बसलेले नाहीत, तर तेथल्यातेथे महाभारतांतील वेगवेगळ्या अंगोपांगांना लागू पडेल असें आर्षमहाकाव्याचें लक्षण स्वतःच निर्माण केलें. टिळकांच्या लेखनांतील ही विधायक प्रवृत्ति सर्वांत महत्वाची आहे. लो. टिळकांचीं हीं सारीं परीक्षणें १८९० ते १९०८ च्या काळांत लिहिलेलीं आहेत. या कालखंडाचें वैचारिक नेतृत्व करण्याचा मान लो. टिळकांनाच दिला जातो. या कालखंडांत महाराष्ट्रांत जें स्वाभिमानाचें व स्वातंत्र्यप्रीतीचें युग उदयाला आलें त्यांचें लक्षण सांगतांना १९०८ सालच्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष रा. ब. चिंतामणराव वैद्य यांनी आपल्या अध्यक्षपदावरील भाषणांत 'स्वदेशप्रीति ही आजच्या युगांतील मराठीची अधिष्ठात्री देवता आहे' असें म्हटलें होतें आणि त्यांचें समर्थन करतांना लोकमान्यांनी जे उद्गार काढले ते त्यांची वाङ्मयीन दृष्टि समजून घेण्याच्या दृष्टीनें संस्मरणीय ठरतील. लोकमान्य म्हणतात—

"परिस्थितीला अनुसरून लेखनकलेच्या अधिष्ठात्री देवतेचें स्वरूप बदलत असतें. स्वाभिमान व स्वदेशप्रीति ही सांप्रतच्या लेखकांची प्रतिभा चेतविणारी देवता आहे."

लो. टिळकांनी टीकाक्षेत्रांत याच वाङ्मय-मूल्यांचें प्रवर्तन केलें आणि हीच त्यांची महाराष्ट्राला मिळालेली निश्चित वैचारिक देणगी होय.

अनुक्रमणिका

श्री अरविन्दांची भविष्यवाणी

श्री. जनार्दन माधव कायन्दे

'युगवाणी' हें कोणत्याहि राजकारणाचा प्रचार करणारें नियतकालिक नाही. तथापि राजकारणाचीहि अपक्ष भूमिकेवरून तात्विक चर्चा होऊं शकते असें आम्हांस वाटतें आणि याच भूमिकेवरून प्रस्तुत लेखाकडे पाहावें अशी आमची विनंती आहे. या लेखाचे लेखक श्री. कायंदे हे अरविंदांचे अभ्यासक व भक्त असून थोर तत्त्वचिंतक आहेत. हा लेख २ आगस्ट १९५३ रोजीं लिहिला गेला असून तेव्हापासून तो अप्रसिद्ध अवस्थेंत होता. लेखांतील वर्तमानकाली विधानें त्या काळचीं आहेत. 'युगवाणी'तील या किंवा कोणत्याहि लेखांतील मताबद्दल ते ते लेखक जबाबदार असतात. एका राजकारणी पुरुषाच्या निमित्ताने निघणाऱ्या या अंकांत त्यांच्या समकालीन दुसऱ्या एका राजकारणी पुरुषासंबंधीचा लेख देणें उचित वाटल्यावरून तो याच अंकांत दिला आहे.

—संपादक

१५ ऑगस्ट, श्री. अरविंदाचा वाढदिवस; १५ ऑगस्ट, भारतीय स्वातंत्र्याचा वाढदिवस; हा एक विलक्षण योगायोग दिसतो. श्री. अरविंद आपल्या तत्त्वज्ञानांत नेहमी एक विधान करीत असतात की जगांत योगायोग अशी वस्तू नाही. सर्व गोष्टी सवशक्तिमान परमेश्वराच्याच इच्छेने घडत असतात. त्याची इच्छा कळूं लागली, त्याप्रमाणे आपण वागूं लागलो म्हणजे त्यांतील कार्यकारणभाव तथा औचित्य स्पष्ट दिसतें. त्यांचें सर्व जीवन दिव्यशक्तीचा अविष्कार करण्याच्या प्रयोगांत व्यतीत झालें. त्या दिव्यत्वाच्या साक्षात्कारामुळे ते म्हणत असत की मी जरी बाह्य जगाशीं संबंध सोडला असें दिसतें तरी ज्या कार्याकरता तो सोडला तें कार्य अदृश्यपणें अधिक सामर्थ्यानें माझ्याकडून होत आहे. या विधानावर श्रद्धावान, प्रेमळ भक्त आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचे, जीवनाचे चहाते मंडळी विश्वास ठेवीत असत. इतरांस तें पटणें अर्थातच कठीण. पण १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्यदिन उगवला तेव्हा ते आत्मप्रत्ययाने म्हणाले, माझ्या दिव्यजीवनाचें कौतुक म्हणून परमेशाने माझ्या वाढदिवसाचा आहेर म्हणून माझ्या देशाचें स्वातंत्र्य मला बहाल केलें ! श्रद्धावान लोकांस आनंदाची बेहोशी आली. इतरांस बुवाबाजी वाटणें शक्य आहे.

परंतु वरील विधानापेक्षाहि अधिक स्पष्ट भविष्यवाणी त्यांच्या मुखांतून निघाली. ती अशी की हा भारत देश, हिंदुस्थान आणि पाकिस्तान असा दुभंगला हें दुर्दैव होय. हें दुर्दैव दूर झालें पाहिजे, तें होईलच असें आत्मविश्वासाने ते बोलले. हा दुभंग झालेला देश पुन्हा अभंग, अखंड होईलच. मग तो कोणत्या का मार्गाने होईना ! हीच श्री अरविंदांची अमर भविष्यवाणी—याबद्दल थोडा विचार करूं या.

कांही दिवसांपूर्वी राज्यपाल कन्हैयालाल मुन्शी यांचा विस्तृत, उद्बोधक आणि वैयक्तिक अनुभवाने ओथंबलेला एक लेख अरविंदांबद्दल प्रसिद्ध झाला आहे. तो अनेकांच्या वाचनांत आला असला पाहिजे. त्यांतील खालील मजकूर फार महत्त्वाचा आहे. ते म्हणतात मी अरविंदांची गणना जगद्गुरूंच्या मालिकेंत करतों पण मी स्वतःला शिष्य म्हणवून घेत नाही. माझा मार्गहि बदलत नाही. मला स्वप्नांत दर्शन झालें आणि मी भेटीला गेलों. त्यांनी देखील माझा मार्ग मी सोडूं नये, असेंच मला बजावलें, पण एक हलवून सोडणारें विधान

त्यांनी केले. ते म्हणाले हा दुभंगला भारत अभंग केव्हा होईल ? मी नम्रपणे उत्तरलों-जोपर्यंत आज राज्य करणारे सूत्रधार राजकारणांत प्रबल आहेत तोंपर्यंत तरी हिन्दुस्थान पाकिस्तान एक होण्याची आशा मला तरी नाही ! त्यांनी थोडें स्मित केलें आणि शांतपणे म्हणाले, हा देश पुनः अभंग, अखंड होईल. शंका नको, मला तर हें स्पष्ट दिसत आहे ! या विधानाला मत म्हणावें, भविष्य वाणी म्हणावी की साक्षात्कार म्हणावा याबद्दल मी बुचकाळ्यांत पडलों. तो भाव माझ्या चेहऱ्यावर उमटला आणि तसा संशय व्यक्त देखील केला, पण त्यांनी पुनः ठासून मोजक्या दोन वाक्यांत हा देश अभंग कसा होईल हें स्पष्ट केलें. पाकिस्तानची प्रस्तुत भूमिका काय आणि ती अभंगत्वांत कशी परिणत होईल हें माझ्या निदर्शनास आणून दिलें. श्रद्धावान् आशावादी भक्त या नात्याने विश्वास वाटला तरी राजकारणी मुत्सद्दीपणांस हें विधान पूर्णत्वाने गृहीत होणें कठीण वाटलें. १५ ऑगस्ट १९४७ चें जें वाक्य प्रसिद्ध झालें आहे तें असें आहे.

"India is free but she has not achieved unity, only a fissured and broken freedom......But by whatever means the division must and will go." (श्री. अरविंदांचा सन्देश.) श्री. मुन्शीना जीं दोन वाक्यें सांगितलीं तींहि प्रकाशांत आलीं असतीं तर बरें झालें असतें पण प्रस्तुत राजकीय परिस्थिति तथा त्यांची प्रस्तुत जबाबदारी यांमुळे कदाचित् तीं वाक्यें गुलदस्तांत राहण्यांतच औचित्य आणि हित अधिक असणें संभवनीय आहे.

अभंगत्वाच्या भविष्यवाणीबद्दल संशय घेण्याचें कारण उरलें नाही. उरलें तें कोणत्या मार्गाने ही गोष्ट घडून येईल याबद्दल विचार तथा आचार करणें. त्या दृष्टीने अरविंदांच्या आणखी एका वाक्याचा विचार करणें अगत्याचें आहे. तें असें—Rest assured that our culture cannot be undermined. This is only a passing phase भारतीय तत्वज्ञान, भारतीय संस्कृति यांस ओहटी लागणें अशक्य आहे. आज तिचा प्रकाश, प्रभाव कमी होत आहे असें दिसत असेल पण हा काळ फार थोडा आहे. काळ पालटेल, कळा पालटेल, दिव्यत्वाचा काळ सुरू होईल, अभंगत्वाचा अनुभव येईल. वरील विचार हृदयांत कालवाकालव उत्पन्न करतात, मन आशेनें भरून येतें, क्षणभर निराशा लोपल्यासारखी वाटते पण सत्याचा साक्षात्कार झाला म्हणजे त्यांना जें स्पष्ट दिसतें तें आम्हांस दिसत नाही-तें दिसावें ही अपेक्षा बळावते. त्याकरता त्यांचा मार्ग चोखाळावासा वाटतो.

त्यांचा मार्ग स्पष्ट आहे. आत्यंतिक श्रद्धेची कांस धरून निःशेष समर्पण करावें. ईशशक्ति हाती धरून तुम्हास 'सत्यमंदिरांत' नेत आहे असा तुम्हास अनुभव येईल. असें अरविंदांनी सांगून ठेवलें आहे त्यांच्या पूर्वी झालेल्या ऋषिवर्यांनी देखील हेंच सांगितलें. पण थोड्या फरकांत श्री. अरविंद म्हणतात— माझा योग व्यक्तिकरता नाही समष्टीकरता आहे. आद्यशक्तीच्या प्रकाशांत मी एकटाच राहूं इच्छित नाही. तो प्रकाशच भूवर पसरावा, नांदावा असा माझा प्रयत्न आणि प्रयोग आहे. तेव्हा हा प्रकाश भूवर आणण्याकरिता श्रद्धावान् व्यक्तींनी आत्मसमर्पणाद्वारें प्रयोगांत सहभागी, सहकारी व्हावें हें अगत्याचें आहे.

हा मार्ग प्रेमाचा आहे. सिद्धावस्था प्राप्त केलेल्या, झालेल्या सिद्धांस आपपर भावना शिवत नाही. त्यांच्या आश्रमांत भेदभावास मूठमाती दिली गेली आहे. हे सर्व गृहीत धरूनहि, श्रद्धावान् मनांतहि असा प्रश्न डोकावतो की, ईशशक्तीने शेलापागोटें असा पूर्ण आहेर न करतां शेला अरविंदास आणि पागोटें 'जिनां'स कां बहाल केलें ? याला एकच उत्तर संभवनीय आहे ! जिनांनी देखील ईशशक्तीची प्रार्थना, उपासना केली होती ! जनताजनार्दन-साक्षात्कार दोघांसहि झाला. न्यायी परमेश्वराने जवळ असलेल्या अहेराची वाटणी केली--पण हें उत्तर व्यवहारीच काय पण श्रद्धावान् लोकांसहि पटणार नाही. याचें उत्तर निराळें असलें पाहिजे. आणि त्यांच्या लिखाणांत असले पाहिजे. ते त्यांच्या आश्रमीय जीवनांत दिसलें पाहिजे. तें प्रत्यक्षांत प्रभावी ठरलें पाहिजे.

ज्या वेळेस त्यांची अभंगत्वाची भविष्यवाणी पहिल्या प्रथम माझ्या वाचनांत आली तेव्हा त्यांतील

by whatever means या शब्दसमूहावर मी स्थिरावलों. by truth and non-violence only पेक्षा ते निराळे आहेत हें सहज लक्षांत आलें आणि वरेंच वर्षापूर्वी वाचलेलें एक महत्वाचें वाक्य आठवलें. This universe is the God's Lila. The dance of Vrindavan is one aspect of that Lila. The death dance of Kurakshetra is its another aspect its counterpart त्यांच्या मतें सत्याचा आविष्कार कधी वृन्दावनांतील नृत्यांत होईल, कधी धर्मक्षेत्र कुरुक्षेत्राच्या रणधुमाळींत, युद्धाच्या तांडव नृत्यांतहि ! या दृष्टीने विचार केला आणि त्यांच्या समग्र तत्वज्ञानाचें आलोडन केलें, आश्रमीय जीवनाचें निरीक्षण केलें तर एकच गोष्ट प्रामुख्याने लक्षांत भरते. ती गोष्ट म्हणजे सामर्थ्यसंचयाचा, शास्त्रसिद्ध, अखंड, अविरत प्रयत्न ! 'नाऽयमात्मा बलहीनेन लभ्यः' हें सूत्र सामर्थ्यसंपन्न होऊन त्यांनी मिळविलेली स्थिति हें ध्येय. त्यांत हिंदभूचें अखंडत्वहि आलेंच ! हा ध्वनि 'शक्तीनें मिळती राज्यें, युक्तीने कार्य होतसे,' असें त्यांनी १९२६ पर्यंत प्रतिपादन केलें, पुढे 'योगसु कौशलम्'चा धडा दिला ! कार्य अजून अपुरें आहे तें पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. त्यांचा पूर्ण संदेश तथा आशय लक्षांत घेऊन प्रयत्नशील होणें, कार्यान्वित होत राहणें आपलें कर्तव्य असें मी मानतों. तेव्हा By whatever means चे तीन अर्थ संभवतात. Our culture cannot be undermined या संदर्भात विचार केल्यास आणि भारतीय संस्कृतीचा आत्मा प्रकाशरूप आहे हें अनुभविल्यास ज्या वेळेस भारतीय राजकारणाची तथा राज्याचीं सूत्रें भारतीय संस्कृतिप्रकाशाने ज्यांचीं हृदयें प्रकाशमान झालीं आहेत अशा सामर्थ्यसंपन्न लोकांच्या हातीं येतील तेव्हा ही गोष्ट. हें अभंगत्व लीलया निर्माण होईल असें म्हणणें भाग आहे. राज्यपाल मुन्शीना देखील ही गोष्ट अंतरीं पटली आहे असें म्हणण्याकरिता मजजवळ भरपूर पुरावा आहे. या दृष्टीने थोडा अधिक विचार करा. श्री अरविंदाचे नंतर त्यांच्या आंतरराष्ट्रीय विश्वविद्यालयाचें उद्घाटन आजचे भारतीय जनसंघाचे अध्यक्ष डॉ. मुकर्जी यांनी केलें होतें, ही गोष्ट अनेकांच्या लक्षांत असेल. माझ्या दृष्टीने या गोष्टीला फार अर्थ आणि महत्त्व आहे. हा केवळ योगायोग आहे असें श्री. अरविंदांचे भक्त तरी म्हणूं शकणार नाहीत ! ही ईश्वरी योजना आहे. श्री. मुन्शी कांही दिवस कांग्रेसच्या बाहेर होते, तेव्हा आगस्ट १९४७ नंतर त्यांनी टाईम्समध्यें एक फार महत्त्वाचा लेख लिहिला होता. तो लेख असा होता की त्या लेखावर डॉ. मुंजे यांचें किंवा डॉ. मुकर्जी यांचें नांव घालून आज कोणी छापला तर सहज खपण्यासारखा. या दोघास ही अरविंदांची स्फूर्ति अदृश्यपणे कार्यान्वित करीत आहे असें मी म्हणूं शकतों. सुनिश्चयाच्या अभावीं १९५२ ची संधी गमावली; पण १९५७ च्या आंत राज्यनियंत्रणांत खांदेपालट होण्याचा फार संभव आहे ! विपरीत भासणाऱ्या घटना अनुरूप, अनुकूल फळें पदरांत टाकतील असाच संभव अधिक, जागरुकपणे पाऊल टाकणेंच कर्तव्य. कांग्रेसमध्यें देशाच्या खंडितपणाबद्दल अश्रु ढाळणारे शेकडा ९९ आहेत. पण स्वार्थ, व्यवहार-चातुर्य धड रडूं देत नाही, तोंड उघडूं देत नाही, अशी त्यांचीहि स्थिति आहे. राज्यपाल मुन्शीनी गुलदस्तांत ठेवलेलीं श्री. अरविंदांचीं वाक्यें त्यांनी ज्ञानदृष्टीनी वाचलीं, अर्थ ध्यानीं आणला, आणि धैर्याने पाऊल पुढे टाकलें तर, तर प्रत्यय येईलच !

दुसरा अर्थ मी "रक्षाबंधन" या शब्दाने व्यक्त करीत असतों. हिंदी भाषेचे एक सुप्रसिद्ध लेखक श्रीहरि कृष्णप्रेमी यांनी 'रक्षाबंधन' नांवाचें एक उत्तम नाटक लिहिलें आहे. हिंदुमुस्लिम ऐक्य यांतील एक महत्त्वाचा आशय आहे. त्यांत कर्मवती राणी अविवेकी आणि आततायी मुस्लिमांच्या तडाख्यांत सापडली तेव्हा तिने विवेकी हुमायुंस राखी, पाठवून बंधुप्रेमभावनेने त्याला गोवून मदतीस बोलावलें. अविवेकाविरुद्ध विवेक उभा केला, तसेंच त्यांतील धर्मगुरु शाहशेख अवलिया स्वबांधवांस विवेक आणि शांति मंत्राची दीक्षा देतो ! हें दृष्य अरविंद आश्रमीय शिक्षेने निर्माण होणें शक्य आहे अशी माझी भावना आहे ! हें पुस्तक मुळांतून एकदा वाचण्यालायक आहे. शाळा, कॉलेजें आणि ऐक्यवर्धक संस्थांतुन या नाटकाचे

प्रयोग झाले पाहिजेत असें मला फार वाटतें. गांधी-बाबांच्या प्रेमानें कपट आणि क्रौर्य जिंकण्याच्या प्रयत्नाला पाकिस्तानचीं फळें पाहिलीं आणि चाखलीं त्यांस हा रक्षाबंधन, स्नेहबंधन भाषाप्रयोग पटणार नाही हें स्पष्ट आहे; पण अरविंदांचें प्रेमाचें तत्वज्ञान म. गांधींपेक्षा निराळें होतें आहे, हें ज्यांच्या ध्यानीं आहे त्यांनी याचा विचार करावा. अहिंसा, हिंसा, युद्ध इ. बद्दलचीं श्री अरविंदांचीं मतें स्पष्ट आहेत. श्री. अरविंद हे शुद्ध सत्याग्रही होते म्हणजे त्यांत हिंसेचा किंवा अहिंसेचा विचार प्रमुख नसून फक्त सत्याचा आग्रह होता. त्यांच्या समबुद्धीला वृंदावनांतील गोपींचें आनंद-नृत्य आणि कुरुक्षेत्रावरील रणमर्दांचें तांडव यांत अभेदाचा प्रत्यय होता, ही गोष्ट विसरून चालणार नाही. पण इतका दूरचा विचार करण्याचें कारण नाही. म. गांधीचे वारस जे आज राज्य करतात ते काय अहिंसेचें तुळशीपत्र कानांत घालून करतात? 'शक्तीने मिळती, टिकती राज्यें' हें समर्थांचें वचन त्यांनाहि कळतें. त्यांचें कुठें चुकत असेल तर ते फक्त शक्तीचा उपयोग केव्हा, कोठे, किती, कोणाविरुद्ध करावा याचें तारतम्य त्यांस कधीकधी राहत नाही. तारतम्य नाही म्हणजे विवेक नाही आणि म्हणून 'विवेकभ्रष्टानां भवति विनिपातो शतमुखः' हें त्यांच्या नशिबीं लिहिलें आहे. त्यांच्या अविवेकाचीं फळें देशाला भोगणें प्राप्त आहे. त्याला उपाय नाही. this is a passing phase असें श्री अरविंद म्हणाले त्यांत मला आशा दिसते. सर्व विवेकी लोकांस दिसावी.

आणखी एक तिसरा अर्थ आहे! तो अर्थ मला रुचत नाही, पटत नाही पण टाळतां येत नाही. त्याचा विचार झालाच पाहिजे. पाकिस्तान होण्यापूर्वी 'हिंदुस्थान हमारा, नही किसीके बापका' अशी आरोळी कांही पुढारी देत असत. त्यास जिहादचें प्रत्युत्तर मिळालें. 'लढके लेंगे पाकिस्तान' या आरोळीनें पाकिस्तान निर्माण झालें! आता उरलेल्या हिंदुस्थानांत पहिली आरोळी स्पष्ट उठत नाही पण पाकिस्तानांत 'हिंदुस्थान हमारा' पार्टीची स्थापना झाली आहे. 'आणि हंसके लेंगे हिंदुस्थान' हा आत्मविश्वास निर्माण करण्याचें कार्य चालू आहे! पाकिस्तानांत काय शिजतें याचा वास देखील आपल्याला येत नाही, आला तरी आपण सोवळेपणानें नाकास रुमाल लावतो आणि वास घाण कांहीच नाही अशी समजूत करून घेतों! हिंदुस्थानांत काय घडतें याची मात्र त्यांस खिस्तंबातमी असते! या देशांतील सर्व मुसलमान 'हिंदुस्थान हमारा' पार्टीचे सभासद. तेव्हा उभें हिंदुस्थान लौकरच पाकिस्तान होणें सहज शक्य आहे आणि त्या दृष्टीनेंहि योगी अरविंदांची ऐक्यतेची भविष्यवाणी खरी होऊं शकेल! पण— मला हें रुचत नाही, पटत नाही; कारण our culture cannot be undermined असें तें म्हणाले या गोष्टीची मला जाणीव आहे! ही जाणीव अनेकांस आहे. पंडित नेहरू, अयंगार आणि मंडळी पेचप्रसंगांत असतील पण भ्रमांत नसावी असा माझा तर्क आहे. कदाचित् याबाबतीत मीच भ्रमांत असेन!

पाकिस्तानच्या दृष्टीने विचार केल्यास लियाकत अल्लीखां हरपल्यानंतर तेथेंहि अंतर्गत भांडणें, परस्पर द्वेष, असहिष्णुता वाढत्या प्रमाणावर आहे. पाकिस्तानांतील खरोखर पाक लोकांच्या हृदयांत अल्लीची ललकारी उठत असलीच पाहिजे आणि आज ना उद्या धर्माच्या नांवावर चालूं असलेल्या अत्याचारांचा ते निषेध करतीलच असें गृहीत धरणें म्हणजे माणुसकीला माणुसकीचा आहेर करणें आहे. तेव्हा याप्रमाणे कालमान बदलल्यावर पाकिस्तान हिंदुस्थान यांतील माणुसकीचा दुवा जुळणें अशक्य नाही! इंग्रज गेले तरी त्यांच्या देशांत जावेसें वाटते, त्यांची मैत्री असादीशी वाटते. त्यांच्या अनेक चांगल्या गोष्टी पचनीं पडतच आहेत. तसेंच मुसलमानांबद्दलहि उद्या होणें शक्य आहे! या दृष्टीनें प्रस्तुत परिस्थितीचा विचार करूं लागल्यास मला एक विचार सुचतो. तो असा की पूर्वी अनेक जाती (हिंदुलोकांत) होत्या त्या आता जवळपास मोडल्या. नंतर राजकीय जातींचा काळ सुरू झाला. कॉंग्रेस, शेडयूल्ड कास्ट, हिंदुमहासभा, कम्युनिस्ट अशा जातींतले परस्पर रोटीबेटी व्यवहारनिषेध पाळूं लागले! हल्ली याहि लोपून नवीन जाती दृष्टीसमोर येतात. त्या खालीलप्रमाणे—

पाकिस्तानी मुसलमान
हिंदुस्थानी हिंदु

पाकिस्तानी हिंदु
हिंदुस्थानी मुसलमान

पैकी पाकिस्तानी मुसलमान पाकिस्तानांत आहेत. इतर तीन भारतांत आहेत. भारतांतील जाति पोटजाति आहेत. हिंदुस्थानी हिंदु २ प्रकारचे पहिले कडवे, पाकिस्तानी मुसलमानासारखे सामन्याचाच प्रसंग आल्यास या पाकिस्तानी मुसलमानांची आणि हिंदुस्थानी हिंदूंची मैत्री लवकर जुळेल! दोघेहि सामर्थ्यवान्, श्रद्धावान्, शीलवान्, मरणामारण्यास तत्पर. म्हणून सहसा कोणी कुणाची आगळीक करण्यास धजणार नाही. दुसरे हिंदुस्थानी हिंदु हे शेळया मेंढयांच्या कळपासारखे! यांना कोणीहि कापून खावें! पाकिस्तान निर्माण होण्यांत इंग्रजांचा कावा, कांग्रेसी अवसानघात, कांही धूर्तांचा दूरदर्शीपणा जसा कारणीभूत झाला तसा या हिंदूंचा गवाळपणाहि कारणीभूत आहे हें विसरून चालणार नाही. पाकिस्तानी हिंदु देखील दोन प्रकारचे. एक पाकिस्तानांतून इकडे आले ते आणि दुसरे पाकिस्तानाबद्दल भीतियुक्त आदर आणि स्नेह बाळगणारे, धूर्त उदार मंडळी. हे दोघेहि हिंदुहितापेक्षा पाकिस्तानची अधिक काळजी वाहतात. हिंदुस्थानी मुसलमान हेहि दोन प्रकारचे. अजूनहि हिंदुस्थानांत राहून पाकिस्तानी सर्व कारस्थानाला मदत करणारे आणि दुसरे धूर्त मुत्सद्दी, पण मुसलमानपणा न विसरणारे! या दृष्टीने विचार केल्यास कट्टर हिंदुस्थानी हिंदु सोडले तर उरलेली सर्व भारतीय प्रजा पाकिस्तानी अंमलाखाली राहण्यासारखी असें दृश्य दिसतें. हें दृश्य आवडत नाही, पाहवत नाही; पण हें दृष्टीसमोरून हालतहि नाही.

संतांची भविष्यवाणी कोणत्या अर्थाने खरी ठरेल याबद्दल मन द्विधा होतें तें याच दृश्यामुळे. पण संताच्या वचनांचा अर्थ सम्यक् रीतीने लक्षांत येण्याकरिता त्यांच्या वाङ्मयाचा व्यवस्थित अभ्यास केला पाहिजे. त्यांचा उपदेश लक्षांत घेऊन त्याबरहुकूम प्रयत्नहि केला पाहिजे. कोणतेंहि सत्कृत्य लयास जात नाही, हें जाणून त्यांनी घालून दिलेला धडा गिरवला पाहिजे म्हणजे त्यांची दृष्टि, त्यांचें सामर्थ्य, त्यांचें भविष्य या सर्वांचा प्रत्यय येईल असें मला निश्चित वाटतें.

The message as broadcasted from Trichanopoly by the All India Radio is—"August 15th is my own Birthday. Credit is naturally gratifying to me that it should have assumed this vast significance. I take this coincidence, not as a fortuitous accident but as the sanction and seal of the Divine Force that guids my steps on the work with which I began Life, the beginning of its full fruition."

लेखकांस प्रार्थना

(१) युगवाणीसाठी पाठवावयाचा लेख अभ्यासपूर्ण, वजनदार, उपयुक्त, मौलिक, तरीहि यावच्छक्य सुलभ, असा असावा. लेखकापेक्षाहि लेखाचें महत्व 'युगवाणी'स विशेष आहे. लेख कागदाच्या एकाच बाजूस, समास सोडून, टपोऱ्या अक्षरांत लिहिलेला असावा. शुद्धलेखन नवें असावें.

(२) लेख आम्हांला मिळतांच तीन आठवडयांत त्याचा निर्णय लेखकांस कळविण्यांत येईल. स्वीकृत झालेला लेख आम्हांस न कळवितां अन्यत्र प्रसिद्धीसाठी पाठवूं नये.

(३) पुरेसें पोस्टेज सोबत असेल तरच अस्वीकृत लेख लेखकांकडे परत पाठविण्यांत येईल. एरव्ही सुमारें एक महिन्यानंतर तो निकालांत काढण्यांत येईल.

(४) उत्कृष्ट ललित साहित्यहि प्रसंगोपात्त अत्यल्प प्रमाणांत प्रसिद्ध करण्यांत येईल.

(५) चालू वर्षी कोणीहि कविता पाठवूं नये. पाठविल्यास त्यांची दखल घेतली जाणार नाही.

—संपादक

"इष्ट असेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार !"

तु. ना. काटकर

बाळ गोपाळ

बाळपेक्षा गोपाळ केवळ नऊ दिवसांनी ज्येष्ठ. बाळ २३ जुलै १८५६ दिनांकीं जन्माला आले तर गोपाळ १४ जुलै १८५६ रोजी, दोन्ही सहाध्यायी ब्रह्म-कुलज. घराणेंहि सुविख्यात. पण यांच्या जन्मांने त्यांचीं घराणीं अधिकच उजळून निघालीं. "पुत्र व्हावा ऐसा गुंडा, की ज्याचा त्रिलोकीं झेंडा" अगदी तसें झालें. या दोन महाभागांच्या जन्माला पाहतां पाहतां एक शतक लोटलें. तोच हा टिळक–आगरकर जन्मशताब्दी महोत्सव !

महत्वाकांक्षी आगरकर

या महोत्सवाचे वेळीं त्यांना नत न होणारें महाराष्ट्रीय मस्तक विरळा. टाकीचें "घाव सोसल्या-शिवाय देवपण येत नाही" म्हणतात. तसेंच अगदी आगरकरांचें आहे. आगरकरांची गृहस्थिति जेमतेम, पण महत्वाकांक्षा फार मोठी. त्यांनी आपल्या शालेय गुरूस पाणीदारपणानें दिलेलें उत्तर सुविख्यातच आहे. "मी तुमच्यासारखा एम्. ए. होईन तरच नांवाचा आगरकर !" बोललेले शब्द खरें करणें मामुली गोष्ट नव्हती. आणि तीहि विपन्नावस्थेंत की ज्यांना एकच सदरा जो दिवसा अंगांत घालायचा आणि रात्री धुवून साफ करायचा. घरांत जाळायला मातीचे तेल नाही तर मग बसा नगरपालिकेच्या कंदिलाखाली आणि करा अभ्यास. ही ज्याची दैन्यावस्था ! अशा महत्वाकांक्षी विद्यार्थ्यानें फ्रेंच सुधारकाग्रणी वाल्टेअर सारख्याला मागे टाकलें नाही तरच नवल.

शिक्षण व अध्ययन

गोपाळरावांचें प्राथमिक शिक्षण पुण्याला झालें. माध्यमिक आकोला येथे त्यांचे मामा महाजनी यांचे आश्रयाने. आणि महाविद्यालयीन शिक्षण पुणें येथे डेक्कन कॉलेजांत. लो. टिळक म्हणत असत, "शाळेंतील शिक्षण जन्मभर पुरत नाही यास्तव ग्रंथ हेच आपलें कायमचे गुरु होत." तसेंच आगरकर वागत आले. ते बुद्धिवादाचे पूर्ण पुरस्कर्ते. त्यासाठी त्यांनी जॉन स्टुअर्ट मिल, हर्बर्ट स्पेन्सर व लॉर्ड जॉन मोर्ले यांच्या ग्रंथांचें, मतांचें कसून अध्ययन केलें. हें सर्व पाश्चिमात्य पंडित ग्रंथकार "नास्तिक" म्हणून ओळखिले जात. तेंच नेमकें विशेषण महाराष्ट्रीयांनी आगरकरांना दिलें होतें.

आगरकरी बुद्धिवादाचा पाया

बुद्धिवाद हा आगरकरांच्या विचारसरणींतील अत्यंत महत्वाचा भाग आहे. प्रत्येक गोष्टींत बदल होत असतोच. या तत्वाला गतितत्व असेंहि म्हणतात. दुसरें तत्व समता व समष्टि. ती न्याय आणि दया यांना अनुसरून असावी असें आगरकरांचें ठाम मत होतें. आणि तिसरें व्यक्ति स्वातंत्र्य. "बाबा वाक्यं प्रमाणम्" हें तत्व सुधारणावादाला पूर्ण घातुक ठरणारें आहे असें ते स्वप्रज्ञेने सांगत. प्रगत विचार–आचाराकरिता स्वतंत्र प्रज्ञाच हवी. अशी आगरकरांची निश्चित श्रद्धा होती. म्हणूनच ते आधी सामाजिक सुधारणांची आव-श्यकता जीवनभर प्रचारीत आले. सत्य–निर्भेळ सत्य–निर्भयपणे लोकांपुढे मांडण्याचें महातत्व त्यांनी आमरण स्वीकारिलें होतें.

संस्था सहकार

अध्ययनोत्तर इ. स. १८८४ मध्यें आग-रकर–टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून तिच्याद्वारा इ. स. १८८५ मध्ये फर्ग्यु-सन कॉलेज चालू केलें. आगरकर जसे सामाजिक

सुधारक होतें तसेच राजकीय सुधारकहि पण होतें. " इष्ट असेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार" हाच त्यांचा बाणा होता. बोलत तसें ते चालत. सामाजिक रचनेंतील व्यंगें त्यांना पुरेपूर कळलीं होतीं, नि ढोंगांची माहिती त्यांना उत्तम झाली होती. त्यांच्या लिखाणांत द्वेष, मत्सर, असत्य, चिडखोरपणा बिलकुल आढळणार नाही. त्यांचीं हीं तत्त्वें म. गांधींनाहि पूर्ण मान्य होतीं. सोवळयांची मीमांसा, समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक, विवाहनिराकरण, प्रियाराधन, वल्लभोपासना, सामाजिक स्थित्यंतरें, आमचे प्रेतसंस्कार, स्त्री-पुरुषांचें सहाशिक्षण आदि त्यांचे " सुधारकां "तील लेख त्या काळीं खूपच गाजले. ते इतके की ब्रिटिशांच्या दंडुकेशाहीपेक्षा आगरकरांचें शब्दप्रामाण्य सनातन्यांना काळ झालें. सत्य हें कटुच असतें. आगरकरांना स्वतःची सुधारणा पाहायला मिळाली नाही. पण आज आपण त्यांचे जन्मशताब्दीचे कालांत पूर्ण आगरकर युगांत वावरत आहोत याबद्दल संदेह वाटत नाही.

आगरकर साहित्य

गोपाळ गणेश आगरकर " केसरी " चे संस्थापक, पहिलें संपादक, न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन सोसायटी, व फर्ग्युसन कॉलेज व त्याचे दुसरे प्राचार्य (प्रिन्सिपाल) अशा विविध क्षेत्रांशीं संबंधित. नंतर "सुधारक" पत्राचें संस्थापक व संपादक. त्यांचे परलोकगमनानंतरहि तें अनेक वर्षे चालू होतें. आगरकरांनी स्वतःच्या हयातींतच "विविध विषय संग्रह" म्हणून एक निबंधमाला प्रकाशित केली होती. याशिवाय व्याकरणविषयक " वाक्यमीमांसा " "आमचे डोंगरींतील १०१ दिवस" आणि हॅम्लेट नाटकाचें मराठीकरण "विकारविलसित" नाटक इतकें विपुल साहित्य अगदीं अल्पायुष्यांत त्यांनी महाराष्ट्राला दिलें आहे.

'सुधारक' काढण्याचा हेतु

(१) निसर्ग व मानवसंबंध, (२) ग्रीस, इटली, आयर्लंड, अमेरिका यांपैकी एक भारत, (३) चीन व, भारताची प्राचीनता, वैभवसंपन्नता व आर्यकुलोद्भव राष्ट्रें, (४) भारतावर परदेशीयांचे संस्कार व आघात, (५) हिंदुस्थानचा पूर्वेतिहास व सांप्रतची स्थिति, (६) इंग्रजी येईपर्यंत राष्ट्रत्व सांभाळून होते, (७) आपली आर्यभारतीय संस्कृति सांभाळून इंग्रजी शिक्षणाचा व सुधारणांचा स्वीकार करणें, (८) सरकारचें वर्तन व सुधारणाकायदे हे लोकमतास धरून असावे, याकरिता लोकाग्रणींनी पुढाकार घ्यावा. जे हें करणार नाहीत ते राष्ट्र व लोक कधीहि वर डोकें काढणार नाहीत. जेवढीं जुनीं शास्त्रें तेवढी ईश्वरप्रणीत ही कल्पना अप्रगतिपर, (९) जगत्कारणाच्या तोंडांतून, हातांतून, मांडींतून व पायांतून चार वर्ण निपजले ही भ्रामक कल्पना, (१०) स्त्री-पुरुष = स्वामी-दासी भेदाभेद अमान्य. ज्या तत्त्वांनी इतर राष्ट्रें सुधारत आहेत तेंच तत्त्व महाराष्ट्रापुढे "सुधारक" प्रतिपादील. त्यांतच त्याच्या जन्माची सार्थकता आहे. या प्रचार-प्रसारार्थ "सुधारक" पत्र त्यांनी चालू केलें होतें.

आगरकर स्थान

महाराष्ट्रांतील एक अत्यंत थोर पुरुष आणि मराठींतील बुद्धिप्रामाण्यवादी एक उत्कृष्ट ग्रंथकार या दोन्ही नात्यांनी आगरकरांचें स्थान अढळ आहे. कित्येक ग्रंथकारांनी त्यांची तुलना फ्रेंच ग्रंथकार व्हाल्टेअर यांच्याशीं केली आहे, पण व्हाल्टेअर हे आगरकरांपेक्षा दुप्पट जगले असून त्यांना थोरामोठ्यांचा जीवनभर आधार होता. त्यांची ग्रंथसंपदाहि मोठी आहे. मात्र तत्त्वाच्या दृष्टीनें विशेष कांही नाही. तत्त्वें एकच आहेत. आगरकरांची राहणी अगदी साधी, विचार अगदी निकषावर घासूनपुसून पैलू काढलेले चमकदार, आत्यंतिक स्वार्थत्याग, पूर्ण प्रसन्न व निर्मत्सरी वृत्ति, दुःखितांना सहाय्य देणें आणिक उन्मत्तांना तडाखे हाणणें अशी त्यांची जीवनयात्रा राहिली. एम्. ए. झाले, संस्थानच्या न्यायाधीशाचें स्थान चालून आलें पण स्वतंत्र सेवाधारी बाण्यास ती गुलामी मानवली नाही. त्यांच्या मातोश्रीने त्यांना उपदेश केला असतां ते उद्गारले 'या बडया नोकरींत पैसा विपुल लाभेल, तुझें दारिद्र्य दूर पळेल पण जननी आणि माझी जन्मभूमि यांच्या सेवेला मी पारखा होईन. त्याची वाट काय ? माझे दारिद्र्य, माझी सेवा हेच माझे सदाचे सांगाती ! योग्य वाटेल तेंच करेन ! !" असे होते सुधारकाग्रणी आगरकर !

वंदन

ते १७ जून १८९५ रोजीं इहलोक सोडून गेले. त्यांच्या मृत्युनंतर त्यांचीं छोटीमोठीं कांही चरित्रें प्रसिद्ध झालीं. प्रा. मा. दा. अळतेकर, एम्. ए. कृत "संपूर्ण आगरकर" भाग १ ते ३ हेंच अधिकृत आगरकर वाङ्मय समजल्या जातें. त्यांतल्या त्यांत तीन खंडांपैकी पहिला खंडच महत्त्वाचा असून आगरकरांच्या संपूर्ण विचारसरणीचें सार त्यांत साठवलें आहे. इ. स. १९१६ सालीं त्यांचा स्मृतिदिन फार मोठ्या प्रमाणांत मुंबईस रँ. परांजपे यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला. त्यावेळीं मुद्दाम सहभोजनेहि घडवून आणलीं होतीं. या समारंभांत लो. बाळ गंगाधर टिळक आणि रा. ब. महाजनी प्रभृति थोर थोर व्यक्तींनी भाग घेतला होता. हा उत्सव पुढें बरेच दिवस चालूं होता. पुढें बंद झाला. तो आता या जन्मशतव्दीच्या निमित्ताने चालूं होत आहे. तो तसाच चालूं राहो ही इच्छा !! आगरकर बोलत तसें ते चालत. म्हणून त्यांच्या चरणाला हें वंदन आहे आणि त्याबरोबरच राष्ट्रजनक लोकमान्यांनाहि !!

* 'संपूर्ण आगरकर' ग्रंथाधारे.

अभंग


सकळ पृथ्वीचे पाडुनिया खंढ । उभारिलें बंड मानवांनीं ॥ १ ॥
गट स्थापुनिया माजले गाजले । हितास्तव भाजले दुर्बल ते ॥ २ ॥
समुद्र आणि सरिता जाहल्याति थोडया । उभारल्या गुढया सबलतेच्या ॥ ३ ॥
प्रबळ शत्रुरुपें करिती संहार । न ते जाति हार कोणासिही ॥ ४ ॥
"विज्ञान" जाणुनी जगीं वाढविती । अग्न्यस्त्र सोडिती जलीं स्थलीं ॥ ५ ॥
पुंड गुंड ऐसे जमोनिया सारे । समुद्र सोहरे जाहलेचि ॥ ६ ॥
अधर्म हा धर्म एक प्रस्थापिती । देवाचि ही भीति नसे त्यांना ॥ ७ ॥
अन्याय तो न्याय हेंच यांचें शास्त्र । विरुद्ध त्या अस्त्र दाखविती ॥ ८ ॥
पुरुष बली झाले कलिचे संगाती । स्वहीत साधिती भोंदू ऐसे ॥ ९ ॥
विश्वबंधु म्हणती बळेंचि आपणा । आम्हाविण शहाणा कोणि नाही ॥१०॥
अवतार झाला भरत-भूमिवरीं । राम-रावणारि शोभलासे ॥११॥
पद्दा तोचि आला पुनरपि संसारीं । सिद्धसा कंसारि होवुनिया ॥१२॥
वेदपुरुषबाळ गंगाधरसुत । ज्ञान तें विस्तृत सांगतसे ॥१३॥
"गीता" एक ग्रंथ नाम तें "रहस्य" । जनार्दनदास्य साधावया ॥१४॥
"माधव"–तत्–पदीं नित्य राहे उभा । समचरण शोभा पहावया ॥१५॥

नागपूर
ता. १०-७-१९५६


माधव आवाजी पालकर

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ : टिळक आगरकर जन्मशताब्दी उत्सव




प्रि. आगरकरांच्या तैलचित्राच्या अनावरण प्रसंगीं भाषण करीत असतांना रँग्लर परांजपे.



उपाधिधारी शाल वितरण समारंभाच्या वेळचीं दोन दृश्यें.

विदर्भ साहित्य संघ : टिळक-आगरकर जन्मशताब्दी उत्सव



लोकनायक बापूजी अणे लो. टिळकांच्या तैलचित्राच्या अनावरण प्रसंगीं भाषण करीत असतांना

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघानें साजरा केलेला टिळक-आगरकर जन्मशताब्दी उत्सव

उत्सवांत आयोजित करण्यांत आलेलीं व्याख्यानें

डॉ. परांजपे यांचें व्याख्यान

आपले पूज्य वैचारिक गुरु कै. गोपाळ गणेश आगरकर यांना आदरांजलि अर्पण करण्याची संधि विदर्भ साहित्य संघानें दिली, याबद्दल आभार प्रदर्शित करून डॉ. परांजपे आपल्या भाषणांत म्हणाले, " मीं आगरकरांना पाहिलें असलें, तरी त्यांच्याशीं माझा घनिष्ठ संबंध मात्र आला नाही. १८९२ सालीं मीं फर्ग्युसन कॉलिजमध्यें प्रवेश केला तेव्हा कै. वामनराव आपटे हे प्रिन्सिपॉल आणि आगरकर हे प्रोफेसर होते. पण लवकरच वामनरावांचा मृत्यु झाल्याने आगरकर प्रिन्सिपॉल झाले. ज्या दिवशीं ते प्रिन्सिपॉल झाले त्याच दिवशीं कॉलेजांत वामनराव आपटे यांचा निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी सभा भरली होती. या सभेंत आगरकरांचें जें भाषण झालें, त्याची स्मृति माझ्या मनःपटलावर कायमची कोरली गेली आहे. आगरकरांनी सांगितलें की, ' व्यक्ती मर्त्य असते. म्हणून आपटे गेले तरी परिश्रमपूर्वक कार्य करून संस्था पुढे चालवूं या. तिचा उत्कर्ष घडवून आणूं या.' आगरकरांचे हे आशीर्वादाचे शब्द फर्ग्युसन कॉलेजची नंतर जी भरभराट झाली, त्यावरून सत्य झालेले दिसतात.

वैचारिक गुरु मानण्यांत अभिमान वाटतो

आगरकरांवर काळाची झडप फार लवकर पडली. केवळ ३९ व्या वर्षी ते वारले. मी विज्ञान शाखेचा विद्यार्थी असल्यामुळे त्यांच्या हाताखाली प्रत्यक्षतः शिकण्याचें भाग्य मला लाभलें नाही. पण माझे अनेक सहाध्यायी व इतर मंडळी त्यांच्याबद्दल बोलत. आगरकरांचे लेख जसजसे प्रसिद्ध झाले, तसतसे मीं ते वाचले होते. त्यांचे विचार, त्यांचें व्यक्तित्व आणि त्यांची सार्वजनिक कामगिरी यांबद्दल माझ्या मनांत पराकाष्ठेचा आदर निर्माण झाला होता. तेव्हा मनावर झालेला हा परिणाम आजन्म कायम आहे. त्यांना आपले वैचारिक गुरु मानण्यांत थोडी देखील अतिशयोक्ति मी करीत नाही.

अप्रिय पण पथ्यकर बोलणारा नेता

आगरकर हयात असतांना त्यांना टिळकांप्रमाणे लोकप्रियता लाभली नाही. सुधारक म्हणजे आचार-विचारांनीं भ्रष्ट झालेला असेंच तेव्हा समजत. कित्येक धर्ममार्तंड त्यांना ' महार ' म्हणत. आगरकरांचें जीवन फार कष्टांत गेलें. मोठ्या अडचणी सहन करून एम्. ए. पर्यंतचें शिक्षण त्यांनी पूर्ण केलें. पण नंतरहि स्वतःच्या सुखाचा आणि स्वार्थाचा विचार त्यांनी केला नाही. या सुमारास आपल्या आईला

त्यांनी जें पत्र लिहिलें, तें त्यांच्या व्यक्तित्वाचें दर्शन घडविणारें आहे. लोककल्याणाच्या तळमळीनें लोकशिक्षणाचा मार्ग त्यांनी स्वीकारला, शिक्षणसंस्था निर्माण केल्या, 'केसरी' काढला व नंतर 'सुधारक' चालविला. आगरकर जो प्रचार करीत तो लोकांना आवडण्यासारखा नव्हता. त्यांना टाळ्या मिळाल्या नाहीत. शिव्याशाप सहन करावे लागले. विटंबना सोसावी लागली. पण कोणत्याहि आपत्तीला भीक न घालतां, ईर्ष्येनें आणि उत्साहाने लोकांच्या विचाराला चालना देण्याचें काम ते मरेपर्यंत करीत राहिले. त्यांनी पुरस्कारिलेल्या पुष्कळ सुधारणा आता अमलांत आल्या आहेत. मृत्यूनंतर ६० वर्षांनी त्यांची किंमत लोकांना कळूं लागली आहे व सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन सुधारणेसाठी झगडणाऱ्या या धैर्यशाली व्यक्तीविषयी आदराची भावना निर्माण झालेली आहे. देशाला अप्रिय बोलणाराचीहि गरज असते, केवळ लोकांना रुचेल तें बोलणारांची नव्हे, याची साक्ष आगरकरांच्या जीवनावरून पटते. त्या वेळीं जे वाद होते ते आज माजविण्याचें कारण नाही. पण बुद्धिवादाचा आधार घेऊन लोकांत वैचारिक परिवर्तन घडवून आणणाऱ्या आगरकरांनी जो प्रयत्न केला, तो विशेष महत्वाचा आहे. आगरकरांची खरी महत्ता त्यांनी बुद्धिवादाचा पुरस्कार केला, या गोष्टींत आहे. आजहि जर लोक बुद्धिवादी बनतील, तर प्रगति लवकर होऊं शकेल.

टिळक–आगरकर मतभेद

आगरकर आणि टिळक यांच्यांत मतभेद झाले आणि आगरकरांना 'केसरी' सोडावा लागला. पण दोघांतील मतभेद मुख्यत: आधी सामाजिक की आधी राजकीय, या विषयावरच होता. राजकीय स्वातंत्र्यासाठी आधी झगडलें पाहिजे असें टिळकांचें मत होतें. आगरकरांना मात्र प्रामाणिकपणे वाटे की, आपल्या समाजाची दैन्यावस्था आणि त्याच्यावर वारंवार ओढवणारें परचक्र यांचें खरें कारण आपल्या समाजांत विहित असलेले दोष हेंच आहे. हे दोष, वाईट रूढि आणि अंधश्रद्धा नष्ट केल्याखेरीज समाजाचा उत्कर्ष होणार नाही आणि परचक्र जाणार नाही, असें ते प्रतिपादन करीत. म्हणून आधी सामाजिक सुधारणा केली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. परकीय सरकारला समाजाच्या दुरवस्थेसाठी दोष देणारे टिळक आणि त्यांचा केसरी यांना अमाप लोकप्रियता लाभली, तर आपल्याच समाजाला सुधारणेसाठी टोचणी लावणारे व सामाजिक दोषांवर प्रखर हल्ला चढविणारे आगरकर व त्यांचा सुधारक यांच्याविषयी नाराजी लोकांच्या मनांत निर्माण झाली. लोकांनी त्यांचा छळ केला.

आगरकरांचें स्थायी मूल्य

बालविवाह, विधवाविवाह, केशवपन इत्यादि विषयांवरील वाद आता इतिहासजमा झालेले आहेत. त्यांचा काथ्याकूट आज व्यर्थ आहे. पण लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही की, आगरकरांचे समकालीन सुधारक व आगरकर यांच्यांतहि एक फरक होता. इतर सुधारक सुधारणांचा पुरस्कार करीत, अनिष्ट रूढि नष्ट करण्याची भाषा बोलत. पण या सुधारणांसाठी शास्त्रप्रामाण्यहि शोधून पाहात. तो आधार असला म्हणजे त्यांना धीर येई. आगरकरांची गोष्ट तशी नव्हती. बुद्धिवाद आणि तर्कशुद्ध विचार यावर आगरकर अवलंबून असत. बुद्धीला जें पटतें, बरोबर वाटतें त्याप्रमाणे वागणें हा मानवाच्या अप्रतिहत प्रगतीचा मार्ग आहे, अशी आगरकरांची धारणा होती. आगरकरांनी महाराष्ट्राला दिलेली ही बुद्धिवादाची देणगी मोलाची आहे. आपला समाज स्वतंत्र झाला असला, तरी त्यांच्यांतील वैगुण्यें नष्ट करून तो सुधारण्याचा फार मोठा प्रयत्न करण्याची खरोखरी गरज आहे. सुधारणेचें क्षेत्र व्यापक आहे व आगरकरांनी त्याची व्याप्ति कधीच संकुचित मानली नाही. सध्या अनेक मतांचे लोक आहेत. अनेक प्रकारचे राजकीय पक्ष आहेत. पण कोणत्या ना कोणत्या प्रकारचा स्वार्थ लोकांच्य

अनुक्रमणिका

घोरणामागे दिसतो. आगरकरांनी बुद्धिवादाचा जो निकष दिला, त्याचा उपयोग केला जात नाही. म्हणून आगरकरांच्या विचारांचें व शिकवणीचें मूल्य आजहि मुळीच कमी झालेलें नाही,

बुद्धि हें मानवाचें वैशिष्ट्य

वृद्धिवादाचें अनुकरण सोपें आहे, असें मी म्हणत नाही. अंधानुकरण न करतां किंवा इतरांचें मत प्रमाण न मानतां स्वतः विचार करून मत बनवावें आणि तदनुसार वागावें, अशी आगरकरांची अपेक्षा होती. कारण विचार करण्याची शक्ति ही मानवाला लाभलेली एक विशेष देणगी आहे. मानव आणि इतर प्राणी यांतील ठळक फरक म्हणजे मानवाला लाभलेली बुद्धि. ही बुद्धि माणसानें कोणा-जवळ गहाण ठेवूं नये. तिचा सतत उपयोग करीत असावें. जी जागा नित्य साफसूफ केली जात नाही, तिथे जंगल माजतें, याचा अनुभव आपल्याला येतोच. ज्या अवयवाचा उपयोग केला जात नाही, तो अवयवहि निःशस्त्र आणि वेकाम बनून जातो. म्हणून मानवाने आपल्या बुद्धीचा सतत उपयोग केला पाहिजे. त्यानें बुद्धि गंजून जाऊं देतां उपयोगी नाही. बुद्धीचा उपयोग न करतां वागणारा माणूस प्रवाहपतित ठरतो व प्रगतीला मुकतो. आगरकरांनी शिकविलेल्या बुद्धिवादाचा उपयोग आजहि पूर्ण स्वरूपांत करण्याची आवश्यकता आहे. त्रिकालाबाधित मूल्य या बुद्धिवादी तत्त्वज्ञानाला आहे.

ऐहिक जीवनावर भर

आगरकरांच्या प्रतिपादनाचा एक विशेष म्हणजें मानवाचें इहलोकांतील जीवन सुखी करण्याची त्यांत प्रतीत होणारी तळमळ. परलोकावर त्यांची श्रद्धा नव्हती. आपल्या ऐहिक जीवनांत माणसानें सभोवारचा समाज सुखी करण्यासाठी झटावें, उच्च भावनांना वाव द्यावा, समाजाचा एक घटक या नात्यानें प्राप्त होणारी जबाबदारी ओळखून वागावें, केवळ स्वार्थांत व चैनबाजींत मग्न होऊं नयें, सहानुभूतीच्या भावनेला वंचित होऊं नये ही आगरकरांची भूमिका होती. ईश्वरावर नसली तरी मानवावर त्यांची भक्ति होती व मानवी सुखासाठी कष्ट झेलण्याची आणि निःस्वार्थ परिश्रम करण्याची त्यांची तयारी होती. स्वतःच्या जीवनाचा होम करून लोककल्याण साधण्याची ही तळमळ आजहि आपल्याला तितक्याच प्रमाणांत हवी आहे.

अंधश्रद्धेचें पोषण नको

समाजांत अंधश्रद्धेचें पोषण झालें, तर त्याचा अत्यंत हानिकारक परिणाम घडून येतो. आपल्या देशांत आजहि कित्येक सुशिक्षित व मोठेमोठे लोक गुरु करतात. गुरु म्हणेल तें शिरसावंद्य मानतात. बुद्धिवादाला हें मान्य नाही. गूढ विद्या आहे किंवा नाही व गुरूच्या साहाय्यानें ती साध्य करून घेतां येते किंवा नाही हा प्रश्न निराळा आहे. बुद्धीला या गोष्टी पटत मात्र नाहीत. अनेक खोट्या सम-जुतींनी लोक ग्रासलेले आहेत. फलज्योतिषासारख्या गोष्टींच्या मागें ते लागतात. पण ही अशास्त्रीय दृष्टि बुद्धिवादाला रुचत नाही. ज्या कांही समजुती असतील त्या विज्ञानाच्या व बुद्धीच्या कसोटीला लावून पाहावयास पाहिजेत. सुमारें ५० वर्षांपूर्वी मीं म्हणालों होतों की शाळांतून धर्मशिक्षण देऊं नये. त्या-बद्दल माझ्यावर बरीच टीका झाली होती व मला 'प्रासादशिखरावर' देखील चढविण्यांत आलें होतें. पण माझे विचार आजहि कायम आहेत. मुलांना विचार करण्याची सवय लावली पाहिजे. त्यांना अंधश्रद्धा शिकवून उपयोग नाही. भारतावर आक्रमणें झालीं किंवहुना त्याचें विभाजनहि झालें याचें कारण शुद्ध राष्ट्रीय विचारापेक्षा धर्माकडे लोक अधिक झुकले हेंच होय. आगरकरांची शिकविण्याची

अनुक्रमणिका

पद्धति या दृष्टीने लक्षांत घेण्यासारखी आहे. ते विद्यार्थ्यांशीं नाना विषयांवर चर्चा करीत, विवाद करीत. त्यांना विचार करावयाला लावीत. लहान वयांत मुलांना सर्वच खरें वाटतें. त्यांना 'तयार मतें' देणें धोक्याचें ठरतें. कोणताहि प्रचलित धर्म त्यांना शिकवून उपयोगी नाही. बुद्धिवाद एकच धर्म सांगतो व तो म्हणजे मानवताधर्म ! आगरकर या दृष्टीने खरे बुद्धिवादी होते.

ज्योत विझूं देऊं नका

मानवतेसाठी आगरकरांनी आपलें जीवन वेचलें. उदात्त प्रेरणा देणाऱ्या बुद्धिवादाची ज्योत त्यांनी पेटविली. आपण कृतज्ञताबुद्धीने त्यांची जन्मशताब्दी साजरी करीत आहोंत. तेव्हा त्यांनी पेटलेली बुद्धिवादाची ज्योत विझूं न देण्याची जबाबदारी आपणांवर आहे, येवढें सांगून व आगरकरांच्या पावन स्मृतीला वंदन करून मी भाषण समाप्त करतों."

* *

आगरकरांची समाजसुधारणेची अपेक्षा व तिची फलश्रुति

सौ. विमलाबाई देशपांडे यांचें व्याख्यान

आगरकरांनी पुरस्कारिलेल्या सुधारणेच्या प्रकाशांत बाळपण आणि तरुणपण घालविण्याचें भाग्य मला लाभलें. आगरकर हे समाजसुधारक समजले जातात. पण त्यांचे लेख आता पुन्हा वाचले तेव्हा मला आढळून आलें की, आगरकर हे सर्वांगीण सुधारणेचे पुरस्कर्ते होते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, औद्योगिक अशा सर्व क्षेत्रांत सुधारणेची आवश्यकता निस्संदिग्ध शब्दांत त्यांनी प्रतिपादन केली आहे. सुधारणेची ही जी तळमळ त्यांच्या ठायीं निर्माण झाली, तिचें रहस्य त्यांच्या कष्टमय पूर्वायुष्यांत व त्यांनी समाजजीवनाच्या केलेल्या निरीक्षणांत आढळूं शकेल.

रोगनिदान व उपाय

देशाच्या दुरवस्थेसंबंधी आगरकरांचें निदान असें होतें की, आपल्याच समाजांतील दोष हे आपल्या अधःपाताला कारण झाले आहेत. या समाजाला स्वातंत्र्य मिळालें तरी तें टिकविण्याची पात्रता, प्रवृत्ति, रूढीने बद्ध झालेल्या, अंधश्रद्धेने जगणाऱ्या, निःसत्व व निर्बल समाजांत नाही, असें त्यांना वाटे. व म्हणूनच त्यांनी अंधश्रद्धा आणि रूढि या शृंखलांवर कठोर प्रहार केले. प्रगति होण्यासाठी अज्ञान दूर करून शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे, बुद्धिवाद बाणविला पाहिजे आणि समता, स्वतंत्रता व बंधुता या तत्त्वत्रयीचा अंगीकार केला पाहिजे, असा प्रचार त्यांनी केला. आपल्या समाजांतील दैववादावरहि ते तुटून पडले व पुरुषार्थ आणि आशावादित्व जोपासण्याचा प्रयत्न त्यांनी केला. रोग आणि त्यावरील उपाय यांची संगति त्यांनी अशी लावली. सभोवार स्त्रीजीवनाचें जें केविलवाणें दृश्य त्यांना दिसलें, व त्यामुळे समाजाचें आरोग्य आणि त्याचा पराक्रम यांवर जो अनिष्ट परिणाम घडत असलेला त्यांना दिसला, त्याचाच परिणाम म्हणून परंपरागत रूढि, त्यांच्या मागील धर्मकल्पनांचा हिमालय यांवर ते सतत प्रहार करीत राहिले. त्यांच्या लेखणीला विलक्षण धार चढली.

आगरकरांच्या अपेक्षा

आगरकरांनी जी एकेक सुधारणा सुचविली तिचा समाजावर विशिष्ट परिणाम होईल अशी अर्थातच त्यांची अपेक्षा होती. प्रौढ विवाहामुळे विचारी व सुबुद्ध जोडप्यांची निरोगी प्रजा निपजेल,

व्यक्तिस्वातंत्र्यामुळे संपूर्ण उमललेल्या व्यक्तित्वाचे लोक दिसतील, शिक्षणाने अज्ञान नष्ट होऊन जागृत झालेला समाज संपूर्ण रीत्या पुढे जाईल, असें आगरकरांना वाटत होतें. ६०-७० वर्षांपूर्वी आगरकरांनी ज्यांचा आग्रह धरला अशा बहुतेक सुधारणा आता समाजांत रूढ झाल्या आहेत. बाल-विवाह नाहीसा झाला आहे, शिक्षणाचा प्रसार होत आहे, व्यक्तिस्वातंत्र्य लाभलें आहे, समता बरीचशी आली आहे. पण आगरकरांच्या अपेक्षांप्रमाणे समाजांत परिवर्तन झालेलें दिसतें काय ? याचें उत्तर 'नाही' असेंच दुर्दैवाने देणें भाग पडतें.

फलश्रुतीची मीमांसा

सुधारणा झाल्या आहेत आणि देशाला राजकीय स्वातंत्र्यहि लाभलें आहे. पण जोम, स्वातंत्र्य, एकोपा या गोष्टी दिसत नाहीत. राष्ट्राचें उत्थान होत असल्याचा विश्वास वाटत नाही. समाज विस्कळित, व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवावर स्वार्थसाधन करणारा, बेजबाबदार बनत आहे. औषध मिळालें मग गुण कां नाही ? असा प्रश्न या परिस्थितींत पुढे येतो. आगरकरांचा ज्या बुद्धिवादी तत्त्वज्ञानाबद्दल गौरव केला जातो, त्या बुद्धिवादाच्या आधारावर राष्ट्र पुढे जाऊं शकेल काय ? अशीहि शंका मनामध्ये निर्माण होते.

बुद्धिवाद हें दुधारी शस्त्र

बुद्धिवाद हें एक दुधारी शस्त्र आहे. 'मला पटतें किंवा वाटतें' असें म्हणणारा 'मी' किती सुबुद्ध, संस्कारित, जाणता, समंजस समजावयाचा ? सर्वसामान्यांतील 'मी' कितीसा प्रगल्भ असतो ? तेव्हा या तत्त्वाचा आश्रय केल्यास 'मनःपूतं समाचरेत्' असें आचरण होण्याचाहि संभव आहे. हें तत्त्व आत्मघातकी ठरण्याचीहि शक्यता आहे. केवळ स्वतःच्या मतापेक्षाहि अन्य मानदंड लोकांनी एखाद्या गोष्टीची इष्टानिष्टता ठरविण्यासाठी स्वीकारणें पुष्कळदा जरूर असतें. पण बुद्धिवादाच्या अभिनिवेशानें ईश्वर-कल्पना, साऱ्या श्रद्धा, यांवर आघात केला जातो किंवा रूढि नष्ट करण्याचा प्रयत्न करतांना मूळ धर्मकल्पनेवरच प्रहार करण्यांत येतो. परिणामतः साऱ्याच श्रद्धा लोप पावूं लागतात. शाश्वत व सनातन मार्गदर्शनाची समाजास जी गरज असते, ती अपूर्ण राहाते.

बुद्धि व श्रद्धा यांचा मिलाफ हवा

मला असें वाटतें की, जो समाज श्रद्धाहीन बनतो तो विकल आणि उत्थानासहि असमर्थ ठरतो. विशिष्ट मूल्यें व त्यांवरील श्रद्धा समाजाला अवश्यमेव हवीं असतात. डोळस श्रद्धेतून सामर्थ्य निर्माण होतें. केवळ चार गोष्टी बुद्धीला पटल्या म्हणजे आचरण होत नाही. बुद्धि आणि श्रद्धा यांचा मिलाफ असलेली डोळस श्रद्धा राष्ट्रांत असेल तरच कार्य होईल, असा माझा विश्वास आहे. म्हणून शांतपणें, भूत-काळावर आणि भविष्य काळावरहि नजर ठेवून आपण विचार करावयास पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या मर्यादा किंवा हक्क आणि कर्तव्य यांचा संबंध आपण लक्षांत घ्यावयास पाहिजे. हा सर्व विचार करण्याची वेळ आता निश्चित आलेली आहे.

संस्कारांचें महत्त्व

शिवाय, आगरकरांच्या नंतर मानसशास्त्रांत पुष्कळच प्रगति झाली आहे, हेंहि विचारांत घ्यावयास पाहिजे. अलिकडे असें सिद्ध झालें आहे की, माणसाचें जसें जागृत मन असतें, तसें अबोध मनहि असतें. अबोध मनाचे जे व्यापार असतात त्या मानाने जागृत मनाचे व्यापार फारच अल्प

अनुक्रमणिका

असतात. या अबोध मनाच्या व्यापारांमुळे, त्यावरील संस्कारांमुळें माणूस पुष्कळसें कार्य करीत असतो. तेव्हा या अबोध मनावरील संस्कारांकडे लक्ष देणें आवश्यक आहे. आणि दुसरी गोष्ट ही की विशिष्ट संस्कारांनी मानवी मनाची इच्छित तयारी करतां येते, हेंहि सिद्ध झालेलें आहे. हें ओळखून जर राष्ट्रांतील लोकांच्या मनावर संस्कार करण्याचा प्रयत्न केला, तरच इच्छित गुण समाजांत येतील व स्वातंत्र्य टिकवून धरण्यास व राष्ट्राचा प्रभाव वाढविण्यास तो समर्थ होईल.

* *

आगरकरांचा बुद्धिवाद

प्रो. सौ. मनुताई नातू यांचें व्याख्यान

व्यक्तिस्वातंत्र्य आणि बुद्धिवाद या दोन भक्कम आधारांवर मानवी जीवनाची उभारणी करण्याचा आगरकरांचा प्रयत्न होता. अंधश्रद्धा व घातुक अमानुष रूढि यांच्या क्षेत्रांत जेव्हा बुद्धिवादाचा प्रवेश होतो, तेव्हा पहिलें कार्य विध्वंसनाचें, मूर्तिभंजनाचें होतें. मोडतोड अपरिहार्य होते. आगरकरांना संस्कृतीचे उच्छेदक म्हणून अनेकांनी दूषण दिलें. त्यांचा छळ केला. पण आगरकरांनी अथांग सहानुभूतीनें दु:खितांचे अश्रु पुसले. अनाथ अबला रूढीच्या दाहक ज्वालांत होरपळून त्यांच्या डोळ्यांत पुन्हा अश्रु येऊं नयेत म्हणून कंबर कसली. त्यांच्या पाठीशीं द्रव्यबळ किंवा मनुष्यबळ कांहीच नव्हतें. टिळकांचा रोष पत्करण्याचें कठीण दिव्यहि त्यांना करावें लागलें; पण केवळ खंबीर मनाच्या जोरावरच ते अडिग उभे राहिले. अनेक पिढ्या पुरेल येवढा विचारधनाचा साठा त्यांनी आपल्यासाठी मागे ठेवला आहे. पण त्या विचारधनाचें सार्थक करंट्या महाराष्ट्रानें केलें नाही. त्यांची उपेक्षाच झाली. आगरकरांना मरून ६० वर्षें झालीं असलीं, तरी अद्याप आपण त्यांच्या ५० वर्षें मागेंच आहोंत !

आगरकरांचे विचार जुने झाले काय ?

आगरकरांसंबंधी असें मत व्यक्त केलें जातें की, त्यांनी पुरस्कारिलेल्या सुधारणाच केवळ जुन्या झाल्या आहेत असें नव्हे, तर त्यांनी पुढे मांडलेल्या बुद्धिवादी आणि व्यक्तिस्वातंत्र्यवादी तत्त्वज्ञानाचाहि आता बोजवारा उडालेला आहे. मला स्वत:ला तसें वाटत नाही. या तत्त्वांचीच कास वर्तमानकालीन स्वातंत्र्याचें संरक्षण आणि समाजाची प्रगति यासाठी धरावी लागेल, अशी माझी धारणा आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार आज करावयाचा नाही. पण बुद्धिवादाचा विचार केला तरी दिसेल की, तो एक स्थायी निकष आहे. माणसाला बुद्धि असते म्हणजे विवेक करून निर्णय करण्याची शक्ति त्याच्या ठायीं असते. निर्णय सत्यासत्याचा करावयाचा असतो. विवेक इष्टानिष्टतेचा करावयाचा असतो.

सत्य व इष्ट यांचें स्वरूप

एखादें विशिष्ट विधान कोणी केल्यास बुद्धि स्वाभाविकच 'कां ?' हा प्रश्न उभा करते. कर्तव्य कां करावें हें विचारण्याचा बुद्धीचा स्वभाव आहे. हा प्रश्न निष्प्रयोजन होईपर्यंत तो विचारीत जाणें आणि समाधान झाल्यावर नंतर विधानाचा स्वीकार करणें हें बुद्धिप्रामाण्याचें गमक होय. सत्य म्हणजे काय व इष्ट म्हणजे काय, असा प्रश्न यावर उपस्थित होतो. बुद्धिवादानुसार सत्य हें इंद्रियानुभवावर किंवा त्यावर आधारलेल्या तर्कावर प्रतिष्ठित असतें. तसेंच इष्टानिष्टतेचा विचार मानवाच्या ऐहिक सुखाच्या दृष्टीने केला जातो. कर्माची हितकारकता किंवा सत्याचें स्वरूप अतींद्रिय ज्ञानाच्या अथवा

पारलौकिकाच्या अपेक्षेने ठरविणें बुद्धिवादाला मान्य नाही. सुख आणि हित यांत बुद्धिवादी माणूस अविरोध मानतो. कारण सुखाची उच्चनीच पातळी त्याला कळते आणि कोणत्याहि इच्छांची पूर्ति करतांना समग्र जीवनाचा विचार करूनच तो निवड करतो. बुद्धिवादानें माणूस स्वार्थी बनेल, ही भीति व्यर्थ आहे. व्यक्तिहित व सार्वजनिक हित यांतील संघर्ष बऱ्याच अंशीं काल्पनिक आहे. केवळ स्वतःच्या सुखानें माणूस सुखी होत नाही. भूयिष्ठांचें भूयिष्ठ सुख (greatest happiness of the greatest number) हा निकष तो मानतो. अनावश्यक दुःखाला कारण होणारें कर्म हें तो दुराचाराप्रमाणे मानतो. आगरकरांनी क्रूर रूढींवर जे बेमुर्वतपणे कठोरतम प्रहार केले, याचें कारण म्हणजे या रूढींमुळे उध्वस्त होणारें मानवी ऐहिक जीवन त्यांना दिसत होतें.

बुद्धिवादावरील आक्षेप

बुद्धिवादावर अनेक आक्षेप पूर्वी घेतले गेले व आजहि घेतले जातात. आपल्या आचारविचारांची घडण बुद्धिवादानुसार झाली आहे असें आपण म्हणूं शकत नाही. आक्षेप घेणारा मुख्य वर्ग परंपराभिमानी लोकांचा. 'केवळ बौद्धिक दृष्टया किंवा तर्कदृष्टया सुधारणा करावयाला केसरीची तयारी नाही' असें टिळकांनी म्हटलें आहे. बुद्धिवादाबरोबर संस्कृति व परंपरा टिळक लक्षांत घेत. पण सर्वच परंपरा योग्य नसतात. त्यांची ग्राह्याग्राह्यता बुद्धीनेच ठरवावी लागते. शिवाय, परंपराभिमानी बुद्धि ही एक प्रकारें बद्ध असते. परंपराविमुक्त बुद्धि खरोखर वस्तुनिष्ठ निर्णय करूं शकते. बुद्धि तटस्थ असेल तरच तिला आचारविचारांचें यथोचित मूल्यमापन करतां येईल. आगरकरांच्या ठिकाणीं बुद्धीची ही विमुक्तता आणि निर्मलता प्रत्ययाला आली, ही त्यांची थोरवी होय. बुद्धिवादी माणूस श्रद्धा किंवा भावना यांना वंचित होतो, असाहि एक आक्षेप घेतला जातो. पण आगरकरांच्याच जीवनांत या आक्षेपाचें उत्तर सापडेल. त्यांचें जीवन भावनापूर्ण होतें. भावनांची इष्टानिष्टता ठरविण्याचें किंवा त्यांचें सुनियंत्रण करण्याचें काम मात्र शेवटीं बुद्धीलाच करावें लागतें. अलिकडे मानसशास्त्रांत झालेल्या प्रगतीच्या आधारावर देखील बुद्धिवाद व्यर्थ ठरविण्याचा प्रयत्न केला जातो. मानवी जीवनांत अबौद्धिक प्रेरणांचें (Irrational instincts) स्थान फार मोठें आहे. त्यामुळेच जीवनाला खरोखरी रंग चढतो व बुद्धिवाद हें १९ व्या शतकांतील इतिहासजमा तत्त्वज्ञान आहे, असे हे आक्षेपक म्हणतात. पण या अबौद्धिक प्रेरणांचा विवेक करूं नये, किंवा त्यांचें तारतम्य ठरवूं नये, असें मानसशास्त्र सांगत नाही. उलट, आता विवेकाची, बुद्धिवादाची जास्तच निकड निर्माण झालेली आहे, असें म्हटलें पाहिजे.

आगरकरांना आश्वासन

बुद्धिवादावरील निष्क्रियतेचा, स्वैराचाराचा किंवा अन्य कोणताहि आक्षेप टिकण्यासारखा वाटत नाही. आणि जे कोणी आक्षेप घेत असतील त्यांना आगरकरांचें भव्य दिव्य जीवन हेंच एकमात्र उत्तर आहे. बुद्धिवादाचें तत्त्वज्ञान महाराष्ट्राला देणाऱ्या आगरकरांचें हें जीवन पाहिल्यानंतर आक्षेपकांना खरोखर कांही भूमिकाच उरूं शकत नाही. महाराष्ट्राच्या बुद्धिविमोचनाची तळमळ आगरकरांना लागलेली होती. माणसानें आपल्या बुद्धीचा उपयोग न केल्यास ती गंजते व माणूस पशूच्याहि पातळीला जातो, हें आगरकरांनी पाहिलें होतें. विचारकलहांत प्रगतीचीं बीजें आहेत असें ते म्हणत. आगरकरांनी महाराष्ट्राला संपत्तीची अथवा कीर्तीची भीक मागितली नाही. आपल्या उत्तरक्रियेसाठी २० रु. ची पुरचुंडी त्यांनी बांधून ठेवली होती ! त्यांचें मागणें एकच होतें की, विचार करा आणि आपल्या बुद्धीचें विमोचन घडवून आणा. आज आगरकरांच्या जन्मशताब्दीच्या निमित्तानें आमचें त्यांना आश्वासन आहे की, त्यांचा हा संदेश आचरणांत आणण्याचा आम्ही अवश्य प्रयत्न करूं.

* *

अनुक्रमणिका

लोकनायकांनी केलेला लोकमान्य टिळकांचा गुणगौरव

लोकनायक डॉ. मा. श्री. उर्फ बापूजी अणे यांचें व्याख्यान

बाळगोपाळ ही अजरामर जोडी

लोकमान्यांचा तैलचित्राचें अनावरण करण्यासाठी आपण मला बोलावून माझा गौरव केला, याबद्दल मी विदर्भ साहित्य संघाचे मनःपूर्वक आभार मानतों. विदर्भ साहित्य संघाच्या या उत्सवानें मनाला विशेष आनंद या कारणास्तव होतो की, टिळक–आगरकरांच्या जन्मशताब्दीचा संयुक्त महोत्सव करण्याचा उपक्रम जो त्याने केला, तो सर्वस्वी औचित्यपूर्ण, समयज्ञतेची साक्ष पटविणारा व म्हणून अभिनंदनीय आहे. संपूर्ण भारतांत अशा प्रकारचा उपक्रम हाच एकमेव म्हणावा लागेल. बाळ–गोपाळ ही अजरामर जोडी होती; व पुढे त्यांच्या उद्योगाच्या दिशा भिन्न झाल्या, तरी त्यांचें उद्दिष्ट एकच होतें, याबद्दल शंका नाही.

ध्येय ठरवून जीवनाची आखणी

असंख्य नररत्नांना भारतमातेने जन्म दिला. पण देशाच्या सेवेंत संपूर्ण आयुष्य खर्च करणाऱ्या पहिल्या कांही नररत्नांत लोकमान्यांचा समावेश करावा लागेल. त्यांच्यासंबंधी बोलावयाचें ठरविलें तर मी महिनाभर सहज बोलूं शकेन; पण माझ्यांत तेवढी शक्ति नाही आणि तशी गरजहि नाही. टिळकांच्या जीवनांतील चार दोन वैशिष्टयांचा फक्त मी उल्लेख करतों. त्यांचा पहिला विशेष हा की, विद्यार्थिदशा संपवितांनाच त्यांनी जीवनाचें ध्येय निश्चित केलें. संपादन केलेल्या ज्ञानाचा उपयोग देशाच्या सेवेसाठीच करावयाचा असें त्यांनी ठरविलें. या गोष्टीचें महत्त्व कदाचित् आज नीटसें ध्यानांत येणार नाही. पण तो काळ आणि ती परिस्थिति यांचा विचार केल्यास, या निश्चयाचें व त्यांनी घालून दिलेल्या उदात्त उदाहरणाचें अलौकिकत्व मनाला जाणवतें. त्या काळीं शिक्षणाची किंमत मोठी होती. सुशिक्षितांसमोर अनेक प्रलोभनें असत. पण मन स्थिर ठेवून देशसेवेचाच मार्ग त्यांनी पक्का केला. एलएल. बी. झाल्यावर वकिली चालत नव्हती म्हणून कांही ते देशसेवेच्या मागे लागले नाहीत ! टिळक व आगरकर या उभयतांनी हा निश्चय केला; व पुढे मतभेद झाले तरी त्यांच्या या निश्चयांत अंतर म्हणून पडलें नाही.

सर्वस्वार्पण बुद्धीचा देशसेवक

टिळकांच्या स्वभावांत गुणग्राहकता होती. भारतांत कष्ट करणारे जेसुइट मिशनरी ज्या पद्धतीने सेवेचें कार्य करीत, त्याचा त्यांच्या मनावर परिणाम झाला; व निरलस सेवेचा आदर्श म्हणून या कार्याकडे त्यांनी बोट दाखविलें. टिळकांनी स्वतःदेखील सेवा हाच आपला धर्म मानला, आणि कोणत्याहि प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा न ठेवतां आत्मार्पण बुद्धीने कार्याला वाहून घेतलें. म्हणूनच त्यांच्या हातून महत्कार्य घडूं शकलें; आदर्शभूत शैक्षणिक संस्था उभारल्या जाऊं शकल्या; स्वतंत्र शैक्षणिक कार्याला फुलोरा आला. पण नंतर चार भिंतींच्या आंत द्यावयाच्या शिक्षणाचें काम सोडून देश हेंच त्यांनी शालागृह बनविलें. 'केसरी–मराठा' पत्रांच्या रूपाने संपूर्ण देशाच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांनी अंगावर घेतली. कॉलेजचें क्षेत्र सोडून ते व्यापक क्षेत्रांत आले, ही गोष्ट भारताच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाची, शुभ आणि प्रगतीला पोषक ठरली, असें मी मानतों.

अनुक्रमणिका

एकमुखानें बोलण्यास शिकविलें

लोकमान्य राजकारणांत पडण्यापूर्वी राजकारण चालू नव्हतें असें नाही, पण तें राजकारण चार शहाण्या माणसांच्या विचारविनिमयापुरतें व त्यांच्या लहानमोठ्या संस्थांपुरतेंच मर्यादित होतें. भारतांतील लोकांच्या तक्रारी व त्यांच्या मागण्या एकमुखानें पुढे मांडण्याचा प्रयत्न करण्यासाठी, राष्ट्रीय सभेची १८८५ सालीं निर्मिति झाली. १८८९ सालीं टिळक शिक्षणक्षेत्रांतून बाहेर पडले व कांग्रेसमध्ये शिरले. भारतीय जनता एकमुखानें बोलूं लागेल तरच तिचा उद्धार लवकर होईल, अशी त्यांची श्रद्धा होती. प्रांतिक संस्था व त्यांतील एकदेशीय प्रवृत्ति नष्ट करून अखिल भारतीय दृष्टि निर्माण करावयास पाहिजे आणि त्यासाठी राष्ट्रीय सभेचा उपयोग करून घेणें उपयुक्त ठरेल, असें धोरण त्यांनी आखलें.

जनजागृतीचा खटाटोप

१८८९ मध्ये टिळक कांग्रेसमध्ये आले, त्या वेळीं राष्ट्रसभा लोकांच्या इच्छा सरकारला कळविण्याची खटपट करीत असे. पण लोकांत जागृति झालेली नव्हती, त्यांच्या इच्छाआकांक्षांना उत्कट व मूर्त स्वरूप आलेलें नव्हतें. म्हणून लोकजागृतीचा प्रचंड खटाटोप टिळकांनी केला. १८९६ च्या दुष्काळाच्या वेळीं माणसें पाठवून त्यांनी लोकांना त्यांचे कायदेशीर हक्क व सरकारचीं कर्तव्यें समजावून सांगितलीं, ही गोष्ट त्यांच्या कार्यपद्धतीची ओळख पटविते. टिळक व इतर पुढारी यांत हा फार महत्त्वाचा फरक होय. ज्यांच्या हितासाठी प्रयत्न करावयाचा त्यांच्याशीं पूर्वीच्या राजकारणाचा प्रत्यक्ष संपर्क नव्हता, तो टिळकांनी प्रस्थापित केला. कांग्रेसच्या माणसांच्या मागें जागृत लोकांचें सामर्थ्य उभें करण्यासाठी ते आयुष्यभर झटले. कांग्रेसच्या ठरावांना त्यांनी सरकारांत महत्त्व प्राप्त करून दिलें. शिक्षणामुळे लोकांत जागृति होऊन त्याचे परिणाम काय निघतील, याचें भाकित मेकॉले प्रभृतींनी वर्तवून ठेवलें होतें. पण हीं पुराणांतील वांगीं टिळकांच्या वेळेपर्यंत तरी पुराणांतच राहिलीं होतीं, तीं आचरणांत आणण्याचें श्रेय टिळकांना आहे.

एकराष्ट्रीयत्वाची जाणीव जागविली

टिळकांच्या कार्याचें आणखी एक वैशिष्ट्य हें की, संपूर्ण देश हा एक आहे, अशी भावना निर्माण करण्याचा त्यांनी प्रत्यक्ष कार्याद्वारें प्रयत्न केला. हिन्दुस्थान हें एक राष्ट्र असल्याची भाषा बोलली जाई. पण देशाच्या एका भागाला झालेल्या पीडेविषयी फक्त सहानुभूति व्यक्त करूनच पुढारी स्वस्थ राहात. एकराष्ट्रीयत्व सिद्ध करण्यासाठी बंगालवरील संकट हें आपल्यावरीलहि संकट आहे, या भावनेने टिळक धावून गेले. त्या चळवळीचा प्रसार देशव्यापी स्वरूपांत केला. याच चळवळींतून भारतीय राजकारणांतील जहाल पक्षाचा उद्भव झाला व या पक्षाचें नेतृत्व लोकमान्यांनी स्वीकारलें. कांग्रेसमध्ये लोकमान्य हे एकप्रकारें विरोधी पक्षाचे नेते बनले.

प्रतिकाराचा कार्यक्रम दिला

लोकमान्यांचा हा नवा पक्ष केवळ वावदूक नव्हता. आपल्या संघटित सामर्थ्याच्या बळावर परकीय सरकारचा प्रतिकार करण्याचा कार्यक्रम या पक्षाने आखला व १९०६ सालीं आपल्या राष्ट्राचे 'प्रपितामह' दादाभाई नौरोजी—लोकमान्य पितामह व गांधीजी हे पिता असें मी मानतों—यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्ता येथे झालेल्या अधिवेशनांत तो मंजूर करवून घेतला. स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार या चतु:सूत्रीबाबत कोणतीहि तडजोड करावयास लोकमान्य तयार नव्हते; व म्हणून

नंतर १९०७ सालीं सुरतेचा प्रसंग घडून आला. १९०८ सालीं त्यांना शिक्षा झाली पण तीहि त्यांनी या भावनेनें स्वीकारली की, आपल्या व्यक्तिगत हालअपेष्टांनी जर राष्ट्राचें कल्याण होत असेल, तर त्या हालअपेष्टाहि स्वागतार्हच होत. देशाची प्रगति होईल ती स्थिति ते इष्ट मानीत. मुंबईच्या हायकोर्टानें शिक्षा ठोठावल्यावर जी अमरवाणी त्यांच्या मुखांतून बाहेर पडली, तींत हीच श्रद्धा व्यक्त झाली आहे. त्यांच्या मनाची ठेवण आध्यात्मिक स्वरूपाची होती. त्यांची बुद्धि साम्यस्थितीला पोचली होती. म्हणूनच जीव आणि शिव यांच्यासंबंधीच्या गहन प्रश्नाचें चिंतन करून गीतेवर अपूर्व भाष्य ते तुरुंगांतहि लिहूं शकले. क्षुद्र वैयक्तिक अथवा पार्थिव विचारांनी त्यांच्या मनाची चलबिचल कधीहि झाली नाही.

मंडालेनंतर

लोकमान्य म्हणजे राजकारणांतील चैतन्यशक्ति होती. १९०८ सालीं ते तुरुंगांत गेले व १९१४ सालीं सुटून परत आले. या काळांत देश थंड होता. पण परत आल्यावर टिळकांनी परिस्थितीचें निरीक्षण केलें व मानापमानाच्या कल्पनांना वळी न पडतां आपल्या अनुयायांसह त्यांनी कांग्रेसमध्ये पाऊल टाकलें. मवाळ–जहाल वाद नष्ट होऊन राजकीय पक्षांत व हिंदुमुसलमानांतहि ऐक्य घडून आलें. गांधीजींनी नान परींनी प्रयत्न करूनहि हिंदुमुस्लिम ऐक्य सिद्ध होऊं शकलें नाही. पण एका बैठकींत व तीन तासांत टिळकांनी ही गोष्ट घडवून आणली. यामुळेच सरकारवर वजन पडून मॉंटेग्यु–चेम्सफोर्ड सुधारणेच्या रिपोर्टांत कॉंग्रेसच्या मागण्यांची दखल घेणें भाग पडलें. १९१९ च्या अमृतसर कांग्रेसमध्ये एकमुखी निर्णय निष्पन्न करण्यांतील किंवा प्रतियोगी सहकारितेच्या पुरस्कारांतील टिळकांचें धोरणहि त्यांच्या योग्यतेचें निदर्शक आहे.

गांधींनी संग्रामाची सांगता केली

असें म्हणतां येईल की, १८९७ मधील पहिल्या बंदिवासानें टिळकांनी स्वातंत्र्यासाठी जो संग्राम सुरू केला, तो अर्ध–शतकानंतर १९४७ सालीं संपला. शेवटच्या यशाचे मानकरी गांधीजी आहेत. पण टिळकांच्या नेतृत्वाखाली प्रारंभीं स्वातंत्र्यसैनिक रणांगणावर उभे राहिले व लढचाला तोंड लागलें. टिळक ज्या वेळीं या रणांगणावरून अस्तंगत झाले, त्यावेळीं स्वराज्याचा हक्क ब्रिटिश पार्लमेंटनें मान्य केला होता व पहिला हप्ताहि जाहीर झाला होता. डिक्री झाली होती व तिची वसुली मात्र बाकी होती ! वसुली करण्याची चिकाटी गांधीजींच्या ठायीं होती व म्हणून १५ ऑगस्ट १९४७ चा विजय-दिन दिसूं शकला. ज्यांनी ज्यांनी देशासाठी त्याग केला व झीज सोसली त्या सान्यांचाच वाटा या विजयांत आहे. त्यांच्या त्यागाचीं टिळक व गांधी हीं प्रतीकें होत.

भारत श्रेष्ठ बनवूं या

ज्यांनी ज्यांनी हें महत्कार्य घडवून आणलें त्यांनी भारताचा उद्धार केला आहे. स्वातंत्र्य राखणें हें आपलें काम आहे. देशापुढील अनेकविध समस्या सुटल्या तर लोकांना या स्वातंत्र्यांत गोडी वाटेल, त्याची सार्थकता होईल. टिळकांचें मार्गदर्शन आपल्याला उपयोगी पडेल. माघार केव्हा घ्यावी, ताणावें केव्हा व तुटेपर्यंत न ताणतां सोडावें केव्हा, हें सारें त्यांच्या चरित्राच्या अभ्यासावरून कळून येईल. टिळकांच्या आदर्शानुरूप आचरण करून हा आपला देश जगांत श्रेष्ठ बनविण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी मला आशा आहे. ध्येयवाद आणि वास्तववाद यांचा, 'पक्षी उडे आकाशीं–परी लक्ष पिलापाशीं' या तुकोबांच्या उक्तीप्रमाणें समन्वय हेंच टिळकांच्या यशाचें रहस्य आहे. व तो आपण ध्यानांत बाळगूं तर जगांत भारताला पूर्ववत् गुरुपद अवश्य प्राप्त होईल.

अनुक्रमणिका

शेवटीं विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी आभार मानले व राष्ट्रगीत होऊन कार्यक्रम संपला.

* *

लोकमान्य टिळकांचें संशोधनकार्य

श्री. दाजी नागेश आपटे यांचीं व्याख्यानें

संशोधनकार्य हा लोकमान्यांच्या कर्तृत्वाचा सर्वश्रेष्ठ भाग होय, असें माझें मत आहे. लोकमान्यांच्या प्रतिभेचें पार्थिव आणि अंतरिक्ष अशीं दोन अंगें आहेत. पार्थिव प्रतिभेच्या जोरावर त्यांनी जें राजकारण लढविलें तें महत्त्वाचें असलें तरी त्यांनी जें संशोधनकार्य केलें तें जास्त महत्त्वाचें आहे. त्यांतहि विशेष हा की टिळकांनी हें संशोधन निरालंब स्थितींत केलें आहे. वैदिक संशोधनाला लोकमान्यांनी ज्या पद्धतीने हात घातला त्या पद्धतीने त्यांच्यापूर्वी कोणीच हात घातला नव्हता. लो. टिळकांनी नवीन मार्ग शोधून काढला. एकाकी नवीन मूळ कल्पना डोक्यांत येणें ही प्रतिभा होय. नंतरचें काम सुलभ असतें. वेदांचें मूळ स्थान उत्तर ध्रुवप्रदेश व त्या भोवतालचा परिमंडल प्रदेश या विभागांत आहे अशी उपपत्ति त्यांनी, भूगर्भशास्त्रासारख्या शास्त्राचा अभ्यास करून, निर्विवाद रीतीने सिद्ध केली. त्यासाठी त्यांनी भूगर्भीय, खगोलीय आणि आख्यायिकात्मक असे तीन प्रकारचे साधार पुरावे देऊन आपल्या उपपत्तीची युक्तता पटवून दिली आहे.

हा अनुल्लेख निंद्य नाही काय ?

पण असें असलें तरी शरमेची गोष्ट अशी की, श्री. कन्हैयालाल माधवलाल मुनशी यांच्या भारतीय विद्याभवनातर्फे भारताचा जो दहा खंडात्मक इतिहास लिहिला जाणार आहे त्याच्या ' वैदिक एज ' या पहिल्या खंडांत दक्षिण रशिया हें वेदांचें मूलस्थान हो।, असें मत प्रतिपादन केलेलें आहे. हें मत त्यांना प्रतिपादन करावयाचें असेल तर खुशाल करावें. परंतु या खंडांत लोकमान्य टिळकांच्या नांवाचा ज्यांनी वेदांच्या मूलस्थानावर ५०० पानी ग्रंथ लिहिला त्यांच्या नांवाचा उल्लेख देखील नाही. ही धाष्टर्याची आणि शरमेची गोष्ट नाही काय ?

संशोधनाचे तीन भाग

वैदिक संशोधनाविषयींचीं व्याख्यानें मी तीन विभागांत विभागलीं आहेत. पहिलें स्थानविषयक, दुसरें कालविषयक आणि टिळकांनी केलेल्या संशोधनाचा धागा धरून सुमेरियन संस्कृतीवर काय नवीन प्रकाश पडतो, हें पाहणें, हें तिसरें अशीं व्याख्यानें मी देणार आहें.

पाश्चात्यांत वेदांचा काळ ठरविण्याचा पहिला प्रयत्न मॅक्समुल्लर याने १८५९ सालीं केला व व भाषेंतील फरक लक्षांत घेऊन अंदाजाने त्याने इ. पूर्वी १००० ते १२०० वर्षें हा वेदकाल असल्याचें सांगून टाकलें. आपलें हें मत नंतर त्यांनी बदलविलें तरी पाश्चात्यांनी त्याकडे कानाडोळा केला. पुढें व्हिन्सेंट स्मिथ, विंटरनिट्झ, पार्लिटर आणि हरमन याकोबी या गृहस्थांनी अनुक्रमें इ. स. पूर्व २०००, ३००० आणि ४००० असे काल ठरविले. पार्लिटर याने पुराणांतील वंशावळीवरून कालनिर्णय केला, तर याकोबी याने ध्रुवाच्या स्थित्यंतरावरून काळ ठरवून पाहिला.

टिळकांचें अपूर्व संशोधन

लो. टिळकांनी मात्र ज्योतिषशास्त्राचा आधार घेऊन भक्कम आधारावर कालनिर्णय करण्याची पद्धति स्वीकारली. अयनगति त्यांनी निश्चित केली आणि वसंत संपात कोणकोणत्या नक्षत्रांत येत

गेला, याचा मागे मागे जाऊन वेदांतील उल्लेखानुसार हिशेब केला. एका नक्षत्राला एक हजार वर्षे हें गणित त्यांनी लावलें. हल्लीं वसंत संपात रेवती नक्षत्रांत आहे. कृत्तिका, रोहिणी, मृग या क्रमाने ते पुनर्वसूपर्यंत मागे जाऊं शकले. तें ८ वें नक्षत्र होय. म्हणून निदान खि पू. ६००० वर्षे वेद झाले असा निर्णय त्यांनी दिला.

उपलब्ध झालेले कांही पुरावे

सीरियांत इ. स. पूर्व १४०० चा अस्सल तह ज्यावर लिहिलेला आहे असा एक शिलालेख मिळाला असून त्यांत इंद्र, मित्र, वरुण, वासत्य या वैदिक देवतांच्या नांवाने शपथ आहे. कॅसाइट्स् व हिटाइटस् यांतील जो करार सापडला तो. इ. स. पूर्व १७६० चा आहे व त्यांत सूर्य मरुत् हीं देवतांचीं नांवें आहेत. इजिप्तमध्ये अस् अलामा येथे १९०० इ. स. पूर्वमध्ये विटांवर लिहिलेल्या शिलालेखांत ४ आर्य नांवें आहेत. ही माहिती देऊन ते म्हणाले, हा निर्विवाद पुरावा पाहिल्यास इ. स. पूर्व २००० च्या अलिकडे वेदकाल आणतांच, येत नाही. पार्लिटर यांची वंशावळी हाहि आधार भक्कम आहे व सूर्यवंशापूर्वीचे २५ राजे ध्यानांत घेतल्यास ४००० पर्यंत तोहि काल जाऊं शकतो. पाश्चात्यांना या साऱ्या गोष्टी नाकारणें अशक्य झालें आहे. 'पटत नाही' एवढेंच म्हणून ओल्डनबर्गासारखे लोक मोकळे होतात !

सुमेरी दंतकथा


या संशोधनांत कांही शहरें व विशेष म्हणजे 'कीललिपीं'त भिंतीवर कोरलेले, अनेक लेख आढळून आले. ते वाचतां येण्यास संशोधकांना ५० वर्षे प्रयत्न करावा लागला. आधी एक कोश प्रसिद्ध झाला, तेवढाच टिळकांनी पाहिला होता व त्यांतील आणि अथर्ववेदांतील संस्कृतोत्पन्न नसलेल्या कांही शब्दांच्या परस्परांतील सादृश्यावर टिळकांनी आपलीं अनुमानें बसविलीं. या सापडलेल्या वाङ्मयांत गिर्शमिश् नांवाचें काव्य, जलप्रलयाची कथा व वृत्रवधाच्या प्रसिद्ध कथेचें शब्दशः समानार्थक रूपांतर यांचा आढळ होतो. त्यावरून सुमेरियन लोक आर्यवंशाचेच होते याबद्दल संशय राहात नाही. गिर्शमिश् राजाच्या कथेचा मेळ टिळकांनी वेदकालाचा जो निर्णय केला, त्याच्याशीं बसतो व या कथेंतील रूपकात्मक वर्णनाने टिळकांच्या गणिताची पुष्टि होते. जलप्रलय व त्यांतील मनूचें संरक्षण याची कथा सुमेरी वाङ्मयांत सापडते ही आश्चर्याची गोष्ट आहे. आर्य मूलस्थानीं असतांना जलप्रलय झाला असावा आणि त्या गोष्टीला ८००० वर्षे झालीं असावीं हें टिळकांचें अनुमान प्रायः निश्चित समजावयास पाहिजे.

हरप्पा व मोहेंजोदारो येथील उत्खनन

हें उत्खनन व तेथे आढळलेले पुरावे म्हणजे एक महान् चमत्कार आहे. येथील लेखांची कीललिपीच आहे, पण अद्याप ती वाचली जाऊं शकली नाही. शंकराचे येथील चौथा पांचवा थर सध्या खणण्यांत आला आहे आणि त्याखाली आणखी चार पांच थर असावे असा अंदाज आहे. येथील अवशेषांवरून दिसतें की सुमेरियन संस्कृतीशीं समकालीन काळ या संस्कृतीचा असावा आणि तो इ. स. पू. ३००० वर्षे तरी असला पाहिजे. आजच्या सारखाच गहू व कापूस तेथे सापडला व पूर्णप्रज्ञ संस्कृति तेथे असावी यांत शंका उरूं नये असे अनेक अवशेष तेथें आढळले आहेत. मानवी कवटचा लंबशीर्ष म्हणजेच आर्यवंशीय असल्याचेंहि आढळून येतें. तेव्हा सुमेरियन राजे आर्यवंशीय असल्याचें प्रायः सिद्ध झालें आहे आणि टिळकांचा धागा पुढ चालवून मी केलेलें संशोधन अचूक होतें असें मानण्यास प्रत्यवाय नाही. पंचांग संशोघन समितीने या मतावर शिक्कामोर्तब केलें आहे, ही गोष्ट उल्लेखनीय आहे.

* *

विदर्भ साहित्य संघ : टिळक आगरकर जन्मशताब्दी उत्सव




लो. टिळकांच्या तैलचित्राच्या अनावरणानंतर संघाचे अध्यक्ष बाळासाहेब ढवळे बापूजी अण्यांना हार घालीत असतांना

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा १. ाते, नागपूर म. प्र.

टिळक—आगरकर जन्मशताब्दी महोत्सव, प्रथम उपाधिधारी शाल वितरण समारंभ शके १८७८ (ता. २२-७-५६)




पंक्ति अधिकारी : क्रमशः—प्रा. श्री. गो. काशीकर (सरचिटणीस), य. गो. मालोदे (चिटणीस), पां. बा. गडकरी (का. स.), ना. रा. शेंडे (उपाध्यक्ष), ल. वि. पांढरीपांडे (क तु. ना. काटकर (प. स.), द. शं. फडके (प. स.), प्रा. माणिक के. बैतुले (संचालक), मा. न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति (समारंभाध्यक्ष), श्री. बाळासाहेब ढवळे (संघाध्यक्ष), सावळापूरकर (पूर्वसंचालक), प्रा. वि. भि. कोलते (पूर्वसंचालक), रा. पु. सगदेव (प. स.), प्रा. या. मु. पाटक (प. स.), द. रा. गोमकाळे (का. स.), रा. बि. करपे (

पं. हृषीकेशजी शर्मा (केंद्राधिकारी), प्रा. श्री. म. कुळकर्णी (केंद्राधिकारी).

पंक्ति-साहित्यपारंगत : क्रमशः—वि. तु. खोंगल, ज. रा. कस्तुरे, ग. रा. पवार, हरिहर येगावकर, के. ब. कदम, दा. ना. आसमवार, बा. रा. पाध्ये.

अनुक्रमणिका



— विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र —

युगवाणी

ललित साहित्य विशेषांक -*- मार्च १९५७

संपादक — ..

ा. सावळापूरकर

वर्ष ११ वें

अंक १२

— कार्यकारी संपादक

मा. ल. व्यवहारे

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

वार्षिक साधारण सभेची सूचना

घटना नियम १० प्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना सूचना देण्यांत येते की विदर्भ साहित्य संघाची केन्द्रीय वार्षिक साधारण सभा रविवार दि. २१-४-१९५७ रोजीं दुपारीं ४-३० वाजतां नागपूर येथे केंद्रीय कार्यालयांत भरेल.

सभेपुढील विषय--

१. गतवर्षाचें कार्यवृत्त.
२. गतवर्षाचे हिशेब
३. १९५७-५८ चें अंदाजपत्रक
४. १९५७-५८ करिता अधिकृत हिशेब तपासनिसांची नेमणूक.
५. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

गुणपूर्तीच्या अभावीं तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी सभेच्या वेळेनंतर अर्ध्या तासानें भरविण्यांत येईल.

सभेत मांडावयाचे ठराव किंवा सूचना लेखी स्वरूपात सभेपूर्वी चार दिवस अगोदर केन्द्रीय कार्यालयांत पोचावयास पाहिजेत.

सर्व सभासदांनी उपस्थित राहावें अशी विनंती आहे.

नागपूर
दि. १-४-१९५७

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. सं., नागपूर.

अनुक्रमणिका